CMYK





सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ७ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १७८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## आजचा सामना





कोलकाता रायडर्स विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्ज

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : ईडन गार्डन, कोलकाता

## विचारपुष्प



निर्भयता — मानसिक दौर्बल्य हेच सर्वांत घातक असे दौर्बल्य असते. आमच्या समाजाचा हाच सर्वांत मोठा दोष आहे. जर आपण आपल्या सामर्थ्याची जाणीव ठेवून संघटित झालो तर आपली शक्ती अचाट होईल. मग कोणतेही कार्य आपल्याला असंभवनीय वाटणार नाही. खरी गोष्ट हीच आहे की, आपल्यात शक्ती असूनही आपल्याला त्या शक्तीचा विसर पडला आहे.

**- डॉ. केशव बळीराम हेडगेवार**
रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

# चार महिन्यांत घ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

### सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

### चार आठवड्यांच्या आत अधिसूचना काढण्याचा निर्देश

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असा आदेश आज मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिला आहे. निवडणुका थांबविण्याचे आम्हाला काही कारण वाटत नाही, असे मतही सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले. चार आठवड्यांच्या आता निवडणुकांसदर्भातील अधिसूचना काढण्यासही सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एनके सिंह यांच्या न्यायासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

बांठिया आयोगाच्या अहवालात इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के आरक्षणाची शिफारस न करता लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची शिफारस करण्यात आली होती. यामुळे महापालिकांमध्ये ओबीसी जागांची संख्या कमी होणार आहे. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. २०२२ मधील बांठिया आयोगाच्या अहवालाच्या आधारे निवडणुका न घेता त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या आधारे घेतल्या जाव्यात, असेही सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारच्या सुनावणीत स्पष्ट केले.

चार महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असा निर्देश न्यायासनाने दिला. गरज पडल्यास निवडणूक आयोगाला मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

गेल्या पाच वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. कोरोना कालखंड आणि त्यानंतर ओबीसी आरक्षणाबाबतची याचिका यामुळे निवडणुका खोळंबल्या होत्या. त्यामुळे राज्यातील सर्वच महापालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद व पंचायत समितींमध्ये प्रशासक राजवट आहे.

निवडणूक घेण्यात कोणाला आक्षेप आहे का असे सर्व याचिकाकर्त्यांना न्यायालयाने विचारले. त्यावर सर्वांना नाही असे सांगितले. त्यानुसार, बांठिया आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यभरातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच होण्याची शक्यता आहे. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होत्या. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी बाजू मांडली तर राज्य सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला. (वृत्तसंस्था)



### आरक्षण रेल्वेच्या डब्यासारखे



याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादावर न्या. सूर्य कांत म्हणाले की, या देशात आरक्षणाची स्थिती रेल्वेतील डब्यासारखी आहे. जे लोक आधीच डब्यात शिरले, ते इतरांना आत घुसू देत नाहीत. हाच खेळ सुरू आहे. याचिकाकर्त्यांचाही तोच खेळ सुरू आहे.

### महायुती एकत्र लढणार निवडणुका : फडणवीस



सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, निवडणूक आयोगाने तत्काळ सगळी तयारी करावी अशी आम्ही विनंती करणार आहे. ओबीसी आरक्षणासंदर्भात बांठिया आयोगाच्या पूर्वीची स्थिती लागू असणार आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये ओबीसींचे पूर्ण आरक्षण लागू असेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढणार आहे. एखाद्या ठिकाणी एखादा वेगळा निर्णय स्थानिक स्तरावर होऊ शकतो. पण धोरण म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढेल.

**प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था**

| | | | |
|---|---|---|---|
| महानगर पालिका | २९ | नगर पंचायत | २९ |
| नगर परिषद | २२८ | जिल्हा परिषद | २६ |



जम्मू आणि काश्मीरमधील पवित्र अमरनाथ गुहेत नैसर्गिकरीत्या तयार झालेल्या बर्फाच्या शिवलिंगाचे पहिले छायाचित्र समोर आले आहे. यावेळी शिवलिंगाची उंची सुमारे ७ फूट आहे. लाखो भाविक दरवर्षी अमरनाथ गुहेत तयार झालेल्या या शिवलिंगाच्या पहिल्या चित्राची वाट पाहत असतात. अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होणार आहे. ही यात्रा सुमारे ३८ दिवस चालेल आणि ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनच्या दिवशी पूर्ण होईल.

# अपघातातील जखमींवर कॅशलेस उपचार

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

अपघातातील जखमींना वेळीच उपचार मिळावेत आणि प्राण वाचावेत यासाठी केंद्र सरकारने कॅशलेस उपचार योजना आणली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग आणि परिवहन मंत्रायलयाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. देशभरात अपघातातील जखमींना कोणत्याही रुग्णालयात कॅशलेस उपचार मिळणार आहेत.

अपघातातील जखमींना कॅशलेस उपचार योजना २०२५ नुसार, मान्यताप्राप्त कोणत्याही रुग्णालयात जखमींना दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार मिळणार आहे. अपघात झालेल्या दिवसापासून सात दिवसांच्या उपचाराचे पैसे मिळणार आहेत. ही योजना सोमवारपासून म्हणजे ५ मे २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जानेवारी २०२५ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. अपघातातील जखमींसाठी केंद्र सरकार सुधारित योजना घेऊन येत आहे, असे त्यांनी सांगितले होते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### बँक शेअर्समुळे बाजारात मंदी

**मुंबई :** दिवसाच्या पहिल्या सत्रात तेजीत असणारा बाजार बंद होताना मात्र घसरणीसह विक्रीच्या दबावाखाली आला.



निर्देशांकात १५६ अंकांची घसरण झाली आणि तो ८०,६४२ वर स्थिरावला. निफ्टी ८१ अंकांनी खाली येत २४,३७९ वर बंद झाला. दिवसअखेरच्या मंदीसाठी बँक शेअर्सची विक्री कारणीभूत ठरली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे शेअर्स विक्रीच्या दबावाखाली दिसले. बाजारातील घसरणीसाठी केंद्र सरकारची मॉक ड्रिलची घोषणाही काही अंशी कारणीभूत ठरली. देशावर युद्धाचे ढग जमू लागले आहेत की काय, या साशंकतेमुळे गुंतवणूकदारांनी हात आखडता घेतला. दिवसअखेरच्या घसरणीने बाजार भांडवल ६.८५ लाख कोटींनी कमी झाले होते.

### हत्येच्या आरोपात चिन्मय दास यांना अटक

**ढाका :** चितगाव न्यायालयाचे वकील सैफुल इस्लाम अलिफ यांच्या हत्येच्या आरोपात हिंदू पुजारी चिन्मय कृष्ण दास यांना अटक करण्यात आली. बांगलादेशमधील चितगाव न्यायालयाच्या आदेशावरून पोलिसांनी कारवाई केली. गेल्यावर्षी ७ नोव्हेंबर रोजी न्यायालयाच्या आवाराबाहेर वकिलाची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. चितगाव महानगर दंडाधिकाऱ्यांनी अटकेसाठी पोलिसांचा अर्ज स्वीकारला आणि आभासी सुनावणीदरम्यान चिन्मय कृष्ण दास यांना अटक करण्याचे आदेश दिले. वकिलाच्या मृत्यूप्रकरणी २१ जण अजूनही तुरुंगात आहेत. या प्रकरणाशी संबंधित ६ प्रकरणांमध्ये पोलिसांनी एकूण ५१ जणांना अटक केली होती. यात चिन्मय दास, रिपन दास, राजीव भट्टाचार्य आणि इतरांचा समावेश आहे. सुटकेनंतर काही तासांतच चितगाव न्यायालयाने अटकेचा आदेश दिला.

# एअर सायरन वाजणार, आज होणार ब्लॅकआऊट

### महाराष्ट्रात १६ ठिकाणी 'वॉर मॉक ड्रील'

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान यांच्यावर युद्धाचे सावट आहे. त्यातच गृह मंत्रालयाने सिविल डिफेन्स मॉक ड्रिल आयोजित करण्याची सूचना सर्व राज्यांना दिली आहे. १९७१ च्या युद्धानंतर पहिल्यांदाच अशाप्रकारची सूचना देण्यात आली आहे. गृह मंत्रालयाच्या निर्देशावर ७ मे रोजी देशातील २४४ जिल्ह्यात सिविल डिफेन्स मॉक ड्रिल होईल. त्यात महाराष्ट्रातील १६ ठिकाणांचा समावेश आहे.

मागील ७ दिवसांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी तिन्ही सैन्य दलाच्या प्रमुखांसोबत बैठक घेत आहेत. संभाव्य एक्शन प्लॅनवर काम केले जात आहे. २०१० च्या अधिसूचनेनुसार, सिविल डिफेन्स जिल्हे ३ कॅटेगिरीत विभागले गेले आहेत. कॅटेगिरी १ मध्ये नवी दिल्ली, सूरत,



वडोदरा, काकरापार, मुंबई, उरण, तारापूर, तालचेर, कोटा, रावत भाट्टा, चेन्नई, कलपक्कम, बुलंदशहर यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील मुंबई, उरण, तारापूर यांचा कॅटेगिरी १ तर ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-नागोठणे, मनमाड, सिन्नर, पिंपरी चिंचवड यांचा कॅटेगिरी २ मध्ये समावेश आहे तर छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांचा कॅटेगिरी ३ मध्ये समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# देशात संभाव्य युध्दस्थितीची सज्जता पण सोलापुरात आज 'मॉकड्रिल' नाही

✔ प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी निऱ्हाळी यांनी केले स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

पाकिस्तानसोबत वाढता तणाव आणि देशात संभाव्य युध्दस्थिती सज्जतेच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार देशातील २४४ जिल्ह्यांमध्ये हवाई हल्ल्यांपासून संरक्षणासाठी मॉक ड्रिल करणार आहे. या मॉक ड्रिलचा उद्देश नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षित करणे आहे. यामध्ये सायरन चाचणी, ब्लॅकआऊट व्यवस्थापनाचा सराव यांचा समावेश आहे. सरकारचा मुख्य हेतू नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करणे आणि संभाव्य धोक्यांशी लढण्याची क्षमता वाढवणे हा आहे.

दरम्यान, राज्यातील काही जिल्ह्यात मॉकड्रिलचे आयोजन असले तरी सोलापुरात मात्र बधवार, दि. ७ मे रोजी मॉकड्रिल नसल्याची माहिती प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली. पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी देशातील २४४ जिल्ह्यांमध्ये मॉक ड्रिल आयोजित होणार आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबत वाढलेल्या तणावामुळे गृह मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. या मॉक ड्रिलदरम्यान नागरिकांना हवाई हल्ल्यांपासून वाचण्याच्या उपायांबाबत माहिती दिली जाईल. ड्रिलदरम्यान सायरन वाजवले जातील. केंद्र सरकारने सर्व सहभागी राज्यांना त्यांच्या निर्वासन रणनीती सुधारण्याचे आणि संपूर्ण पूर्वाभ्यास कार्यक्षमतेने पार पाडण्याचे निर्देश दिले आहेत. या ड्रिलमध्ये हवाई हल्ल्याची चेतावणी देणाऱ्या सायरनचे संचालन आणि नागरिकांना हल्ल्याच्या परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा उपायांबाबत प्रशिक्षण देणे यांचा समावेश आहे. इतर उपायांमध्ये अपघाताच्या परिस्थितीत ब्लॅकआऊटचे उपाय, महत्त्वाच्या प्रकल्प आणि प्रतिष्ठानांचे संरक्षण, तसेच निर्वासन योजनांना अद्ययावत करणे आणि त्यांचा सराव करणे यांचा समावेश आहे.



मॉक ड्रिलच्या एक दिवस आधी, म्हणजेच मंगळवारी, गृह मंत्रालयात बैठक झाली, ज्यामध्ये लोकांना प्रशिक्षण कसे द्यावे, याचा आढावा घेण्यात आला. त्या अनुषंगाने राज्यातील काही जिल्ह्यात बुधवारी मॉकड्रिलचे आयोजन केले आहे.

**मॉक ड्रिलमध्ये कोणत्या गोष्टींकडे लक्ष असावे लागते?**

एअर रेड सायरन कसे फॉलो करावे, ब्लॅकआऊट परिस्थितीत काय करावे, प्रथमोपचाराची तयारी, घरी टॉर्च असणे, मेणबत्ती आवश्यक ठेवणे, इलेक्ट्रॉनिक अयशस्वी होण्याच्या परिस्थितीपासून वाचण्यासाठी रोख रक्कम ठेवणे, हवाई हल्ल्याचे संकेत देणारे सायरन, सामान्य नागरिकांना प्रशिक्षण, शहरांमध्ये अचानक वीज खंडित होईल, लष्करी तळ, पॉवर प्लांट यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांना झाकले जाईल

**मॉकड्रिल दरम्यान काय करू नये?**

हवाई हल्ल्याच्या चेतावणीदरम्यान बाहेर जाणे टाळावे. त्याऐवजी घरातच राहावे, घरातील लाइट बंद करावी, सर्व दारे आणि खिडक्या बंद कराव्यात आणि रेडिओ किंवा टीव्हीवरून मिळणाऱ्या सूचनांनुसार सतर्क राहावे, सायरन ऐकल्यास आवश्यक खबरदारी घ्यावी, जोपर्यंत सूचना मिळत नाही, तोपर्यंत सुरक्षित जागा सोडू नये.



### इलेक्ट्रिक वाहन रात्री चार्जिंग केल्यास ३० टक्के जादा पैसे

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

जर तुम्ही इलेक्ट्रिक कार किंवा स्कूटर रात्रीच्या वेळी चार्जिंग केल्यास ३० टक्के अधिक पैसे भरावे लागणार आहेत. नवीन नियमानुसार चार्जिंग वेळेत बदल करण्यात आला आहे. सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत तुमची ईव्ही चार्ज केली तर तुम्हाला ३० टक्के कमी दर लागेल.

सरकारचा उद्देश ग्रीन एनर्जीला चालना देणे आणि ग्रीडवरील लोड कमी करणे हा आहे. त्यामुळे भविष्यातही अशा प्रकारचे वेळ आधारित ईव्ही चार्जिंग दर देशभर लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. चालकांना आता केवळ वाहन चालवण्याचा प्लॅन नव्हे, तर चार्जिंगची वेळ देखील नीट ठरवावी लागणार आहे. दिवसा चार्जिंग केल्यास बचत होईल. मात्र, रात्री चार्जिंग करणाऱ्यांसाठी ही नवी व्यवस्था डोकेदुखी ठरू शकते. स्मार्ट प्लॅनिंग केल्यास चार्जिंगवरील खर्च नियंत्रित करता येईल. (वृत्तसंस्था)

# धर्मांतरानंतर अनुसूचित जातीचा दर्जा लगेच होतो रद्द

✔ आंध्र प्रदेश हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**अमरावती, दि. ६ मे-**

अनुसूचित जाती (एससी) समुदायातील व्यक्तीने ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यास त्याचा अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ रद्द होतो. त्यामुळे अशा व्यक्तींना अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत संरक्षण मिळणार नाही असा महत्वपूर्ण निकाल आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दिला.

गुन्टर जिल्ह्यातील पास्टर चिंताडा आनंद यांनी दाखल केलेल्या एका तक्रारीवर आधारित प्रकरणात न्यायमूर्ती एन. हरिनाथ यांनी हा निकाल दिला, जातीचा उल्लेख करून अवमान केल्याची तक्रार आनंद यांनी अक्कला रामिरेड्डी व इतरांविरोधात जानेवारी २०१२मध्ये चंदोलू पोलिस ठाण्यात दाखल केली होती. त्यावर पोलिसांनी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती अत्याचार



प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. याचिकाकर्त्यांचे वकील फणी दत्त यांनी युक्तिवाद केला की, आनंद हे ख्रिश्चनधर्मीय असून पास्टर म्हणून कार्यरत आहेत.

त्यामुळे त्यांचा एससी दर्जा संपुष्टात आला आहे. जो कोणी हिंदू धर्म वगळता इतर कोणताही धर्म स्वीकारतो, त्याचा अनुसूचित जातीचा दर्जा नाहीसा होतो अशी राज्यघटनेत तरतुद आहे.

# एआय, एजीआय आणि आता ह्युमनॉइड्स

### एआयने माणसापुढे निर्माण केली नवी आव्हाने

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

पुढचा येणारा काळ हा एआयचा असणार आहे. एआयमुळे अनेकांच्या नोकऱ्या धोक्यात येणार असल्याची शक्यता सर्वत्र वर्तवली जाते आहे. एआयमुळे कामे सोपी आणि सहज करणे शक्य आहे. आधी एआय आले. त्यानंतर एजीआय म्हणजे कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता जगासमोर आले. तर काही कंपन्यांचे म्हणणे आहे की, एआय आणि एजीआय हे खूप आधीच जगासमोर आले आहेत. आता ह्युमनॉइड्सचा जमाना आला आहे.

एआयच्या अधिराज्यात आठ क्षेत्रांवर परिणाम होणार आहे. याबाबत फिव्हर कंपनीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. फिव्हर कंपनीचे कार्यकारी अधिकारी मिका कॉफमैन यांनी त्यांच्या टीमला एक मेल पाठवून अत्यंत स्पष्ट आणि सरळ भाषेत एआय कसा माणसांची जागा घेणार आहे याबद्दल सांगितले. तसेच तो कोणत्या क्षेत्रातील लोकांची कामे करू शकतो हे देखील सांगितले.




**एआय ही एक संधी**

एआयकडे धोका म्हणून न पाहता एक संधी म्हणून पहावे. एआयमुळे नोकऱ्या जरी धोक्यात असल्या तरी माणसाने स्वतःला अपडेट करणे गरजेचे आहे. त्याने एआय टूलचा वापर कसा करायचा हे शिकणे गरजेचे आहे. एआय तज्ज्ञांकडून नवीन उत्पादक व्यवस्थापनेचे अवलंबन करणे शिकणे गरजेचे आहे. तसेच लार्ज लैंग्वेज मॉडलचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात करणे गरजेचे आहे.



हा मेल सध्या व्हायरल झाला आहे. यात त्यांनी प्रोग्रामर, डिझायनर, उत्पादक व्यवस्थापक, डेटा साइंटिस्ट, वकील, कस्टमर सपोर्ट, सेल्सपर्सन, फायनान्स प्रोफेशनल्स यांच्या नोकऱ्या धोक्यात असल्याचे म्हटले आहे.

**पाच ते १० वर्षांत एआय करणार मानवाशी बरोबरी**

कोणत्याही कामात मानवाशी बरोबरी करू शकणारी कृत्रिम बुद्धिमत्ता अद्याप खूप दूर आहे, असे अनेकांना वाटत असले तरी प्रत्यक्षात मात्र ती वेळ येण्यास फक्त काही वर्षे उरली आहेत, असे गुगलचे कार्यकारी अधिकारी डीपमाइंड म्हणतात. ही प्रणाली काही गोष्टींमध्ये खूप प्रभावी आहेत. परंतु अशा काही गोष्टी आहेत ज्या ते अजून करू शकत नाहीत आणि त्याआधी आपल्याला अजूनही बरेच संशोधन करायचे आहे, हसाबिस म्हणाले. (वृत्तसंस्था)

**कमी कर्मचाऱ्यांमध्ये जास्त आऊटपूट**

कमी कर्मचाऱ्यांमध्ये कंपनीला एआय सुसज्ज करून जास्तीत जास्त फायदा कसा होईल याकडे पुढील काळात कंपन्यांचा कल असणार आहे. आता एआय हा पर्याय राहिला नसून एक गरज बनला आहे. जगभरातील कंपन्या कर्मचाऱ्यांना नोकरीवरून कमी न करता एआयचा अवलंब करून त्यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करत आहेत.

बॉक्स

**काय आहे लार्ज लैंग्वेज मॉडल?**

लार्ज लँग्वेज मॉडेल हा एक प्रकारचा आर्टिफिशियल इंटेलिजेंस आहे. जो मानवी भाषेवर प्रक्रिया करण्यात, समजून घेण्यात आणि निर्माण करण्यात उत्कृष्ट आहे. लार्ज लँग्वेज मॉडेल हे अनेक उद्योगांमध्ये विश्लेषण करण्यासाठी, सारांशित करण्यासाठी आणि सामग्री तयार करण्यासाठी उपयुक्त आहे.



**आता येणार ह्युमनॉइड्सचे युग**

ह्युमनॉइड रोबोट्स अजूनही स्वप्नासारखे वाटतील, परंतु ते आपल्या कल्पनांपेक्षा वास्तवाच्या जवळ आहेत. वेगवान एआय चिप्स, चांगले बॅटरी पॅक, स्मार्ट मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि प्रगत ॲक्च्युएटर रोबोट्सना पूर्वीपेक्षा अधिक सहजतेने चालण्यास आणि पकडण्यास मदत करतात. त्याच वेळी, कामगारांची कमतरता भरून काढण्यासाठी उद्योगांना स्वयंचलित करण्यास प्रवृत्त करत आहे. एकत्रितपणे, या ट्रेंडचा अर्थ असा आहे की, एकेकाळी केवळ कारखान्यातील कामे करणारे रोबोट आता गोदामे, घरे, किरकोळ विक्री आणि अगदी अंतराळातील कामे देखील हाताळू शकतात. मानवी शरीराच्या आकाराचे आणि कार्याचे अनुकरण करण्यासाठी ह्युमनॉइड रोबोट्स डिझाइन केलेले आहेत. पारंपारिक औद्योगिक रोबोट्सच्या विपरीत, जे जागीच स्थिर असतात आणि अरुंद कामांसाठी प्रोग्राम केलेले असतात, ह्युमनॉइड्स मानवी वातावरणात काम करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. याचा अर्थ पायऱ्या चढणे, दरवाजे उघडणे, लोकांशी संवाद साधणे आणि कामाच्या ठिकाणी आणि घरांमध्ये विविध कामे करणे त्यांना शक्य होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### चौंडीहून दिल्लीकडे निघालेल्या अहिल्या रथाचे पिलीव येथे स्वागत

**पिलीव, दि. ६ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या मूळ जन्मगाव चौंडीपासून दिल्लीला निघालेल्या राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यादेवी रथाचे स्वागत माजी चेअरमन शिवप्रसाद पुकळे, जितेंद्र पाटील, माजी सरपंच दादासाहेब शिंगाडे, दामोदर लोखंडे, अंकुश देवकते, शैलेश झिंजे व कार्यकर्ते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी अहिल्या चौकातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय संघटक बाळासाहेब लेंगरे, काशिनाथ शेवते, ज्ञानेश्वर सलगर, सरचिटणीस अजित पाटील, विनायक रुपनवर, कालिदास गाढवे, अनिल शेंडगे, डी.के.पाटील, नारायण देवकते, रणजीत सुळ उपस्थित होते. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे मूळ जन्मगाव चौंडी येथून राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १९ एप्रिलपासून अहिल्यादेवी रथाची सुरुवात करण्यात आली असून अहिल्यारथ महाराष्ट्रातून जाऊन मध्य प्रदेशातील इंदूर व राजधानी माहेश्वरीमार्गे राजधानी दिल्ली येथे दि. ३० मे रोजी पोहचणार असून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियमवर विविध उपक्रम राबवून साजरी केली जाणार असल्याचे यावेळी विनायक रुपनवर यांनी सांगितले.



### भगवंत मंदिरात भक्तीगीतांचा कार्यक्रम

**बार्शी, दि. ६ मे-**


ग्रामदैवत श्री भगवंत प्रकटोत्सव २०२५ निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये श्री स्वामी समर्थ कला उपासक मंडळ प्रस्तुत भक्तिधारा हा अभंग आणि भक्तिगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात तुच सूर ठावा मजसी या गणेश स्तवनाने करण्यात आली. त्यानंतर माझी रेणूका माऊली, घनु वाजे घुणघुणा, माझे मनोरथ, आम्हा न कळे ज्ञान, राधाधर मधुमिलिंद, बाई मी विकत घेतला श्याम, अवघाचि संसार, लहानपण देगा देवा, विष्णूमय जग, मोगरा फुलला, कानडा राजा पंढरीचा, चंदनाचे हात, राधा कृष्णावरी भाळली, नित्य वाचे प्रभू नाम, आता कोठे धावे मन, हरी उभा राहिला, दीनांचा कैवारी, सखा माझा ज्ञानेश्वर, भक्तिवाचोनि मुक्तीची मज, अनादी निर्गुण अशी सुमधूर गीते प्रस्तुत करण्यात आली. शेवटी प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी गायिलेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज रचित लई नाही मागणं या भैरवी रागातील रचनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. भक्तिधाराचे कलाकार अमोल जोशी, निलेश मांजरे, हेमंत साने, मधुसुदन चांडक, ना.पां. देशपांडे, लावण्या पाटील, दिपाली शेटे, गायत्री महाजन, अनुजा आपटे, शीला बारवकर, कैवल्य सहस्त्रबुद्धे यांनी सादर केलेल्या सुमधूर गीतांनी रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमासाठी संवादिनीवर दिपाली सहस्त्रबुद्धे आणि तुषार गदगी यांनी तबला वादनाची उत्तम साथ केली. तसेच सूत्र संचालन माधूरी शिंदे यांनी केले.



### चिखलठाणचे रेवन्नाथ मोरे यांना प्रगतशील शेतकरी पुरस्कार

**करमाळा, दि. ६ मे-**

चिखलठाण ता करमाळा येथील रेवन्नाथ मोरे यांना पाटोदा जिल्हा अहिल्यानगर येथील भक्ती शक्ती प्रतिष्ठानचा प्रगतशील शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पाटोदा तालुका जामखेड जिल्हा बीड येथील भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरवण्यात येते यामध्ये यावर्षीचा वारकरी भूषण, सेवारत्न पुरस्कार आदर्श शेतकरी पुरस्कार शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजीराव भिडे यांच्या हस्ते महाराष्ट्र मंदीर महासंघाचे डॉ. दत्तात्रय चोरघे महाराज प्रसिद्ध किर्तनकार विठ्ठल पाटील महाराज यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला करमाळा तालुक्यातील चिखलठाण नंबर दोन येथील रेवन्नाथ मोरे यांनी आपल्या शेतीमध्ये विविध पिकांमध्ये घेतलेले भरगोस उत्पादन व शेतीमध्ये केलेले वेगवेगळे प्रयोग याची दखल घेऊन त्यांना प्रगतशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पुणे येथील सर्वेश प्रतिष्ठानचे ज्ञानेश ताटे, डॉ. प्रविण कासार, भारत चव्हाण, अंबादास भोगाडे, रविंद्र खोत, कल्लापा कुटे उपस्थित होते.



### स्वामीराव गायकवाड यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ६ मे-**

शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हा उपाध्यक्ष स्वामीनाथ हेगडे, जिल्हा संघटक वैशाली हावनूर व अक्कलकोट शिवसेना शहर प्रमुख वैशाली हावनूर यांच्याकडून अक्कलकोट येथील रयत संदेश साप्ताहिकचे संपादक व शिवसेना ग्रंथालय प्रमुख स्वामीराव गायकवाड यांचा अक्कलकोट शिवसेना शहर कार्यालय विजयनगर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आमचे पत्रकार बंधू व अक्कलकोट शिवसेना शहर महिला आघाडी उपप्रमुख वर्षा मेत्रे उपस्थित होते.

# तुळजापूर येथील मराठा वधू-वर परिचय मेळाव्याच्या आयोजनाची जय्यत तयारी

## वधुवरांना कुठलीही नोंदणी फी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०६ मे-**

मराठा समाजातील तरुण-तरुणींसाठी सकल मराठा समाज यांच्या विद्यमाने आयोजित वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. येत्या रविवार, दि. २५ मे रोजी मोफत व भोजन व्यवस्थेसह सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत हा मेळावा तुळजापूर येथील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ मंगल कार्यालयात होणार आहे. यामध्ये वधुंवरांना कुठलीही नावनोंदणी फी द्यावी लागणार नाही.

सध्या महाराष्ट्रभर सकल मराठा समाजाच्या वतीने विनाशुल्क मराठा वधुवर मेळावे घेतले जात आहेत. नुकताच १३ एप्रिल रोजी धाराशिव येथे मराठा समाज वधू वर मेळावा यशस्वी पार पडला आहे. मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती तसेच त्यांच्या पालकांना अनुरूप स्थळ शोधून विवाह जुळवण्याची सुवर्णसंधी तुळजापूर येथील मेळाव्याच्या निमित्ताने मिळणार आहे. या मेळाव्यात, वधू आणि वर यांच्या कुटुंबियांनी एकमेकांना ओळख करून द्यायची आहे. यामध्ये प्रामुख्याने नाव, वय, शिक्षण, व्यवसाय आणि कौटुंबिक पार्श्वभूमी यासारखी माहिती द्यायची आहे.

मराठा समाजातील वधुवर व पालकांनी या मेळाव्यास उपस्थित राहताना प्रत्यक्ष वधुवरांनी उपस्थित राहावे लागणार आहे. तसेच मेळाव्यास येताना त्यांनी दोन प्रतीमध्ये बायोडाटा व आयकार्ड साईज दोन फोटो सोबत घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीमधील प्रा.अभिमान हंगरगेकर, अशोक गायकवाड, गणेश पुजारी, अमोल निंबाळकर, उत्तमराव अमृतराव, चंद्रसेन देशमुख, कृष्णा रोचकरी, उमाजी गायकवाड, सुहास साळुंके, अर्जुन जाधव आदींनी केले आहे.

> **वधू-वरांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळणार**
>
> वधु वर मेळावा हे एक समाजोपयोगी व पारंपरिक पद्धत आहे; तुळजापूर येथील भव्य मराठा वधू-वर मेळाव्याच्या माध्यमातून इच्छुक वधू आणि वर यांच्या कुटुंबीयांना एकमेकांना भेटण्याची आणि विवाह संबंधाची चर्चा करण्याची संधी मिळणार आहे.
>
> **-प्रा.अभिमान हंगरगेकर,** संयोजन समिती, तुळजापूर

## हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या तरुणीचे ५३ हजार लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

शहरातील रामलाल चौकातील श्रीराम हार्ट अँन्ड आय केअर सेंटर या हॉस्पीटलमध्ये काम करणाऱ्या तरूणीच्या पर्समधून चोरट्याने ५३ हजार रुपये चोरून नेले.

याबाबत प्रगती तानाजी कोकाटे (वय २४, रा. बेलाटी, ता. उत्तर सोलापूर) या तरूणीच्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ व २ मे रोजी प्रगती कोकाटे या हॉस्पीटलमधील ड्यूटी संपल्यानंतर घरी जात असताना भैय्या चौकात नाश्ता करण्यासाठी गेल्या होत्या. तिथे पैसे देताना कोकाटे यांच्या लक्षात आले की त्यांच्या बॅगेतील ५ हजार रुपयांपैकी ३ हजार रुपये कमी आहे. ही बाब कोकाटेंच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी हॉस्पीटलच्या एच आर समीर भालेराव यांना कळविले. त्यानंतर कोकाटे यांनी हॉस्पीटलमध्ये येऊन वरिष्ठांना भेटून घटनेबाबत सांगितले. त्यानंतर चौकशी केल्यानंतर २९ एप्रिल रोजीदेखील कोकाटे यांचे ५० हजार रुपये गेले असल्याचे दिसून आले. त्यामुळे चोरट्याने कोकाटे यांच्या बॅगमधून दोनवेळेस मिळून ५३ रुपये काढून घेऊन चोरी केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## नातेवाईकाला भेटू देत नाही म्हणून सिव्हिलमध्ये एकाला मारहाण

**सोलापूर, दि. ६ मे-**

येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नातेवाईकाला भेटू देत नाही या कारणावरून एकाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार सिव्हिल हॉस्पिटल मधील ए ब्लॉक समोर दुपारी दोन वाजता घडला. सिताराम सुखदेव माने (वय ३१ रा. पेनुर ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सिताराम हा सिव्हिल हॉस्पिटल मधील ए ब्लॉक समोर थांबला असता, त्याला लक्ष्मण बाबुराव गायकवाड व इतर तीन यांनी रुग्णालयातील नातेवाईकाला भेटू देत नसल्याच्या कारणातून लोखंडी रॉड तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यामध्ये सितारामच्या डोक्याला मार लागला तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने तो स्वतः शासकीय रुग्णालयात उपचार करिता दाखल झाला.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

## २८ गोवंशांना कत्तलीपासून वाचवण्यात यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

बजरंग दलातील गोरक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मोहोळ येथे गुप्त ठिकाणी मोठ्या प्रमाणात गाईची अवैधरित्या कत्तल होणार आहे, अशी माहिती मिळाली. त्वरित सोलापूर ग्रामीण पोलीस उपअधीक्षक प्रीतम यावलकर तसेच मोहोळ पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली.

पहाटे ५ दरम्यान गोरक्षकांनी पोलिसांची मदत घेत सदर घटनास्थळी छापा केले असता मोठ्या प्रमाणात गोवंश कत्तलीसाठी बांधून ठेवलेले निदर्शनास आले. तसेच कत्तलखान्यावर ठिकठिकाणी गाईच्या रक्ताचा सडा म्हणजेच मोठ्या प्रमाणात गाईंची अवैधरीत्या कत्तल या ठिकाणी झालेले निदर्शनास आले.

त्वरित घटनास्थळावरील सर्व गोवंश सुखरूपाने गोशाळेत सोडण्यात आले. सदर कारवाईत २८ गोवंशांना कत्तलीपासून वाचवण्यात बजरंग दलातील गोरक्षकांना पोलिसांच्या मदतीने यश आलेले आहे.

कारवाईयशस्वीकरण्याकरिता सोलापूर ग्रामीण पोलीस उपअधीक्षक प्रीतम यावलकर मोहोळ पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे, बजरंग दल सोलापूर जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशी,सह जिल्हा गोरक्षा प्रमुख पवनकुमार कोमटी,गोरक्षक पवन बल्ला, अनिकेत गोरट्याल, राकेश बिज्जरगी, गणेश बिज्जरगी आदी गोरक्षकांनी परिश्रम घेतले.



## शहरातून तीन दुचाकींची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

शहराच्या विविध भागातून चोरट्याने तीन दुचाकींची चोरी केली. आकाश सुरेश चौधरी (वय १८, रा. सिध्दार्थ नगर, शुक्रवार पेठ, सोलापूर) याने त्याची एमएच २५ बीबी ९८४३ ही छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे २० एप्रिल रोजी सायंकाळी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत अरविंद उपेंद्र चिलवेरी (वय २०, रा. निलम नगर, एमआयडीसी, सोलापूर) याने त्याची एमएच १३ एडब्ल्यू २६३३ ही २२ एप्रिल रोजी सकाळी दयानंद कॉलेजच्या मेनगेटजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत. तिसऱ्या घटनेत अशपाक उस्मानगनी शेख (वय ४२, रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ डीके ५०६८ क्रमांकाची दुचाकी ही रेल्वे स्टेशन पंप हाऊसजवळ ५ मे रोजी सायंकाळी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.



## उपोषणाच्या कारणावरून एसटी डेपोत तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ६ मे-**

मंगळवेढा येथील एसटी डेपोत उपोषणाच्या कारणावरून तरुणाला मारहाण करण्यात आली. ही मारहाण रविवारी सायंकाळी ६.१५ वाजता करण्यात आली. संतोष सुरेश टोणपे (वय ३४ रा. बुधवार पेठ सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. संतोष हा रविवारी सायंकाळच्या सुमारास मंगळवेढा एसटी डेपो येथे होता. तेथे उपोषणाच्या कारणावरून त्याची आणि सचिन रायबान याची तक्रार झाली. या तक्रारीतून सचिन व त्याच्या इतर तीन साथीदारांनी संतोष यास लाथा बुक्क्यांनी व लाकडाने मारहाण केली. यामध्ये सर्वांगास मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार केला. त्यानंतर मंगळवारी दुपारी तीन वाजता तो स्वतः उपचाराकरिता दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

## पाण्याच्या हौदात पडून वृद्धाचा मृत्यू

### जुने संतोष नगर मधील घटना

**सोलापूर, दि. ६ मे-**

घरातील पाण्याच्या हौदात पाईप टाकत असताना आत पडून वृद्धाचा मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी १२:३० च्या सुमारास विजापूर रोडवरील जुने संतोष नगर येथे हा प्रकार घडला.

विश्वनाथ नारायण कुलकर्णी (वय ७३ ) असे हौदात पडून मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. जुने संतोष नगर परिसरातील नळाला मंगळवारी दुपारी पाणी सोडण्यात आले होते. त्यावेळी विश्वनाथ हे त्यांच्या जुने संतोष नगर येथील घरात होते. दरम्यान पाणी सोडण्यात आल्याने हौदातील पाईप काढण्याचा प्रयत्न विश्वनाथ करत होते. त्यावेळी अचानक त्यांचा तोल जाऊन ते पाण्याच्या हौदात पडले. ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांना पाण्याच्या हौदातून बाहेर काढून दुपारी १. ३० च्या सुमारास पुतण्या प्रसाद याने बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालय उपचारात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृह येथे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (लॅप्रोस्कोपी) शिबीर आयोजित करण्यात आले.

शिबिरामध्ये एकूण २४ पेशंटच्या कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करण्यात आली. नियंत्रण अधिकारी ज्योत्स्ना कोरे, डॉ.लता पाटील , सर्जन डॉ. दीपिका चिंचोली, डॉ. मीनल चिडगुपकर,भुलतज्ञ डॉ. सतीश जोशी, मेट्रन संगीता लेकुरवाळे, संगीता गुरव , सिस्टर ढगे , ब्रदर पवार, बागवान, सिस्टर प्रिया वाघमारे आणि सर्व स्टाफने कॅम्प यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

आरोग्य अधिकारी डॉ.राखी माने यांच्या हस्ते डॉ. लता पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी ठेवा

## जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ; उबाठा सेनेचे मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

उबाठा शिवसेना सोडून जाणाऱ्यांची चिंता करू नका. जे जाणार आहेत, त्यांना जाऊ द्या. आपला पक्ष कार्यकर्त्यांच्या जिवावर उभा आहे. ताकदीने पक्ष वाढवू निवडणुका जवळ आहेत. त्यामुळे आपली स्वतंत्र ताकद निर्माण करा. आपल्यासोबत कोण येणार आहेत, कोण येणार नाहीत. याचा विचार करू नका. स्वबळावर निवडणुका लढण्याची तयारी ठेवा, असे आवाहन करत

उबाठा सेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी सोलापुरातील गटबाजीवर कायमचा पडदा टाकण्याचाही इशारा दिला. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवस्मारक सभागृहात उद्धवसेनेकडून मार्गदर्शन शिबिर घेण्यात आली. उपस्थित प्रमुख पदाधिकाऱ्यांना कोकीळ यांनी मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात अजय दासरी यांनी बूथ बांधणी व नियोजन या विषयावर तसेच किशोर ठाणेकर यांनी सद्यस्थितीतील पक्ष संघटन व प्रभावी वापर तसेच दत्तात्रय मेनकुदले यांनी सोलापूर महापालिका निवडणुकीतील संधी व आव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी, आरोग्य सेनेचे कार्याध्यक्ष किशोर ठाणेकर, जिल्हाप्रमुख संतोष पाटील, जिल्हा संघटक शरणराज केंगनाळकर, जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, महानगर प्रमुख दत्ता माने, शहरप्रमुख महेश धाराशिवकर, नाना मोरे, लक्ष्मण जाधव, जिल्हा समन्वयक रवींद्र नागणकेरी, अतुल भंवर, जगदीश कलकेरी, महिला आघाडीच्या प्रियाताई बसवंती, युवतीप्रमुख पूजा खंदारे आदी उपस्थित होते.



## क्राईम वृत्त...

### आशा नगरात गळफासाने एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. ६ मे-**

एमआयडीसी परिसरातील आशा नगरात गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. हा प्रकार पाच मे रोजी दुपारी एक वाजता उघडकीस आला. चनबसप्पा खुर्च्या भैरामडगी ( वय ५६) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी दुपारी एकच्या सुमारास चनबसपा हे घरातील लोखंडी अँगलला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांना खाली उतरवण्यात आले. त्यानंतर हवालदार डोके यांनी उपचाराकरिता बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### अज्ञात दुचाकीच्या धडकेत एकजण जखमी

**सोलापूर, दि. ६ मे-**

होटगी रस्त्यावरील विमानतळा समोरील रस्ता ओलांडताना अज्ञात भूतकीच्या धडकेने एकदम जखमी झाला. सोमवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. बसवराज अरुण स्वामी (वय ४८, रा. हत्तुरे वस्ती) असे अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी रात्री ११ च्या सुमारास बसवराज हे विमानतळा समोरील रस्ता ओलांडत होते. त्यावेळी तेथून जाणाऱ्या अज्ञात दुचाकी स्वाराने त्यांना धडक दिली. यात जखमी झालेल्या बसवराज यांना मुलगा तनवीर याने शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले या घटनेची नोंद शिबिर पोलीस चौकीत झाली आहे.

### गळ्यावर जखम करून घेऊन स्वतःला केले जखमी

**सोलापूर, दि. ६ मे-**

दारूच्या नशेत गळ्यावर ब्लेडने मारून घेऊन स्वतःला जखमी करून घेतल्याची घटना एमआयडीसी परिसरातील नितीन नगरात सोमवारी रात्री ८:४५ च्या सुमारास घडली. सुनील सर्जेराव गवळी ( वय ४०, रा. नितीन नगर एमआयडीसी सोलापूर) असे स्वतःला जखमी करून घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी रात्री ८:४५ च्या सुमारास सुनील हा त्याच्या नितीन नगरातील राहत्या घरी होता. त्यावेळी त्याने अज्ञात कारणातून स्वतः ब्लेडने गळ्यावर मारून घेतले. यात जखमी झाल्याने पत्नी माया गवळी हिने शासकीय रुग्णालय उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

### गतिरोधकावरून दुचाकी आदळल्याने खाली पडून महिला जखमी

**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूर ते नागणसूर असे जाताना गतिरोधकावर दुचाकी आदळल्याने महिला खाली पडून जखमी झाली. हा प्रकार मंगळवारी सकाळी ११:३० च्या सुमारास घडला. प्रभावती विश्वनाथ उपासे ( वय ४०, या लक्ष्मी नगर , हत्तुरे वस्ती) असे जखमी महिलेचे नाव आहे. मंगळवारी सकाळी ११:३० च्या सुमारास प्रभावती या सोलापूर येथील राहत्या घरापासून नागणसूर दुचाकावर पाठीमागे बसून येथे जात होत्या. दरम्यान, आचेगावपासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गतिरोधकावरून दुचाकी आदळली. यामुळे प्रभावती खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला जखम झाली. तसेच कमरेला मार लागला. यानंतर मुलगा मिलिंद याने प्रभावती यांना शासकीय रुग्णालयात दुपारी एक वाजता उपचाराकरिता दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### एसटीला बल्करची पाठीमागून धडक; चालक जखमी

**सोलापूर, दि. ६ मे-**

मोहोळ ते सोलापूर असे येणा-या बल्करची एसटीला पाठीमागून धडक बसली. यात बल्करचा चालक जखमी झाला. हा अपघात मंगळवारी दुपारी ३:३० च्या सुमारास घडला. कैलास प्रसाद मेहता (वय ३० रा झारखंड) असे जखमी झालेल्या चालकाचे नाव आहे. मंगळवारी दुपारी साधारण ३.२० च्या सुमारास कैलास हा बल्कर चालवीत मोहोळ येथून सोलापूरच्या दिशेने येत होता. दरम्यान देगाव परिसरातील टाटा शोरूम समोरील रस्त्यावर एसटीला बल्करची पाठीमागून धडक बसली. या अपघातात बल्करचा चालक कैलास हा डोक्याला मार लागून जखमी झाला. त्याला रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिविल पोलीस चौकी झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### सेबीकडून चार कंपन्यांच्या आयपीओला मंजुरी

**मुंबई** : सिक्युरिटीज एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने अजय पॉली लिमिटेड, रीगल रिसोर्सेस, लक्ष्मी इंडिया फायनान्स आणि जाजू रश्मी रिफ्रॅक्टरीज या चार कंपन्यांच्या इनिशियल पब्लिक ऑफर (आयपीओ) ला मान्यता दिली आहे. या कंपन्या एफएमसीजी उत्पादने तयार करतात आणि कर्ज आणि वित्तीय सेवा पुरवतात. सर्व कंपन्या लवकरच त्यांचा व्यवसाय वाढवण्यासाठी बाजारातील गुंतवणूकदारांकडून पैसे उभारतील. जेव्हा एखादी कंपनी पहिल्यांदाच सामान्य जनतेला शेअर्स जारी करते तेव्हा त्याला इनिशियल पब्लिक ऑफरिंग म्हणजेच आयपीओ म्हणतात. कंपनीला व्यवसाय वाढवण्यासाठी पैशांची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत, कंपनी बाजारातून कर्ज घेण्याऐवजी काही शेअर्स लोकांना विकून किंवा नवीन शेअर्स जारी करून पैसे उभे करते. या कारणास्तव कंपनी आयपीओ आणते.

### फोनपेतर्फे स्मार्टस्पीकरचा नवा अवतार सादर

**मुंबई** : फोनेपे या भारतातील आघाडीच्या डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्मने आपल्या नव्या जनरेशन 'स्मार्टस्पीकर'चे अनावरण केले. व्यापाऱ्यांच्या वाढत्या गरजांनुसार खास डिझाईन केलेले हे अद्ययावत उपकरण भारतात विकसित करण्यात आले आहे. नवीन जनरेशनच्या स्मार्टस्पीकरमध्ये ४ कनेक्टिव्हिटी, फास्ट चार्जिंग आणि दीर्घ काळ टिकणारी बॅटरी आहे. मूळ स्मार्टस्पीकरचे लोकप्रिय फीचर्स कायम ठेवत, या नव्या आवृत्तीत अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या. याप्रसंगी फोनपेच्या मर्चंट बिझनेस विभागाचे चीफ बिझनेस ऑफिसर युवराजसिंह शेखावत म्हणाले, आमच्या नवीन जनरेशनचे मेड इन इंडिया स्मार्टस्पीकर्स सादर करताना आनंद होत आहे. या स्मार्टस्पीकर्सच्या माध्यमातून आम्ही देशभरातील व्यापाऱ्यांसाठी आर्थिक समावेशन घडवून आणत आहोत. भारतीय उत्पादक देशाच्या डिजिटल परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग बनतील, यासाठीदेखील आम्ही प्रयत्न करीत आहोत. फोनपेने २०२२ मध्ये आपला पहिला स्मार्टस्पीकर बाजारात आणला होता, ज्यात पेमेंट झाल्यानंतर तत्काळ व्हॉईस नोटिफिकेशन मिळत असे. हा स्मार्टस्पीकर २१ भाषांमध्ये उपलब्ध आहे. हे डिव्हाईस पूर्णपणे चार्ज होण्यासाठी ७५ मिनिटे लागतात आणि एकदा चार्ज केल्यानंतर सात दिवस स्टँडबायवर राहू शकते.

### बलुचिस्तानमध्ये स्फोट; सहा पाकिस्तानी सैनिक ठार

**क्वेटा** : बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानी लष्कराला लक्ष्य करून झालेल्या हल्ल्यात सहा लष्करी जवानांचा मृत्यू झाला तर पाच जण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हा हल्ला बलुचिस्तानमधील बोलन भागात झाला. येथे फ्रंटियर कॉर्प्सच्या ताफ्याला लक्ष्य करून आयईडी स्फोट करण्यात आला. स्फोटानंतर पाकिस्तानी सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला आहे.

हल्ल्याची जबाबदारी कोणीही घेतली नाही. हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांचा शोध मोहीम सुरू आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या सैनिकांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे. आतापर्यंत कोणत्याही संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी घेतलेली नाही. पाकिस्तानच्या एकूण जमिनीपैकी ४३ टक्के जमीन बलुचिस्तानमध्ये आहे. दरम्यान, मार्च महिन्यात, बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने गुडालर आणि पिरू कुनरीच्या पर्वतीय भागांजवळ सुमारे ५०० प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या जाफर एक्सप्रेसवर हल्ला केला होता. बलुच सैनिकांनी संपूर्ण ट्रेन हायजॅक केली होती.

# भारताला रशियाकडून मिळणार तमाल युद्धनौका

## ब्रह्मोस क्षेपणास्त्र डागण्यास सक्षम ● नौदलाची ताकद वाढणार




**नवी दिल्ली, ६ मे**

भारत रशियाकडून तमाल ही युद्धनौका खरेदी करणार आहे. करारानुसार २८ मे रोजी ही अत्याधुनिक युद्धनौका भारताला मिळणार आहे. या युद्धनौकेतून ब्रह्मोस क्षेपणास्त्रे डागणे शक्य असून इंडो-पॅसिफिकमध्ये भारतीय नौदलाची ताकद अधिक बळकट होणार आहे.

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने पूर्ण तयारी केली असून दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी तिन्ही दलाकडून तयारी केली जात आहे. अशातच भारत लवकरच जगातील सर्वात प्रगत मल्टी रोल स्टेल्थ गाइडेड मिसाइल फ्रिगेट्सपैकी एक असलेल्या तमाल ही युद्धनौका रशियाकडून खरेदी करणार आहे. युद्धनौका घातक ब्रह्मोस जहाजविरोधी क्षेपणास्त्र डागण्यास सक्षम आहे. २०१६ मध्ये झालेल्या भारत-रशिया करारात चार तमाल युद्धनौका खरेदी करण्याचा समावेश होता. ही युद्धनौका आता तयार असून जून २०२५ पर्यंत भारतीय नौदलाला मिळणार आहे.

**काय आहेत वैशिष्ट्ये**

- समुद्रात ५५ किमी प्रतितास वेग
- एकावेळी ३ हजार किमी. अंतर कापण्यास सक्षम
- यातून जहाजविरोधी ब्रम्होस क्षेपणास्त्र डागता येते
- पाणबुडीविरोधी युद्धासाठी विशेष डिझाईन
- युद्धनौकेत अँटी सबमरीन क्षेपणास्त्र आणि टॉर्पेडोदेखील आहे
- तमालचे वजन ३९०० टन, हेलिकॉप्टर तैनात करण्याची क्षमता

तमलच्या चाचण्या रशियामध्ये भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूर्ण झाल्या. मे महिन्याच्या अखेरीस २०० भारतीय नौदलाचे जवान रशियाला जातील आणि युद्धनौका हाताळण्याचे प्रशिक्षण घेतील. युद्धनौकेच्या चाचण्या अनेक आठवडे चालतील, त्यानंतर युद्धनौका भारतात आणली जाईल. रशियात निर्मिती करण्यात आलेल्या दोन युद्धनौकांपैकी एक आयएनएस तुशील भारतीय नौदलात सामील आहे. (वृत्तसंस्था)

# प्रदुषण करणाऱ्या वाहनांना इंधन बंदी : परिवहन मंत्री सरनाईक

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.६ मे-**

तांत्रिकदृष्ट्या सदोष वाहन चालवून प्रदूषण करणाऱ्या वाहनधारकांना यापुढे पेट्रोल पंपावर इंधन बंदी करण्यात विचार असुन, लवकरच अशा प्रकारचे धोरण आणण्यात येईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.



मंत्रालयात आपल्या दालनात घेतलेल्या मोटार परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये ते होते. यावेळी परिवहन विभागाचे सहसचिव किरण होळकर, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार व इतर अधिकारी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, दिवसेंदिवस रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढत चालली आहे. पारंपारिक इंधनावर चालणाऱ्या वाहनांमुळे वायु प्रदूषण वेगाने होते. त्यासाठी राज्य शासनाने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र प्रत्येक वाहनाला लागू केले आहे. तथापि, ही प्रमाणपत्रे वाहनधारक चुकीच्या पद्धतीने प्राप्त करून घेतात किंवा सदर प्रमाणपत्र बोगस असल्याच्या देखील तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सदोष असलेली वाहने रस्त्यावर आल्याने वायु प्रदूषणा मध्ये वाढ होत आहे. वाढत्या वायू प्रदूषणामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक वेगाने घसरत चालला आहे. त्याला बऱ्याच अंशी तांत्रिक दृष्ट्या सदोष वाहने जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यामुळे भविष्यात क्विक रिस्पॉन्स कोड आधारित प्रदूषण नियंत्रण पत्र देण्यात येणारा असून, प्रत्येक पेट्रोल पंपावर इंधन भरायला येणाऱ्या वाहनाची हवा गुणोत्तर निर्देशकांनुसार तपासणी केली जाईल. ज्यांच्याकडे वैद्य प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असेल त्यांनाच इंधन दिले जाईल. अशा प्रकारचे कडक नियम असणारे धोरण लवकरच परिवहन विभागामार्फत आणण्यात येणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेणे आवश्यक आहे. आपल्या पिढीने भावी पिढीचा देखील विचार केला पाहिजे! त्या पिढीला शुद्ध हवा मिळावी, असेही त्यांनी सांगितले.

# भारताने अमेरिकेला दिला शून्य कराचा प्रस्ताव

**नवी दिल्ली, ६ मे**

व्यापार कराराच्या चर्चेत भारताने दोन्ही देशांमधील स्टील, वाहनांचे सुटे भाग आणि औषधांवर शून्य कर आकारण्याचा प्रस्ताव अमेरिकेला दिला आहे. एका विशिष्ट मर्यादिपर्यंतच्या वस्तूंवर कोणतेही आयात शुल्क आकारले जाणार नाही, असे प्रस्तावात नमूद आहे.

आयात निर्धारित मर्यादिपेक्षा जास्त झाली तर सामान्य दराने शुल्क लागू होईल. हा प्रस्ताव वर्षाच्या अखेरीस द्विपक्षीय व्यापार करार पूर्ण करण्याच्या धोरणाचा एक भाग असल्याचे अधिकृत सूत्राने सांगितले. अमेरिकेने भारताच्या गुणवत्ता नियंत्रण आदेशांवर चिंता व्यक्त केली आहे आणि ते भारतातील निर्यातीतील अडथळा असल्याचे म्हटले आहे. यामध्ये पारदर्शकता नसल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे. त्याचवेळी, वैद्यकीय उपकरणे आणि रसायने यासारख्या क्षेत्राचा आढावा घेण्यास भारतीय अधिकाऱ्यांनी सहमती दर्शविली आहे. (वृत्तसंस्था)

# १०० दिवस झाले, आता १५० दिवसांचा दुसरा कार्यक्रम : मुख्यमंत्री फडणवीस

## विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणांवर भर

**मुंबई, ६ मे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा कार्यक्रम सर्व विभागांना दिला होता. या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद सर्वच विभागांनी दिल्यांनतर आता विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित १५० दिवसांचा पुन्हा नवा कार्यक्रम मुख्यमंत्र्यांनी विभागांसाठी जाहीर केला. याबाबतची घोषणा त्यांनी चौंडी येथील कार्यक्रमात केली.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शंभर दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आहे. राज्यातील सुमारे १२ हजार ५०० शासकीय कार्यालये या कार्यक्रमात सहभागी झाली. मंत्रालयातील ४८ विभाग या कार्यक्रमात सहभागी झाले. या विभागातील ९०२ विषयांवर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असताना ७०६ विषयांवर आधारित निर्णय घेऊन आवश्यक बदल करण्यात आले. यामध्ये काही धोरणात्मक बदल करण्यात आले तर काही प्रक्रियात्मक बदल करण्यात आले. या कार्यक्रमास मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे दीडशे दिवसांच्या कार्यक्रमाची सुरुवात आजपासून दोन ऑक्टोबरपर्यंत सुरू राहील. विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर हा कार्यक्रम आधारित असेल. विकसित महाराष्ट्र मुद्यांवर २०२९, २०३५ आणि २०४७ अशा तीन टप्प्यांत विभागाचे धोरण काय असेल याबाबत परिमाण निश्चित करण्याचे आहेत, असे त्यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### बलात्काराची तक्रार दाखल होताच एजाज खान फरार

**मुंबई** : बिग बॉस ७चा भाग असलेल्या अभिनेता एजाज खानविरुद्ध ४ मे रोजी बलात्काराची तक्रार दाखल करण्यात आली आहे. चारकोप पोलिसांनी अभिनेत्याचा शोध सुरू केला आहे, तथापि, तक्रार दाखल होताच एजाज खान फरार झाला आहे.

चारकोप पोलिस एजाज खानच्या शोधात त्याच्या घरी पोहोचले, परंतु तो घरी सापडला नाही. त्याच्या नंबरवर कॉल केले असता, तो नंबरही बंद आढळला. पोलिसांनी आता अभिनेत्याचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणात एजाज खानला लवकरच अटक होऊ शकते.

# पाकिस्तानातील पंजाबमधून भारतीय सीमेकडे लष्कराचा ताफा



**नवी दिल्ली, ६ मे**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत लवकरच दहशतवाद्यांविरोधात मोठी कारवाई करणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानकडूनही हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. आता पाकिस्तानी लष्कराचा मोठा ताफा भारतीय सीमेकडे तैनात करण्यात आल्याचा व्हिडीओ सध्या जोरदार व्हायरल होत आहे.

पाकिस्तानी पंजाबमधून भारतीय सीमेकडे मोठा लष्कराचा ताफा रवाना झाला आहे. पाकिस्तानी पंजाबमधील चिचवटनी, साहिवाल, पट्टोकी भागात हा ताफा तैनात करण्यात आला आहे. पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यामध्ये हलक्या तोफांचा देखील समावेश करण्यात आला आहे. भारत आणि पाकिस्तानच्या तणावाच्या पृष्ठभूमीवर आता पाकिस्तानकडून कुरापती सुरू असल्याचे दिसून येत आहे. तर भारताकडून देखील पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. त्यातच आता पाकिस्तानच्या कुरापतीचा व्हिडीओ समोर आला आहे. त्यामुळे आता पाकिस्तान देखील युद्धाच्या पृष्ठभूमीवर लष्कराने सज्ज होण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे.

ग्लोबल फायरपॉवर इंडेक्स २०२५ नुसार, भारताचे लष्कर जगातील चौथ्या क्रमांकाचे सर्वात शक्तिशाली सैन्य आहे. भारताकडे सध्या १४.५५ लाख सक्रिय सैनिक, ११.५५ लाख राखीव सैनिक, ४,६१४ रणगाडे, २,२२९ हवाई वाहने (त्यामध्ये सुमारे ६०० लढाऊ विमाने) आणि १५० युद्धनौका आहेत, ज्यामध्ये २ विमानवाहू युद्धनौकांचाही समावेश आहे. भारताकडे अग्नि-५, ब्रह्मोस यांसारखी प्रगत क्षेपणास्त्रे आणि उंचावरील युद्धाचा व्यापक अनुभव आहे. (वृत्तसंस्था)

# १९ माजी मंत्र्यांच्या सुरक्षेत कपात

**गृह मंत्रालयाचे पोलिसांना आदेश**

**नवी दिल्ली, ६ मे**

गृह मंत्रालयाने दिल्ली पोलिसांना १९ माजी राज्यमंत्र्यांचे सुरक्षा काढून घेण्याचे आदेश दिले आहेत. कार्यकाळ संपल्यानंतरही या मंत्र्यांकडे सुरक्षा तैनात होती. मात्र, केंद्र सरकारने भाजपा नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांची सुरक्षा सहा महिन्यांसाठी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

दिल्ली पोलिसांनी गृह मंत्रालयाकडे माजी राज्यमंत्री आणि खासदारांची यादी पाठवली होती ज्यांना त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही सुरक्षा कवच आहे. गेल्या वर्षी दिल्ली पोलिसांच्या सुरक्षा युनिटने केलेल्या ऑडिटनंतर यादी केली होती. ऑडिटमध्ये अनेक वरिष्ठ नेत्यांना कार्यकाळ संपल्यानंतरही सुरक्षा असल्याचे आढळले होते. ऑडिटनंतर, अनेक नेत्यांची सुरक्षा काढून घेण्यात आली. पुनरावलोकनात अनेक माजी राज्यमंत्री पदावर नसतानाही त्यांना अजूनही संरक्षण मिळत असल्याचे आढळले. अशा व्यक्तींची यादी गृह मंत्रालयाकडे पाठवण्यात आली होती, असे अधिकाऱ्याने सांगितले.

या पत्रात ज्यांची नावे आहेत त्यांना वाय-श्रेणी सुरक्षा कवच देण्यात आले आहे, त्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातील माजी राज्यमंत्री भानू प्रताप सिंग वर्मा, पंचायती राजचे माजी मंत्री बिरेंद्र सिंग, दळणवळणाचे माजी राज्यमंत्री देवुसिंह जेसिंगभाई चौहान, आदिवासी व्यवहाराचे माजी राज्यमंत्री जसवंतसिंह सुमनभाई भाभोर आणि परराष्ट्र व्यवहाराचे माजी राज्यमंत्री राजकुमार रंजन सिंग यांचा समावेश आहे. राज्यमंत्र्यांव्यतिरिक्त गृहमंत्रालयाच्या यादीत काही खासदार आणि वरिष्ठ न्यायाधीशांची नावे देखील समाविष्ट आहेत. काही न्यायाधीशांसाठी सुरक्षा कायम ठेवण्यात आली आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. माजी लष्करप्रमुख जनरल व्ही. के. सिंह आणि राज्यमंत्री अजय भट्ट यांची नावे देखील गृहमंत्रालयाला पाठवण्यात आली होती, परंतु त्यांची सुरक्षा कायम ठेवण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# राज्यातील सात तीर्थस्थळांच्या विकासासाठी ५ हजार ५०३ कोटी

**मुंबई, ६ मे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य आणि त्यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील विविध सात तीर्थस्थळांच्या विकासासाठी ५ हजार ५०३ कोटी रुपयांच्या आराखड्यांना मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. (तभा वृत्तसेवा)



**चोंडी येथील अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळः ६८१.३२ कोटी**

**अष्टविनायक गणपती मंदिरः १४७.८१ कोटी**





**श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिरः १ हजार ८६५ कोटी**

**श्री क्षेत्र ज्योतीबा मंदिरः २५९.५९ कोटी**





**श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर मंदिरः २७५ कोटी**

**कोल्हापूर श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिरः १ हजार ४४५ कोटी रुपये**





**श्री क्षेत्र माहूरगडः ८२९ कोटी**

# महिला सक्षमीकरणासाठी सरकार राबविणार आदिशक्ती अभियान

**राज्य मंत्रिमंडळ निर्णय**

## पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्यावर चित्रपट

**मुंबई, ६ मे**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान आणि आदिशक्ती पुरस्कार योजना सुरु करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविण्यात येत आहे. महिलांचे आरोग्याबाबत समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, माता मृत्यूचे प्रमाण कमी करणे. मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, पंचायत राज पध्दतीत महिला नेतृत्वाचा सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक सक्षम करणे आदी या अभियानाची उद्दिष्टे आहेत.

पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून, त्यांच्या जीवन चरित्रावर आधारित मराठीसह बहुभाषिक व्यावसायिक चित्रपट निर्मिती करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यांच्या कार्याची दृष्य स्वरुपात जागतिक स्तरावर ओळख निर्माण व्हावी, यासाठी मराठीसह विविध भाषांमध्ये चित्रपट निर्मिती करण्यात येणार आहे. या चित्रपटाचे प्रदर्शन जागतिक स्तरावर करण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते विशेष टपाल आवरणाचे प्रकाशन**

पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळी चौंडी येथे मंत्रिमंडळाच्याा बैठकीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशेष टपाल आवरणाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

**नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळासाठी प्राधिकरणाचा अध्यादेश**

**नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या अनुषंगाने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याच्या अध्यादेशास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.प्राधिकरणाबाबतच्या अध्यादेशास तसेच प्राधिकरणासाठी नवीन पदे तसेच प्रतिनियुक्तीने पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.**

**महत्वाचे निर्णय**

- ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन अंतर्गत मिशन महाग्रामला २०२९ पर्यंत मुदतवाढ
- अहिल्यानगर मध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करणार
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी बांधलेल्या तलाव, घाटांच्या जतनासाठी ७५ कोटींचा निधी
- इंग्रजी निवासी शाळेत प्रवेश योजनेस राजे यशवंतराव होळकर यांचे नाव
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वसतीगृह योजनेस नाव
- मुलींसाठी अहिल्या नगरला शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उभारणार

**शेअर बाजार**

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८०,६४१.०७ (-१५५.७७) |
| निफ्टी | २४,३७९.६० (-८१.५५) |



**सराफा**

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ९७,००० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९६,९०० रु. |

**मो. 9373107772**

**तापमान**

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ४०.२ | २६.६ |
| अमरावती | ३८.४ | -.- |
| भंडारा | ३७.६ | २७.४ |
| बुलडाणा | ३७.० | २७.४ |
| चंद्रपूर | ३९.० | २३.२ |
| गडचिरोली | ३८.० | २२.६ |
| गोंदिया | ३६.६ | १७.५ |
| नागपूर | ३९.० | २१.० |
| वर्धा | ३८.५ | २३.६ |
| वाशीम | ३९.५ | -.- |
| यवतमाळ | ३९.४ | २४.० |

## अग्रलेख...

# दुटप्पी पाकिस्तानला ‘जागतिक’ बत्ती

दक्षिण आशियातील भूराजनीती (जिओ-पॉलिटिक्स) जगाच्या इतर भागांपेक्षा वेगळी आहे. ती गुंतागुंतीची तर आहेच, शिवाय दहशतवादाचा प्रादुर्भाव या भागात अधिक आहे. एकीकडे जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रे, दहशतवाद कोणत्याही स्वरूपातला असो, त्याला विरोध करायचा आणि त्याचा नाश करायचा, या मताप्रत आलेली आहेत. भारताचा शेजारी पाकिस्तान मात्र अजून मध्ययुगात आहे. त्याला अजूनही असे वाटते की, दहशतवाद्यांना पोसून, चिथावून आणि हल्ले घडवून आपले काही भले होईल किंवा आपला धाक निर्माण होईल. तशातले काहीही घडत नाही, हे पाकिस्तानचे दुखणे. पहलगामनंतर भारताच्या भूमिकेने त्याचे दुखणे वाढले. तेच त्याने संयुक्त राष्ट्रांसमोर मांडले तर तेथेही त्याला बत्ती दिली गेली. भारताकडून आपली कोंडी केली जात असून, त्यामुळे प्रादेशिक स्थिरता व शांतता धोक्यात येईल, असा पाकिस्तानचा कांगावा होता. पहलगामच्या हल्ल्यामागे पाकिस्तान, त्यापूर्वी भारतात झालेल्या अनेक हल्ल्यांमध्ये त्याच देशाचा हात आणि तरीही आमचे सार्वभौमत्व टिकवण्यासाठी आम्ही लढत राहण्याच्या बाता हा केवढा मोठा शहाजोगपणा! पण, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत १५ पैकी १३ सदस्यांनी भारताला पाठिंबा दिला आणि त्यामुळे पाकिस्तानची पुन्हा एकदा जगात नाचक्की झाली. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद हा भारतीय उपखंडाच्या शांतता आणि सुरक्षिततेला धोका असल्याचे पाकिस्तान वगळता साऱ्या दुनियेला मान्य आहे. पहलगामचे धागेदोरे पाकिस्तानपर्यंत आहेत, हेही सर्वांना माहिती आहे. त्यामुळेच नद्यांचे पाणी रोखणे, आयातबंदी, रस्तेबंदी अशी अनेक पावले भारताने पाकिस्तानच्या विरोधात उचलली. या पृष्ठभूमीवर संयुक्त राष्ट्रांमध्ये जे घडले ते ऐतिहासिक होते. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या पंधरापैकी तेरा सदस्यांनी भारतासोबत एकजुटीने उभे राहून पाकिस्तानचे ढोंग थेट उघडेच पाडले. अशा लाजिरवाण्या परिस्थितीतही सुधारणा करण्यास किंवा माघार घेण्यास पाकिस्तान तयार दिसत नाही. सार्वभौमत्वाची पुंगी वाजविणे सुरूच आहे.

थोडे मागे वळून पाहिले तर असे दिसते की, तीन ते दशकांपासून भारत सातत्याने पाकिस्तानच्या कुरघोड्यांमुळे कुठल्या ना कुठल्या संघर्षात ओढला जातोय. १९९० मध्ये काश्मिरी पंडितांच्या पलायनापासून ते २००८ मध्ये मुंबईतील हल्ला आणि पुलवामा ते पहलगामपर्यंतच्या भयंकर हल्ल्यांपर्यंत, दहशतवादाला पाठिंबा देण्यात पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावेच भारताकडे आहेत. अमेरिकेच्या माजी परराष्ट्र मंत्री हिलरी क्लिंटन एकदा म्हणाल्या होत्या, ‘‘आपण घरात साप पाळत असू तर ते केवळ शेजाऱ्यांना चावतील अशी अपेक्षा करू शकत नाही... ते तुम्हालाही चावू शकतात...’’ दहशतवादी सापांनी भारताचे चावे घेतलेच, पण पाकिस्तानलाही सोडलेले नाही. दहशतवादाचा अभ्यास करणाऱ्या एका संस्थेने जारी केलेल्या अहवालानुसार, पाकिस्तानमध्ये लष्कर-ए-तैयबा (एलईटी), जैश-ए-मोहम्मद (जेईएम) आणि हिजबुल मुजाहिदीनसह ८० हून अधिक ज्ञात दहशतवादी संघटना आहेत. त्यातील बऱ्याच संघटनांना तिथल्या सरकारचे थेट वा अप्रत्यक्ष समर्थन आहे. त्यामुळेच दहशतवादी माजले आहेत. पहलगाममध्ये त्यांनी जे निर्घृण हत्याकांड घडविले, ते पशूंनाही लाजवेल एवढे भयंकर होते. त्यामागे जनरल मुनीरचे डोके होते, असे जाहीरच म्हटले जातेय. आयएसआयकडेही बोट दाखविले जातेय. अशा स्थितीत आत्मपरीक्षण करण्याऐवजी, सुधारणा करण्याऐवजी पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांकडे हस्तक्षेपाची मागणी केली. पण, शेवटी पाकिस्तानच तोंडघशी पडला. १५ पैकी १३ संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्य केवळ भारताच्या पाठीशी उभे राहिले नाही, तर सीमापार दहशतवादाला सतत पाठिंबा दिल्याबद्दल पाकिस्तानला फटकारलेही गेले. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी पहलगाम हल्ल्याचा स्पष्ट शब्दांत निषेध केला आणि दोन्ही राष्ट्रांना संयमाची गरज असल्याची आठवण करून दिली. त्यांचाही संदेश स्पष्ट होता की, पाकिस्तानने ओरडण्यापूर्वी स्वतःचे घर व्यवस्थित करावे. अशातही बेशरमपणाची हद्द म्हणजे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत पाकिस्तानची भूमिका आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाभोवती केंद्रित होती. ओसामा बिन लादेनला आश्रय देणार पाकिस्तान, दाऊद इब्राहिमला सांभाळणार पाकिस्तान, हाफिज सईदची काळजी घेणार पाकिस्तान, भारतात हल्ले घडवणाऱ्यांना मदत करणार पाकिस्तान, प्रोत्साहन देणार पाकिस्तान... आणि तरीही सार्वभौमत्वावर उच्चारवाने नारे देणार पाकिस्तान! भारताने स्वतःहून कधीही पाकिस्तानमध्ये हस्तक्षेप केला नाही. मात्र, आपल्या देशावर हल्ले झाले तर सर्जिकल स्ट्राईक करताना मागेपुढेही पाहिले नाही. भारताने आक्रमक म्हणून नव्हे तर आपल्या लोकांचे, आपल्या सीमांचे आणि आपल्या भविष्याचे रक्षण करण्यासाठी कारवाया केल्या. पाकिस्तानला आपल्या सीमांचे रक्षण करण्याचा अधिकार असेल, तर भारताचा स्वसंरक्षणाचा अधिकार आणि त्यासाठी पाकिस्तानच्या विरोधात कारवाई करण्याचा अधिकार अमान्य कसा करता येईल? दहशतवादाचा वापर स्टेट पॉलिसी अर्थात देशाचे धोरण म्हणून जो देश करीत असेल, त्याच्याबद्दल आंतरराष्ट्रीय समुदायात सहानुभूती असण्याचे कारण नाही. त्यामुळेच भारताला जगातून मिळणारा पाठिंबा सतत वाढतोय आणि पाकिस्तानची वाटचाल वेगाने बहिष्कृत राष्ट्र म्हणून कुख्यात होण्याच्या दिशेने सुरू आहे. पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी भारताने सिंधू करार स्थगित केला. धरण बांधणी आणि पाणी वळवण्याचे प्रकल्प जलद गतीने सुरू केले. त्यामुळे पाकिस्तानला अब्जावधी घनमीटर पाण्यापासून वंचित राहावे लागेल. भारताने सीमा बंद केल्या, व्यापार बंद केला. ही पावले म्हणजे युद्ध नव्हे. ती धोरणात्मक पावले आहेत आणि नैतिकतेच्या व आंतरराष्ट्रीय शांततेच्या नावाखाली पाकिस्तानचा आगाऊपणा खपवून घेतला जाणार नाही, याचा तो इशाराही आहे. भारत-पाक संबंधातील तणावाच्या केंद्रस्थानी एक ऐतिहासिक वास्तव आहे आणि ते असे की, आपल्यासोबत स्वतंत्र झालेला हा देश प्रगत जगाच्या बरोबरीने प्रगती करतोय आणि आपण निव्वळ रांगतोय, ही पाकिस्तानची भावना आहे. या भावनेला त्या देशात राजकीय, सांस्कृतिक, व्यावहारिक आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संस्थात्मक अधिष्ठान मिळालेले आहे. शालेय पाठ्यपुस्तकांपासून ते धर्मगुरूंच्या प्रवचनांपर्यंत भारत विरोध हेच पाकिस्तानचे जीवनध्येय आहे. पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय भारताला शाश्वत शत्रू मानतात, तसे दाखवितात आणि मलिदा खातात. लोकांना खायला अन्न नाही, पण त्यांचे संरक्षणाचे बजेट फुगत असते. जोपर्यंत लोकनिर्वाचित सरकार शांततेत, शहाणपणाने व व्यावहारिक निर्णय घेण्याच्या स्थितीत येत नाही, तोवर हे असेच चालत राहणार आहे. आणि ते असेच चालत राहणार असेल तर भारताला आणि जागतिक समुदायालाही जशास तसे वागावे लागणार आहे. आता जागतिक समुदायाने हेही लक्षात घेतेल पाहिजे की, दहशतवादाला समर्थन हा पाकिस्तानच्या राष्ट्रीय धोरणाचा भाग आहे. बंद दरवाज्याच्या मागे दहशतवाद्यांशी बोलायचे, त्यांना पोसायचे आणि जागतिक समुदायासमोर दहशतवादविरोधी युद्धात पाकिस्तान जगाच्या बरोबर आहे, असे सांगायचे असा हा दुटप्पी देश. त्याचा भारतविरोध वारंवार उफाळून येतो आणि कधी पुलवामा तर कधी पहलगाम घडते. २०१९ मध्ये कलम ३७० रद्द केल्यापासून जम्मू आणि काश्मीरची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारू लागली. अशा स्थितीत पहलगामचा हल्ला झाला. त्यामागे पाकिस्तानचा हात आहेच. एकीकडे काश्मिरींच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही लढतोय असे म्हणायचे आणि त्याच काश्मिरी लोकांच्या कल्याणात अडथळे आणायचे हाही पाकिस्तानी दुटप्पीपणा. पाकिस्तानच्या भूमीवर शेवटचा दहशतवादी जिवंत असेपर्यंत त्याने सार्वभौमत्वाच्या बाता करू नयेत. जिथे लोकशाहीच नावापुरती आहे, तिथे सार्वभौमत्वाच्या चिंधड्या उडणारच. त्या पाकिस्तानात उडाल्या आणि उडतच आहेत. या स्थितीत आपल्या देशातील निष्पापांचे जीव घेतले जात असतील तर सार्वभौमत्वाच्या किंवा नैतिकतेच्या गप्पा विसरून शत्रूचा गळा आवळणे हाच राजधर्म आहे आणि त्याच धर्माचे पालन भारत करीत आहे.


## विशेष

# उत्तम दरासाठी प्रक्रिया उद्योगावर हवा भर

प्रा. सुखदेव बखळे

जगभरात शेतांपासून दुकानांपर्यंत १३.२ टक्के अन्न वाया जाते. १७ टक्के अन्न दुकाने आणि घरांमधून फेकून दिले जाते. एकूणच, सुमारे ३० टक्के अन्न कधीच कोणाच्याही पोटात पोहोचत नाही. गरीब देशांमध्ये शेतातून गोदामे आणि दुकानांपर्यंत अन्न येताना वाया जाते. श्रीमंत देशांमधील बहुतेक अन्न घरांमध्ये वाया जाते, म्हणजेच लोक गरजेपेक्षा जास्त खरेदी करतात आणि उरलेले अन्न फेकून देतात. भारतात अन्न वाया जाण्याबाबत कोणतेही मोठे सरकारी सर्वेक्षण झालेले नाही; परंतु कापणीनंतर बनणारे किती अन्न वाया जाते हे शोधण्यासाठी काही सर्वेक्षणे करण्यात आली आहेत. ‘आयसीएआर-सीआयपीएचईटी’ ने २०१२ आणि २०१५ मध्ये सर्वेक्षण केले. ‘नॅबकॉन्स’ या संस्थेने २०२२ मध्ये सर्वेक्षण केले. त्याचे सर्वेक्षण अहवाल पाहिल्यास भारतात धान्य उत्पादनात खूप वाढ झाली आहे, हे लक्षात येते. १९६६-६७ मध्ये आपण ७४ दशलक्ष टन धान्याचे उत्पादन करायचो. ते २०२२-२३ मध्ये वाढून ३३० दशलक्ष टन झाले. आपण तांदळाचे मोठे निर्यातदारही आहोत. फळे आणि भाज्यांचे उत्पादनही वाढले आहे; पण उत्पादन वाढत असताना, तोटाही वाढत आहे. येथे यंत्रांचा वापर कमी आहे आणि गोदामातून दुकानांपर्यंत माल पोहोचवण्याची व्यवस्थाही कमकुवत आहे. या सर्वेक्षणातून दिसून आले आहे की, कापणीनंतरचे नुकसान थोडे कमी झाले आहे; परंतु तरीही अजून ते खूप जास्त आहे. ‘नॅबकॉन्स’च्या २०२२ च्या सर्वेक्षणानुसार २०२० ते २०२२ दरम्यान पिकांचे आणि शेतीशी संबंधित गोष्टींचे नुकसान झाल्यामुळे आपल्याला दरवर्षी १.५३ लाख कोटी रुपयांचे (१८.५ अब्ज डॉलर्स) नुकसान सहन करावे लागले आहे. भारतात धान्य, डाळी आणि तेलबियांचे नुकसान जागतिक पातळीपेक्षा जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शेतीमध्ये यंत्रसामुग्रीचा कमी वापर आणि साठवणूक आणि वाहतुकीच्या कमी सुविधा हे आहे. यामुळे या विषयाचा साकल्याने वेध घेणे आवश्यक आहे.

चीनमध्ये धान्याचे नुकसान फक्त २.२२ टक्के आहे. भारतात ते ४.४४ टक्के आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान तृणधान्ये आणि तेलबियांपेक्षा जास्त आहे; परंतु जागतिक सरासरीच्या तुलनेत भारतात हे नुकसान कमी आहे. गुणवत्तेचा ऱ्हास हीदेखील एक मोठी समस्या आहे. आपल्या देशात धान्य, डाळी आणि तेल उत्पादनांचे नुकसान खूप मोठे आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान थोडे कमी आहे. सर्वेक्षण फक्त नुकसानीचे प्रमाण सांगते; परंतु गुणवत्तेत किती नुकसान झाले हे यावरून कळत नाही. उदाहरणार्थ पीक कापले जाते, स्वच्छ केले जाते, घरी किंवा बाजारात नेले जाते आणि नंतर गोदामे आणि दुकानांमध्ये पोहोचवले जाते, तेव्हा गुणवत्तेतही खूप नुकसान होते. ‘आयसीएआर’ या संस्थेतर्फे धान्याच्या प्रमाणासोबत गुणवत्तेतील तोटा मोजण्याचा प्रयत्न केला. पंजाब, मध्यप्रदेश आणि बिहारमधील काही जिल्ह्यांमध्ये भात, गहू, मका आणि सोयाबीनवर हे सर्वेक्षण करण्यात आले. १२०० शेतकरी आणि ११६ बाजारपेठांतील लोकांकडून माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षणात सोयाबीनचे सर्वाधिक १५.३४ टक्के नुकसान झाल्याचे दिसून आले. गव्हाचे ७.८७ टक्के नुकसान झाले. धानाचे ६.३७ टक्के नुकसान झाले. मक्याचे ५.९५ टक्के नुकसान झाले. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे गव्हाच्या गुणवत्तेचे नुकसान २.२७ टक्के इतके होते. याचे कारण गव्हामध्ये ओलावा शोषून घेण्याची क्षमता असते. त्यामुळे गोदामात साठवल्यावर त्याची गुणवत्ता खराब होते. गुणवत्तेत घट होणे दर्शवते की पिकाची गुणवत्ता किती खालावली आहे.



शेतकऱ्यांच्या पातळीवर कापणीनंतरच्या नुकसानाची कारणे शोधण्यासाठी ‘आयसीआरआयईआर’ने भात पिकाची निवड केली आणि तीन राज्यांमधील ६०० भात उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले. त्यात आढळून आले की शेत जितके मोठे असेल तितके नुकसान कमी होते. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. कुटुंबप्रमुखाचे शिक्षण जितके जास्त असेल तितके नुकसान कमी होते. बाजारापासून जितके जास्त अंतर असेल तितके नुकसान जास्त. सर्वांत मोठी बाब म्हणजे लहान शेतांमध्ये जास्त नुकसान होते. शेतीचा आकार एका युनिटने वाढल्यास भाताचे नुकसान प्रति हेक्टर सात टक्क्यांनी कमी होते. भारतातील ८६ टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. त्यामुळे त्यांना जास्त नुकसान सहन करावे लागते. बिहारमध्ये लहान शेतांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे तेथे प्रति हेक्टर नुकसानही जास्त आहे. येथे लहान शेतकऱ्यांचे प्रति हेक्टर ३.५ किलो नुकसान होते, तर मोठ्या शेतकऱ्यांचे सुमारे १.१६ किलो नुकसान होते. दुसरे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांकडे यंत्रांची कमतरता आहे. विशेषतः कंबाईन हार्वेस्टरची कमतरता आहे. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. भारतात कापणीनंतर मोठ्या प्रमाणात धान्य वाया जाते. याला साठवणुकीचा अभाव, पारंपरिक धान्य व्यवस्थापन प्रणाली कारणीभूत आहे.

या समस्येवर अन्न प्रक्रिया हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. अन्न प्रक्रियेमुळे दीर्घकालीन साठवणुकीची गरज कमी होते. प्रक्रिया केलेले धान्य जास्त काळ टिकते, कारण ते खराब होण्याची शक्यता कमी असते.

सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने २०२१ मध्ये डेलॉइट नावाच्या कंपनीच्या मदतीने एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणातून दिसून आले की फळांच्या प्रक्रियेचे प्रमाण खूपच कमी म्हणजे ४.५ टक्के आहे. भाज्यांची परिस्थिती आणखी वाईट आहे. फक्त २.७ टक्के भाज्यांवर प्रक्रिया केली जाते. दूध प्रक्रियेचा स्तर (२१.१ टक्के) थोडा चांगला आहे. मांस प्रक्रियेची पातळी सर्वाधिक (३४.२ टक्के) आहे. माशांच्या प्रक्रियेची पातळी १५.४ टक्के आहे. अन्न प्रक्रिया क्षेत्राची वाढ केवळ अन्नपदार्थांपुरती मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न, रोजगाराच्या संधी आणि निर्यात बाजारपेठ यांना नवीन उंचीवर घेऊन जाते. अन्न प्रक्रिया वाढते, तेव्हा कच्च्या मालाची मागणीही वाढते. याचा अर्थ शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला भाव मिळतो. प्रक्रिया क्षेत्राच्या वाढीसह शेती केवळ उपजीविकेचे साधन बनत नाही, तर एक मोठा व्यवसायदेखील बनू शकते. भारतात अन्न आणि पेयांचा व्यवसाय सुमारे ३८० अब्ज डॉलर्सचा आहे आणि यापैकी ३२ टक्के अन्न प्रक्रिया क्षेत्रातून येते. २०१४ पासून हा व्यवसाय दरवर्षी आठ टक्के दराने वाढत आहे; पण याबाबत जाणवणारी एक मोठी समस्या म्हणजे अन्नपदार्थांची नासाडी. आपल्या देशात फळे आणि भाज्यांसारख्या सुमारे ४० टक्के नाशवंत वस्तू वाया जातात. ‘सीआयपीएचईटी’ या सरकारी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, आपल्याकडे सुमारे ४.६५ टक्के ते ५.९९ टक्के धान्य वाया जाते. फळे आणि भाज्यांमध्ये सुमारे ४.५८ टक्के ते १५.८८ टक्क्यांपर्यंत नासाडी होते. २०१० मध्ये डाळींची नासाडी ४.३ टक्क्यांवरून ६.१ टक्क्यांपर्यंत वाढली; २०१५ मध्ये ती ६.३६ टक्क्यांवरून ८.४१ टक्क्यांपर्यंत वाढली. या सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की पीक काढणीनंतर होणारे नुकसान ९२,६५१ कोटी रुपयांचे आहे. यामुळे शेतीमध्ये पायाभूत गुंतवणूक आणि अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देणे किती आवश्यक आहे, हे लक्षात येईल.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# न्यायालयात धाव घेण्याचा धंदा!

व्यवस्था आहे म्हणून तिचा मनमर्जीने वापर करण्याची वाईट सवय देशातल्या काही महाभागांना लागली आहे. कोणत्याही विषयात काही कारण आणि संबंध नसताना लुडबुड करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. जनहित म्हणा किंवा अन्य कोणत्या याचिकेच्या नावाने न्यायालयात धाव घेण्याचा धंदा सुरू झाला आहे. तसा हा धंदा नवा नाही पण, त्याचे प्रमाण वाढले आहे. फुकट प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे चांगले माध्यम अनेकांना मिळाले आहे. न्यायालय वारंवार अशा व्यक्तींना फटकारते तरी सुद्धा यांची खाज काही क्षमत नाही. जमले तर जमले, नाही जमले तरी प्रसिद्धी मिळतेच, हा भाव त्यांच्या मनात तयार झाला आहे. फालतू याचिका न्यायालयात येत असल्याने प्रकरणाची संख्याही वाढते आणि त्या सुनावणीला घेतल्या की वेळही वाया जातो. अशा याचिकांमधून वेगवेगळे चुकीचे विमर्श तयार होण्याला मदत होते. परिणामी समाजात दूषित वातावरण तयार होण्यास खतपाणी घातले जाते. याशिवाय काही चांगली कामे व निर्णय अशा याचिकांमुळे बाधित होता. या याचिका फक्त सर्वोच्च न्यायालयातच येतात असे नाही. उच्च न्यायालय व त्या खालच्या न्यायालयातही जाणारे देशात कमी नाही. विशिष्ट हेतूने प्रेरित आणि चर्चेत राहण्याच्या उद्देशाने हे होते.

अगदी अलिकडे म्हणजे २२ एप्रिलला पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. जम्मू आणि काश्मीर येथील दुर्गम व डोंगराळ भागात पर्यटकांच्या सुरक्षेची मागणी करणारी ही याचिका होती. न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या न्यायासनाने याचिकाकर्त्याला फटकारले. तुम्ही अशी जनहित याचिका का दाखल केली आहे? तुमचा खरा हेतू काय आहे? तुम्हाला या प्रकरणाची संवेदनशीलता समजत नाही का? असे अनेक प्रश्न न्या. सूर्यकांत यांनी विचारले. न्यायालयाने पुढे आपल्या आदेशात असेही म्हटले की, याचिकाकर्ता एकामागून एक जनहित याचिका दाखल करत आहे, ज्यात सार्वजनिक कारणांमध्ये कोणताही रस नसताना प्रसिद्धी मिळवणे हा प्राथमिक उद्देश असल्याचे दिसून येते. काल एक असाच निर्णय सर्वोच्च न्यायालयातून आला. मुघल सम्राट बहादूर शाह जफर (द्वितीय) यांच्या पणतूची विधवा सुलताना बेगमी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत लाल किल्ल्यावर दावा सांगितला होता. सुलताना यांनी कथितपणे बहादूर शाह जफर यांचे कायदेशीररीत्या वंशज असल्याचाही दावा केला होता. राजधानी दिल्लीतील लाल किल्ला हा मुघलांचा असून त्याचा ताबा दिला जावा, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यांची याचिका यापूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सोमवारी सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पी. व्ही. संजय कुमार यांच्या न्यायासनाने ही याचिका फेटाळून लावली. सदर याचिका गैरसमजुतीमधून करण्यात आली असल्याचे सरन्यायाधीश खन्ना म्हणाले. त्यांनी हसत हसत याचिकाकर्त्यांना म्हटले की, तुम्ही फक्त लाल किल्ला का मागत आहात? फतेहपूर सिक्री आणि ताजमहाल का नाही मागत? यावेळी याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, दिल्ली उच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळताना मेरिटचा विचार केलेला नव्हता तर याचिका उशिरा दाखल केल्यामुळे फेटाळली होती. सर्वोच्च न्यायालयानेही असाच विचार करावा, अशी विनंती त्यांनी केली. यावर न्यायासनाने मेरिटच्या आधारावरच ही याचिका फेटाळली आहे. सदर याचिका चुकीची आणि निरर्थक असल्यामुळे ती विचारात घेतली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करण्यात आले. देशभरातल्या ऐतिहासिक वास्तू पुरातत्त्व विभागाच्या मालकीच्या झाल्या आहे. हे माहीत असून सुद्धा खटाटोप झालाच.

समजावी म्हणून उपरोक्त दोन उदाहरणे नमूद केली आहेत. आजपर्यंत अशी अनेक प्रकरणे घडली आहेत. न्यायालयाने अनेकांना तीव्र शब्दांत फटकारले आहे. काहींना तर दंडही ठोठावला आहे. पण, पुढच्याला ठेच मागचा शहाणा हे समजून घेण्याची तयारीच नसल्याने पुढचा आणि मागचा वारंवार ठेच बसून सुद्धा सुधरताना दिसत नाही. अशा याचिकांची दाखल होण्याच्या पायरीवरच काटेकोरपणे तपासणी व्हायला हवी. त्यात खरचं काही दम असेल तरच त्या पुढे सुनावणीसाठी आल्या पाहिजेत. न्यायालयांच्या पण हे लक्षात आले आहे. केंद्र व राज्य सरकारांच्याही ते लक्षात येत आहे. जनतेलाही ते समजत आहे. यात सरकार काही करू शकणार नाही. भविष्यात न्यायपालिकाच यासाठी काही कडक नियम तयार करेल, अशी शक्यता आता खूप वाढली आहे. प्रतीक्षा करू या!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# विमर्श आणि नॅरेटिव्ह!

प्रा. दिलीप जोशी

गत एक दोन वर्षात ‘नॅरेटिव्ह’ हा शब्द सर्वत्र गाजतोय. नॅरेटिव्ह किंवा फेक नॅरेटिव्ह सेट केल्यामुळे सत्ता हादरल्याचे आपण अनुभवले. त्यामुळे नॅरेटिव्हचा धसकाही अनेकांनी घेतला. काय आहे नॅरेटिव्ह? सध्याच्या परिस्थितीचा विचार करता जे खरे नाही तेच सत्य आहे हे लोकांच्या मनावर ठसविणे म्हणजे नॅरेटिव्ह होय. हीच व्याख्या मनामनात रुजली आहे. खोट्याला सत्याचा मुखवटा लावून लोकमनावर भुरळ घालून ठसा उमवटवणे म्हणजे नॅरेटिव्ह. खरं तर मूलतः नॅरेटिव्ह म्हणजे नाटक, कविसंमेलने, व्याख्याने, पथनाट्ये, सभा यांच्यासारख्या लोकरंजन माध्यमातून मुद्दा लोकमनावर ठसविणे अशा व्यापक आणि सकारात्मक अर्थाने नॅरेटिव्ह असायचा. पण हल्ली खोट्याला खरे भासविणे या फेक नॅरेटिव्हलाच नॅरेटिव्ह म्हणून प्रक्षेपित केले जात आहे. त्याअर्थाने नॅरेटिव्ह नकारात्मक आणि असत्यावर आधारित बनला. नॅरेटिव्ह डाव्या विचारांच्या किंवा वोकीझमवाल्या अर्ध्या हळकुंडात पिवळ्या झालेल्यांनी फोफावला.

याउलट उजव्यांचा विमर्श विषय आहे. विमर्श सत्यावर आधारित असून सत्य प्रस्थापित करणे म्हणजे विमर्श. सध्या विमर्श हा विषय देखील बराच चर्चेत असून अनेक कार्यकर्त्यांच्या मनात अजूनही स्पष्टता या दोन्ही विषयांबाबत दिसत नाही. सध्या सर्वच उजव्या संघटनांनी विमर्श विषयासाठी स्वतंत्र विचार करणारी चमू निर्माण केली. त्यापैकी अनेकांशी माझी चर्चा झाली. पण बहुतेकांचा संभ्रमाचा सूर दिसला. काही मित्रांनी केलेल्या सूचनेनुसार विमर्श बनाम नॅरेटिव्ह हा विषय मांडतोय. विमर्श समजून घ्यायचा असेल तर त्याआधी विचार समजून घेणे जरुरी आहे. आपण विचारविमर्श हा शब्द व्यवहारात नेहमी वापरतो. साधारणतः एकापेक्षा अधिक व्यक्ती जेव्हा चर्चा करतात तिथे आपण विचारविनिमय किंवा विचारविमर्श शब्द वापरतो.

पहिले आपण विचार म्हणजे काय? ते पाहू!

जो विषय, घटना, वस्तू त्याचे नाव काढताच त्याचे जे स्वरूप डोळ्यासमोर येते, त्याबाबतची संकल्पना आपल्या बुद्धीला ज्ञात होते त्याला विचार म्हणतात. उदा. गाय हा शब्द उच्चारला तरी तिचे स्वरूप आपल्या डोळ्यासमोर येते. लहानपणापासून पाहून पाहून वारंवारितेच्या संस्कारातून गाय हा वैचारिक ठसा मेंदूवर बसला. भगवान श्रीराम, श्रीकृष्ण आपण पाहिले नसले तरी चित्र, मूर्ती पाहून आपला तो विचार पक्का आहे. परिस, अमृत या बाबी आपण पाहिल्या नाही तरी त्यांच्याबाबतचा विचार मेंदूने निश्चित केला आहे.

विमर्श म्हणजे एखाद्या तत्त्वाला समजून उमजून, तपासून, पारखून तथ्यापर्यंत पोचणे होय. विमर्श म्हणजे एखाद्या गोष्टीचा छडा लावणे. विमर्श म्हणजे विवेचन, समीक्षा, तर्क, परीक्षण आणि बुद्धीच्या कसोटीवर वास्तविकतेपर्यंत पोचणे. विमर्श म्हणजे गुणदोष, टीकाटिप्पणी याची मीमांसा. एखाद्या विषयाचा पक्ष आणि विपक्ष यातील वास्तव समजून तथ्यापर्यंत जाणे. विमर्श म्हणजे तथ्यानुसंधान. बऱ्याचवेळा नॅरेटिव्ह म्हणजे विमर्श असा अनेकांचा गैरसमज आहे. आता नॅरेटिव्ह हा विमर्शचा दुसरा ध्रुव बनला आहे. विमर्श हा परकोटीचा सकारात्मक आणि विधायक विचार आहे. विमर्शचा एक छोटा भाग जो नकारात्मक, असत्यावर आधारित असतो त्याला हल्ली नॅरेटिव्ह म्हणतात.

विचार हा मेंदूवर ठसलेला असतो पण विमर्श मात्र अनेकांच्या वैचारिक चयापचयातून प्रस्थापित करावा लागतो. भारतीय संस्कृतीत ऋषिमुनींनी संवादातून भारतीय विमर्श प्रस्थापित केला. तो शाश्वत, अभंग आणि अभेद्य आहे. पण त्यावरही आघात करण्यात काही अंशी काहीजण यशस्वी झालेत.

विमर्श तीन प्रकारे विचारात घेतला जातो.

१) शाश्वत विमर्श, २) तात्कालिक विमर्श, ३) आपल्याला प्रस्थापित करायचा विमर्श. शाश्वत विमर्श म्हणजे ज्यात आपण परिवर्तन करू शकत नाही. उदा. सूर्य पूर्वेला उगवतो. हा विचार शाश्वत आहे. पण शाश्वत विचारांना देखील प्रस्थापित करावे लागते. भारत एक राष्ट्र आहे, हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व, वसुधैव कुटुंबकम् हा भारतीय विचार आहे. ‘हिंदवः सोदराः सर्वे’ हा शाश्वत विमर्श आहे पण, कारणे काहीही असोत, दुर्दैवाने झाकाळला गेला. आता बुजला गेलेला सत्यविचार पुन्हा प्रस्थापित करणे म्हणजे शाश्वत विमर्श होय.

विमर्शचा दुसरा प्रकार तात्कालिक विमर्श होय. यामध्ये चालू स्थितीत एखादा चुकीचा विचार (नॅरेटिव्ह ) कोणाकडून प्रस्थापित होत असेल तर त्यावर तातडीने प्रतिक्रिया हा तात्कालिक विमर्श होय. बहुतेक वेळा हा विमर्श नॅरेटिव्हच्या विरोधातील असतो. हा विमर्श प्रस्थापित करण्यासाठी बुद्धी, शक्ती आणि पराक्रम लागतो. अनुल्लेख, कंटाळा, आळस आणि काही होत नाही हा फाजील आत्मविश्वास तात्कालिक विमर्शसाठी घातक आहे. उदा. संविधान बदलणार हा फेक नॅरेटिव्ह का स्थापित झाला? तर याबाबत आपण पूर्णतः आळशी आणि गाफील होतो. त्यांनी नेसूची लंगोटी सोडून नेली आणि आपण दिगंबर झालो तरी आपण ‘चारसौ पार’ वरच गुंतून होतो. हा तात्कालिक विमर्श त्वरित प्रस्थापित करणे जरुरीचे आहे. सध्या जोरात विचार विरोधकांकडून मांडला जातो. तो म्हणजे हिंदू विचार म्हणजे केवळ संघविचार, असा विचार पुढे जाऊन हिंदू म्हणजे फक्त संघवाले बाकी सर्व इतर कोणीतरी. हा सर्वांत घातक विचार प्रक्षेपित होत आहे. हे षडयंत्र सुरू झाले आहे. यावर वेळीच उपाययोजना हा तात्कालिक विमर्श होय. मी विरोधी विचारकांशीही चर्चा करीत असतो. शिक्षणातील पंचकोष विचार हा विद्याभारतीचा विचार आहे म्हणून त्याला ते भगवीकरण म्हणून विरोध करतात. पण पंचकोष हा तैत्तिरीय उपनिषद, शंकरभाष्य, विवेकसिंधूमधील जुना विचार आहे. विद्या भारतीने त्यातून पंचकोष घेतला. स्वतः निर्माण केला नाही हे पोचणे जरुरी आहे.

तिसरा प्रकार म्हणजे विमर्श जो आम्हाला प्रस्थापित करायचा.

उदा. वाढदिवसाला केक हा आपल्या घरात इतका शिरला की तो काढणे कठीण. मम्मी, डॅडी, आँटी यात मोठेपणा. इंग्रजांनी घर ताब्यात घेतले. मुस्लिमांनी अनेक वर्ष इथे राज्य केले पण ते संस्कृती म्हणून आम्मीजान, अब्बूजान कधीच आपल्या घरात अतिक्रमित झाले नाही पण मम्मी, डॅड घुसले. पुन्हा आई-बाबा, काका-काकू, मावशी घरात प्रयत्नपूर्वक प्रस्थास्पित करणे, वाढदिवसाला केक न कापता ओवाळणे असे विमर्श आपल्याला प्रस्थापित करावे लागणार आहेत. विमर्श हा सत्यावर आधारित असल्याने त्यासाठी मेहनत घ्यावी लागते. मात्र नॅरेटिव्ह असत्यावर आधारित असल्याने तो सहज फोफावतो. स्पष्टच सांगायचं तर डाव्यांचा नॅरेटिव्ह आणि उजव्यांचा विमर्श असे माझे मत आहे. नॅरेटिव्हचे आयुष्य अल्प असले तरी त्याचा डंख विंचवासारखा त्वरित घातक ठरतो. विमर्श मात्र दीर्घायुत्वाय आणि शाश्वत असला तरी त्यासाठी प्रयत्न आणि वाट पाहणे (वेटिंग पीरिएड) महत्त्वाचा आहे. पण नॅरेटिव्हचा उतारा विमर्शच आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### घुसखोरांना त्वरित हाकला

गुजरात राज्यातील चंडोल गावी अनधिकृतपणे शासकीय जमिनी बळकावून शेकडो घरे बांधणारा पठाण नावाचा गुंड पकडला गेला. त्याने बांगलादेशी मुस्लिमांकडून २० हजार रुपये घेऊन त्यांना जागा दिली. या गैरव्यवहारात त्याने कोट्यवधी रुपयांची मालमत्ता उभारली आहे. गुजरात शासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेऊन ती कॉलनी पूर्णपणे उद्ध्वस्त केली असल्याने इतरांचे धाबे दणाणले आहेत. आपल्या भारतात अशा जमिनी बळकावणारे हजारो पठाण प्रत्येक शहरात असून त्यांच्यावर सुद्धा कडक कारवाई होणे गरजेचे आहे. काँग्रेसच्या राजवटीत अशा भू-माफियांना स्थानिक नेते आणि पोलिसांचे संरक्षण असल्याने ते निगरगट्ट झाले आणि त्यांनी आपली साखळी तयार करून बांगलादेशी घुसखोरांकडून पैसे घेऊन शासकीय जमिनी बळकावल्या आहेत.

जमीन आणि महसूल हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीतील असल्याने केंद्रीय कायदे लागू पडत नाहीत. केंद्राची जमीन असेल तर केंद्रीय शासन विभाग कारवाई करू शकते. मात्र स्थानिक राजकीय नेते हे भ्रष्ट असतील तर त्या जमिनी देखील या गुंडाच्या तावडीत जातात. अशा अनधिकृत वस्त्यांमध्ये अनेक गैरकृत्ये फोफावतात आणि त्यांचा समाजाला उपद्रव होतो. यात बहुतांशी बांगलादेश मुस्लिम असतात, हे अनेक वेळेस सिद्ध झाले आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना परत पाठविण्यासाठी जी तीव्र कारवाई केली तशाच प्रकारची या घुसखोरांविरोधात देखील करावी. तेव्हाच त्यांचे डोके ठिकाणावर येईल, अन्यथा ‘नाकापेक्षा मोती जड’’ अशी स्थिती यायला जास्त वेळ लागणार नाही, असे वाटते.

**संजय पाठक**/नागपूर

### वेग श्रीमंतांचा, बळी गरिबांचा

पुण्याच्या नवले ब्रिज परिसरात नुकतीच घडलेली एक हृदयद्रावक दुर्घटना, समाजातल्या वाढत्या असमतोलाची आणि बेदरकार वृत्तीची ओरडून जाणीव करून देते. एका मद्यधुंद तरुणाने भरधाव वेगाने गाडी चालवून एका पादचारी गरीब तरुणाला उडवले. हा तरुण जागीच ठार झाला. अपघात करणारा तरुण श्रीमंत घरातला असून, त्याच्याकडे महागडी कार आणि त्याचा वापर करण्याचं स्वातंत्र्यही होतं. दुसरीकडे, बळी गेलेला तरुण आपल्या रोजंदारीसाठी चालत निघालेला सामान्य कामगार होता. ही घटना ‘वेग श्रीमंतीचा, बळी गरिबांचा’ या वाक्याचं जिवंत उदाहरण आहे. आपल्याकडे अशा अपघातांची मालिका सुरूच आहे. बेफाम वेग, मद्यप्राशन आणि कायद्याचा धाक न वाटणं ही तरुण पिढीच्या एका वर्गाची आजची ओळख झाली आहे. दुसरीकडे, सार्वजनिक रस्त्यावर चालणाऱ्या सामान्य नागरिकांसाठी सुरक्षा ही फक्त कागदावरच उरली आहे. असे प्रकार केवळ अपघात नसून सामाजिक अन्यायाचे मूर्त रूप आहेत. श्रीमंती आणि सत्तेच्या बळावर कायद्यालाही वाकवता येते, ही धारणा जर समाजात रुजली, तर हा लोकशाहीसाठी मोठा धोका ठरेल. अशा प्रकरणांमध्ये तत्काळ आणि कठोर कारवाई झाली पाहिजे. फक्त वाहनचालक नव्हे, तर पालक, मित्रपरिवार, आणि संबंधित यंत्रणाही जबाबदार धरल्या पाहिजेत.

शहराच्या वाढत्या वाहनसंख्येवर, अपुऱ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर आणि निष्क्रिय वाहतूक नियंत्रणावरही लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक बळी हे एक जग हरवलेली असते आणि त्या मागे राहतात प्रश्न हा मृत्यू टाळता आला असता का? समाज म्हणून, प्रशासन म्हणून आणि व्यक्ती म्हणून आपली जबाबदारी आहे की अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत. अन्यथा, प्रत्येक वेळी रस्त्यावर पडलेलं रक्त हे केवळ अपघाताचं नव्हे, तर आपल्या सामूहिक अपयशाचं प्रतीक ठरेल.

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

### दोन देशांच्या दोन तऱ्हा

फाळणी झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन शेजारी देशांची वेगवेगळी वाटचाल सुरू झाली. पाकिस्तानने स्वतःला इस्लामिक राष्ट्र म्हणून घोषित करत आपल्या राष्ट्रीय ओळखीचा पाया धर्मावर ठेवला. यामुळेच पुढील दशकांत पाकिस्तानात धार्मिक कट्टरतेचा उदय झाला आणि जिहाद या संकल्पनेचा वापर केवळ धार्मिक नव्हे, तर राजकीय आणि जिहाद लष्करी हेतूंसाठीही केला गेला. काश्मीरमध्ये हस्तक्षेप, आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांना आश्रय देण्याच्या घटना हे याचे ठळक प्रमाण आहेत. याउलट भारताने आपल्या संविधानात विविधतेत एकता ही मूल्यव्यवस्था स्वीकारली. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशा विविध धर्मांच्या लोकांनी इथे सहजीवनाचा धडा गिरवला.

भाषिक, सांस्कृतिक आणि प्रांतीय विविधता असूनही भारताने लोकशाही व्यवस्थेचा पाया घट्ट ठेवत सामाजिक सलोखा साधण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानात जिहाद ही संकल्पना राष्ट्रवादाचा एक भाग झाली, तर भारतात सर्वधर्म समभाव ही विचारधारा राष्ट्रीय एकतेचे बळ बनली. परिणामी, पाकिस्तान आंतरराष्ट्रीय मंचावर कट्टरतेचा आणि अस्थिरतेचा चेहरा बनत गेला, तर भारताने शांतता, एकोपा आणि सर्वसमावेशक तत्त्व या बळावर प्रगतीचा मार्ग स्वीकारला. आजही हे दोन देश एकमेकांच्या पूर्ण विरुद्ध सामाजिक प्रयोगांचे जणू उदाहरण आहेत. जेथे एक देश धार्मिक उग्रतेच्या दलदलीत अडकला आहे, तर दुसरा देश त्याच विविधतेच्या नात्यांमध्ये बळ शोधत आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७




## उपमुख्यमंत्री अजितदादा सर्व समाज घटकांना न्याय देणारे नेतृत्व : आ. नाईकवाडी

### राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

उपमुख्यमंत्री अजितदादा सर्व समाज घटकांना न्याय देणारे नेतृत्व आहे, असे प्रतिपादन आमदार ईद्रीसभाई नाईकवाडी यांनी केले.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पसंख्यांक विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार इद्रीसभाई नाईकवाडी हे महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. ते सोलापूर दौऱ्यावर आले असता राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर अल्पसंख्यांक नेते बाबा भाई सालार तसेच सोलापूर शहर अल्पसंख्यांक अध्यक्ष अमीर शेख कार्याध्यक्ष संजीव मोरे यांनी संघटनात्मक आढावा बैठकीचे आयोजन केले होते

उत्साहात जल्लोषात अल्पसंख्यांक विभागाचा ही आढावा बैठक नई जिंदगी येथील मरहबा फंक्शन हॉल येथे संपन्न झाली उपमुख्यमंत्री अजित पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वात सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्व फ्रंटल सेलच्या माध्यमातून संघटन मजबूत करीत आहे. आमदार नाईकवाडी यांचे पक्षाच्या वतीने मनपूर्वक स्वागत असून अल्पसंख्यांक विभागाचे सोलापूरातील काम अतिशय उत्कृष्ट असून राष्ट्रीय नेते अजितदादा यांच्यावर विश्वास ठेवून अनेक पक्षाचे साठहून अधिक पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यांचे देखील मनपूर्वक स्वागत करतो असे जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी आपल्या मनोगत व्यक्त करीत बाबा सालार तसेच अमीर शेख कार्याध्यक्ष संजीव मोरे यांच्या कामाचे कौतुक केले. पक्ष म्हणून निश्चितच आम्ही त्याच्या सोबत असून अल्पसंख्यांक विभागाने अनेक चांगले उपक्रम राबवले आहेत त्यांच्या पुढील कार्यास देखील शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी अल्पसंख्यांक महाराष्ट्र कार्याध्यक्ष मुबीन सिद्धीकी, महाराष्ट्र प्रसिद्धी प्रमुख ताहेर बेग जनरल सेक्रेटरी प्रमोद दादा भोसले शहर जिल्हाध्यक्ष आमिर शेख, जिल्हा कार्याध्यक्ष संजीव मोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष नजिर इनाम दार ग्रामीण जिल्हा कार्याध्यक्ष इस्माईल फुलारी, अल्पसंख्याक राष्ट्रीय सरचिटणीस फारुख मटके, अल्पसंख्यांक महाराष्ट्र महिला पदाधिकारी सायरा शेख, ओबीसी सेल कार्याध्यक्ष शेख, असंघटित कामगार सेलचे अध्यक्ष मार्तंड शिंगारे, कार्याध्यक्ष संजू सांगळे, वाहतूक सेल अध्यक्ष इरफान शेख, मध्य विधानसभा अध्यक्ष नय्युम सालार, दक्षिण विधानसभा अध्यक्ष,अशपाक कुरेशी, उत्तर विधानसभा अध्यक्ष नवाज शेख, अल्पसंख्यांक जनरल सेक्रेटरी मूव्हीज मुल्ला, अल्पसंख्यांक शहर पक्ष संघटक जहीर शेख, शहर उपाध्यक्ष समदानी मत्तेखाने, इस्माईल शेख, बब्बू पैलवान शेख,याकूब नवगिरे, सचिन पारवे सर, प्रकाश चंद्रकर, हणूकमिंगे, प्रकाश शिंदे, मुसेब शेख, ॲड, सलीम नदाफ, डेव्हिड खुराडे, रियाज अत्तार आदी उपस्थित होते.

# अल्पसंख्यांक मुलांना शिक्षणाच्या आवश्यक सुविधा पुरविणार

### आ. इद्रिस नाईकवाडी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव दि. ६ मे -**

अल्पसंख्याक समाजातील मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण प्रचंड मोठ्या प्रमाणात घटलेले आहे. त्यामुळे त्या समाजाचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकास खुटलेला आहे. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी अल्पसंख्याक शाळा व मदरसा यांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इद्रिस नाईकवाडी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिले.



> मौलाना आझाद महामंडळाची स्थापना केली त्यावेळी त्यामध्ये कर्ज देण्यासाठी काही अटी टाकण्यात आलेल्या होत्या. मात्र बदलत्या काळात त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असून या विशेष म्हणजे अल्पसंख्याक समाज जोपर्यंत शिक्षण घेत नाही. तोपर्यंत समाजाची प्रगती होणार नसल्याचे त्यांनी नमूद केले. अल्पसंख्यांक शाळावर काही इतर भाषिक शिक्षकांची पोर्टलद्वारे भरती केली गेली आहे. मात्र, त्या शाळांमध्ये उर्दू भाषेचे विद्यार्थी असून त्यांना उर्दू या मातृभाषेतच शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून यापुढे फक्त उर्दू माध्यमाचे शिक्षक भरती केले जाणार असल्याचे आ. नाईकवाडी यांनी सांगितले.

धाराशिव शहरातील शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, जिल्हाध्यक्ष असद पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दीन मशायक, प्रदेश उपाध्यक्ष शफी शेख, इफ्तेखार मुजावर, धाराशिव तालुकाध्यक्ष नासिर शेख आदी उपस्थित होते.

आ नाईकवाडी म्हणाले की, महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाच्या प्रॉपर्टी म्हणजेच कब्रस्तान व इतर जागांचे संरक्षित करण्यासाठी संबंधित आदेश दिले असून येत्या २०२५-२६ व २०२६-२७ या दोन राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील मालमत्ता विकास आराखडा तयार करून त्याचा विकासात्मक कायापालट करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जुलै २०२३ मध्ये पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सत्तेमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्यास दीड वर्ष झाले असून या कालावधीत अल्पसंख्याक समाजासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली असल्याचे सांगत ते म्हणाले की, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजासाठी कोणकोणत्या प्रकारची विकासाची कामे केली तसेच भविष्यात करण्यात येणार आहेत याची माहिती सर्व समाज बांधवांना माहिती व्हावी यासाठी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मी कालपासून राज्यात विकास कामे कोणती केली याची माहिती मिळावी? पक्षाची भूमिका समजावी यासाठी दौरा करीत असून त्यास कार्यकर्त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्यात सहा पक्ष असून त्यापैकी तीन पक्ष सत्तेत आहेत. मात्र अल्पसंख्याक समाजासाठी फक्त राष्ट्रवादी काँग्रेस चांगले काम करीत असल्याचा दावा त्यांनी केला.

# सिंधू विहार गणपती मंदिर परिसर सुशोभीकरणाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**



महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याचे प्रधानसचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांच्या सहकार्यामधून सिंधू विहार जुळे सोलापूर येथील गणपती मंदिर व परिसर सुशोभीकरण शुभारंभ आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आ. देशमुख म्हणाले, सिंधू विहारच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. तसेच महिला व तरुण यांच्या विकासासाठी सदैव मदत करणार असल्याचेही ते म्हणाले. याप्रसंगी या कार्यक्रमाचे संयोजक व सदर कामासाठी ५० लाखांचा निधी मंजूरीबाबत विशेष प्रयत्न केलेल्या सामाजिक कार्यकर्त्या व दुर्गा महिला बचत गटाच्या सचिव जयश्री पोतदार, दक्षिण सोलापूर तालुक्याचे माजी सभापती डॉ. चनगोंडा हविनाळे, विशाल गायकवाड, महेश देवकर, प्रकाश मोकाशी, डॉ. वेणा पवार, महादेवप्पा चिंचोळे, बाबुराव पोतदार, संजय पोतदार व अनिल पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी सिंधू विहारमधील सेवानिवृत्त झालेले प्रकाश पाटील, रघुनाथ ढाळे, शेवाळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजयकुमार विजापूरे, शटगार, नागेश घोडके, सिध्देश्वर चिमलगीकर, मोहन साळुंके, शेवाळे, दत्तात्रय वाघमारे, मोहन ताटे यांनी परिश्रम घेतले.

# इंग्रजी निवासी शाळेत प्रवेश योजनेस राजे यशवंतराव होळकर यांचे नाव

**मुंबई, दि. ६ मार्च-**

धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव देण्याच्या निर्णयाला मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राजे यशवंतराव होळकर यांनी १७९७ ते १८११ या काळात शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक कामे केली. गुरुकुलसारख्या पारंपारिक शिक्षणाला चालना दिली. लष्करी शिक्षणात शिस्त, नीती आणि नेतृत्त्वगुणांचा समावेश केला. शिक्षण सर्वांसाठी खुले केले. राजवाड्यात मुलींसाठी शिक्षणाच्या सुविधा उभारल्या.

# मिशन महाग्रामला २०२९ पर्यंत मुदतवाढ

**मुंबई, दि. ६ मे-**

ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या मिशन महाग्राम कार्यक्रमाला २०२९ पर्यंत मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुदतवाढ देण्यात आली. ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनच्या ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान टप्पा दोन म्हणजेच मिशन महाग्राम राबविण्यास २०२५पर्यंत मान्यता देण्यात आली होती. या मिशन महाग्रामला खासगी क्षेत्रातील कंपन्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण भागातील मुलभूत गरजांवर लक्ष केंद्रीत करुन कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून शाश्वत विकास करण्याचा उद्देश आहे.

**मध्य रेल्वे**

**प्रकल्प पर्यवेक्षण सेवा प्रदान करणे**

उप-सीएसटीई प्रकल्प बीएसएल, पहिला मजला, डीआरएम कार्यालय मध्य रेल्वे, भुसावळ-425201, भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खुल्या निविदा मागवत आहे. 02/06/2025 रोजी 15.00 वाजेपर्यंत निविदा सादर करण्याची वेळ, तारीख आणि तारीख आणि त्याच दिवशी 15.15 वाजता उघडले जाईल. कामाचे नाव: (i) मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाच्या अधिकारक्षेत्रात स्थिर कवच उपकरणांचे सर्वेक्षण, डिझाइन, पुरवठा स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे आणि इतर संबंधित कामांसाठी प्रकल्प पर्यवेक्षण सेवा एजन्सी प्रदान करणे. आणि (ii) भुसावळ विभागाच्या मध्य रेल्वेवरील कवच आणि इतर संबंधित कामांसाठी टॉवर्सचे सर्वेक्षण, डिझाइन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे. अंदाजे किंमत: रु.5,98,02,509.67/-EMD: रु.44,9000/-, उघडण्याची तारीख: 02/06/2025, वैधता: 120 दिवस, पूर्ण कालावधी: ६६ महिने. ही निविदा सार्वजनिक खरेदी धोरण (मेक इन इंडिया) आदेश 2017, दिनांक 15/06/2017 चे पालन करते. निविदांची संपूर्ण माहिती मध्य रेल्वेवर उपलब्ध आहे. अधिकृत वेबसाइट www.ireps.gov.in निविदा कागदपत्रे वेबसाइटवरून डाउनलोड करता येतील.

**निविदा सूचना क्रमांक: BSL-SNT-PROJ-01-PSS-2025 दिनांक 01/05/2025**

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे 73

**करमाळा नगर परिषद**

**जावक क्रमांक - कर विभाग/५४८/२०२५ दि. ०६/०५/२०२५**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**मालमत्तांच्या करपात्र मूल्यांचे पुन:र्निरीक्षणासंबंधी जाहीर नोटीस**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५(१) व (२) अन्वये करमाळा नगरपरिषद हद्दीतील सर्व घरमालक व भोगवटदार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२४ अन्वये व त्याखालील तरतूदीनुसार सन २०२५-२६ ते सन २०३०-३१ या पंचवार्षिक कालावधीत मालमत्ता करांचे पुन:निर्धारण करणेचे काम चालू आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ (२) अन्वये नगरपरिषदेकडून देणेत आलेले नोटीस (फॉर्म) प्रमाणे दि. १५/०५/२०२५ अखेर मालमत्तेची / भाडेकरुची / खुली / निवासी /बिगर निवासी इ.ची आवश्यक ती माहिती नमूद करुन नगरपरिषद कार्यालयात देणेत यावी.

ज्या कोणास नोटीस (फॉर्म) मिळाले नसतील त्यांनी न.पा. कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावेत. तसेच घरमालक / भोगवाटदार यांनी उक्त अधिनियमाचे कलम ११५ (२) अन्वये सदर माहिती तपासणीकरिता संबंधीत नगरपरिषद कर्मचारी समक्ष घरोघरी येतील. त्यावेळी नगरपरिषद कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात यावी व समक्ष घर मोजणी करणेस अडथळा करु नये. त्यांना योग्य ते सहकार्य करण्यात यावे ही विनंती.

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपंचायत**

**श्री. विठ्ठल-रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**ई निविदा सुचना लाडूप्रसाद/०५/२०२५**

बुंदी लाडूप्रसाद तयार करुन पॅकिंग करणेकामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याची सर्व माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अधिकारी**
**(संपर्क क्र. ०२१८६-२२४४६६)**

**मूळ खरेदीखत हरवलेबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः धोत्रे, व शहर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, श्री. वसंत श्रीहरी लांडे रा. धोत्रे, ता. बार्शी यांच्याकडून दि. २९/०३/२०२५ रोजी खरेदीदस्त क्र. १७२७/२०१२/बरस, १७२८/२०१२/बरस, ४४६०/२०२३ हे मूळ खरेदीदस्त व त्याच्या पावत्या व सूची ०२, होंडा शोरूम, लातूर रोड, बार्शी या परिसरात पडून गहाळ झाले आहेत, त्याबाबत त्यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून त्याचा गहाळ रजि. नं. ०२६७/२०२५ असा पडला आहे.

परंतु मूळ खरेदीदस्त क्र. १७२७/२०१२/बरस, १७२८/२०१२/बरस, ४४६०/२०२३ व त्याच्या पावत्या व सूची ०२ हे मूळ स्वरुपात हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावरती संपर्क साधून परत द्यावी, अथवा आमचे अशील याच्या दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉटबाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासुन ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन सदर मिळकत दुय्यम प्रत आधारे बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता ही जाहिर नोटीस दिली. दि. ०६/०५/२०२५.

**श्री. वसंत श्रीहरी लांडे**
**रा. धोत्रे, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिल)**

**सही/-**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**ऑफिस पत्ता : ३९४५/१, भवानी पेठ, सोलापूर रोड बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

**जाहीर नोटीस**

दि. कि. अर्ज नं. ०१/२०२५
नि. नंबर ६

**करमाळा येथील मे.सि.ज. ज्यु.डी. सो. यांचे कोर्टात**

**१) नजीर अ. रहीम कुरेशी, वगैरे - अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सा.वाले**

ज्या अर्थी उपनिर्दीष्ट अर्जदार यांनी मयत अब्दुल रहिम याकुब कुरेशी, शरीफाबी अब्दुल रहीम कुरेशी, हाजीहारून याकुब कुरेशी, जैतुनबी हारून कुरेशी, तसेच यातील अर्जदार नं. २अ) व ब) हे मयत मंजुर अहमद अ. रहिम कुरेशी व त्यांची पत्नी जमिला मंजुर कुरेशी यांचे कायदेशीर वारस या नात्याने उपरोक्त अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज या न्यायालयाकडे सादर केलेला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना या जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपनिर्दीष्ट अर्जदारांच्या उपरोक्त मागणीबद्दल कोणाची काही हरकत असल्यास अथवा अर्जदारांच्या मागणी संदर्भात कोणास काही सांगावयाचे असल्यास त्याने सदर घोषणेच्या प्रसिध्दी दिनांकापासून १ महिन्याचे आत अथवा प्रस्तुत कामी नेमलेली ता. ०९/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर करमाळा यांचे कोर्टात स्वतः अगर आपल्या प्राधिकृत करमाळा व्यक्तीमार्फत अथवा वकिलांमार्फत उपस्थित राहून आपली हरकत लेखी स्वरुपात कळवावी /दाखल करावी. अन्यथा मुदतीत तसे न केल्यास मे. न्यायालय प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांचा पुरावा नोंदवून पुढील योग्य तो आदेश करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस आज दि. ०६/०५/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रांकासह दिली.

**सही /-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक वर्ग - १**
**दिवाणी न्यायालय, करमाळा**

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे कुमठे ता. उत्तर सोलापूर व शहर सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील मौजे कुमठे येथील शेतजमीन यांसी
**अ)** गट नं ३३०, यांसी क्षेत्र ७ हेक्टर २० आर, पूर्वेस : गट नं ३४३, पश्चिमेस गट नं ३३१, दक्षिणेस गट नं ३३२, उत्तरेस गट नं ३४५
**ब)** गट नं ३४३ यांसी क्षेत्र ० हेक्टर ४८ आर, पूर्वेस :- गट नं ३४९, पश्चिमेस गट नं ३२८, दक्षिणेस गट नं ३३२, उत्तरेस : गट नं ३४५
**क)** गट नं ३४४, यांसी क्षेत्र २ हेक्टर ५८ आर, पूर्वेस :- गट नं ३४९, पश्चिमेस गट नं ३३१, दक्षिणेस गट नं ३३२, उत्तरेस गट नं ३३०

२) वरील सर्व मिळकती या आमचे अशिलाचे आजोबा नबीसाहेब कासिमसाहेब मोअजन (इनामदार) व आलमिया कासिमसाहेब मोअजन (इनामदार) यांचे कब्जे मालकी वहीवाटीचे होती व आहे, सदर दोन्ही इसम मयत झाले असून त्यांचे पश्चात आमचे अशिल **१.** म. युसुफ अब्दुल रऊफ इनामदार **२.** इम्रान अब्दुल रऊफ इनामदार **३.** मोहसीन अब्दुल रऊफ इनामदार **४.** नाजरीन जाफर आलमेलकर **५.** फरहान अ. रहीम सय्यद **६.** फहीम अ.रहीम सय्यद **७.** साकीब नदीम सय्यद हे कायदेशीर वारस म्हणून सदरच्या मिळकती वहीवाटत आहेत. सदर मिळकतीत आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे.

३) सदरची वस्तुस्थिती असताना **१.** रियाज महीबुबसाब इनामदार **२.** हमीदा अब्दुलसत्तार निठोरे **३.** आसमा जिलानी निठोरे **४.** जावेद नबीसाब इनामदार ५. शबाना नबीसाब इनामदार **६.** फैमीदा नबीसाब इनामदार ७. नसिरखान माहमूद खान पठाण **८.** अमजद खान माहमूद खान पठाण **८.** हरुण नसीसाब इनामदार **९.** हुसैन नबीसाब इनामदार **१०.** हुसैनबी महबूबसाब इनामदार **११**. सुरय्या अ. रशीद इनामदार **१२.** शाहरुख रफिक इनामदार **१३.** महविश रफिक इनामदार या नबीसाहेब कासिमसाहेब मोअजन व आलमिया कासिमसाहेब मोअजन यांचे काही वारसदारांनी आमचे अशिलाचे परस्पर व आमचे अशिलांचा हक्क डावलून, आमचे अशिलाची संमती न घेता सदरचे मिळकती ति-हाईत व्यक्तिस विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे खात्रीलायक आमचे अशिलांस समजले आहे.

सबब वर नोटीस कलम १ मध्ये नमूद केलेल्या शेतजमीनीबाबत आमचे अशिलांचे परस्पर कोणीही कसल्याही प्रकारे खरेदी विक्रीचा व्यवहार करु नये, याउपरही कोणीही खरेदी विक्री व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर ठरेल व तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, तरी वरील मिळकतीबाबत कोणीही कसलाही व्यवहार करू नये.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली.
ही नोटीस दिली ता ०६/०५/२०२५

**अशिलातर्फे ॲड.**
**सही/-**
**ॲड. जयप्रकाश श्रीमंत भंडारे**
**बी.ए., एल.एल.एम.**
**पत्ता :- म्हाडा, एच २६, बनशंकरी नगर, जुळे सोलापूर, सोलापूर - ४१३००८**
**मो.नं. ९८२२२०८४१२**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस लोकांस विशेष विशेषतः सोलापूर व आसपासचे लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे रेणुका सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सोलापूर मजरेवाडी ता. उत्तर सोलापूर येथील गट नं. ९९/१/ब प्लॉट नंबर ३६४ क्षेत्र. यांसी चतुः सीमा पूर्वेस गट नं. ब्लॉक नंबर ४०० दक्षिणेस ब्लॉक नंबर ई ३६५ पश्चिमेस रस्ता, उत्तरेस ब्लॉक नंबर सी ३६३ येणेप्रमाणे वर्णनाची संपूर्ण मिळकत बांधकाम व्यवस्थेसह व आतील दगड, माती, वृक्ष, पाषाण वगैरे तदंगभूत वस्तुसह. वर नमूद केलेली मिळकत ही १) सुरेखा संतोष कोडगी व २) संतोष सुरेश कोडगी यांच्या स्वतंत्र मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. त्यांनी वर नमूद केलेली मिळकत विक्रीस काढलेली आहे, त्याप्रमाणे वरील मिळकतीच्या मालकांनी आमचे अशील यांना सदर मिळकत विक्री करणेकरीता त्यांच्याकडून इसारापोटी रक्कमही स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही त्यांच्या मालकी कब्जेवहीवाटीची व निर्वेध व निजोखमी आहे असे हे असे त्यांनी आमचे अशिलांना हमी व खात्री दिलेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे विद्यमान मालकासोबत ठरलेल्या अटींसह खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. तरी तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा खरेदी, गहाण, कुलमुखत्यार पत्र, दान, बक्षीस, लिज, साठे खत, पोटगी, दिवाणी दावा, वारसा हक्क, कब्जा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे अशिलाच्या वकीलांच्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदपत्रे घेऊन भेट घ्यावी व लेखी तक्रार द्यावी, सदर नोटिसीप्रमाणे मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास आमचे अशील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत, चालणार नाही व ती आमचे व ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे ता. ०६/०५/२०२५

**सही/-**
**ॲड. एन.आर. गावडे**
**बी.सी.ए., एलएल.बी.**
**ऑफिस : गाळा नं १ सुपर मार्केट, मुरारजी पेठ सोलापूर.**
**जि. सोलापूर मो.नं. ९२६०४८०५१७**

**जाहीर समन्स**

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि.सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि. सोलापूर** - **अर्जदार**
**अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्त चौक, सोलापूर**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्र. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १५३१/२०२४-२५ | १,५२,७४२.०० | १<br>२ | **बागवान नसिमा सलीम** रा. बागवान मशीद, बागवान गल्ली, अक्कलकोट, सोलापूर<br>**बागवान सलीम हुसेन** रा. बागवान मशीद, बागवान गल्ली, अक्कलकोट, सोलापूर |
| २ | १५३२/२०२४-२५ | १,६५,४९२.०० | १<br>२ | **मुडगुंडे ज्योती सुनील** रा. गणपती मंदिरजवळ, सुभाष गल्ली, अक्कलकोट, सोलापूर<br>**मुदगुंडे सुनील सुरेश** रा. गणपती मदिरजवळ, सुभाष गल्ली, अक्कलकोट, सोलापूर |
| ३ | १५३४/२०२४-२५ | १,४२,०८६.०० | २ | **कांबळे नागनाथ रमेश** रा. ए/पी दहिताणे, ता. अक्कलकोट, घोळसगाव, सोलापूर |
| ४ | १५३९/२०२४-२५ | १,११,८६०.०० | १<br>२ | **गजा स्नेहा महांतेश्वर** रा. ए/पी करजगी, ता. अक्कलकोट, नूर नगर, सोलापूर<br>**गजा महांतेश्वर सुभाष** रा. ए/पी करजगी, ता. अक्कलकोट, नूर नगर, सोलापूर |
| ५ | १५४०/२०२४-२५ | १,७९,७२९.०० | १<br>२ | **हेळवे सुगलवा बसण्णा** रा. ए/पी करजगी, ता. अक्कलकोट, सोलापूर<br>**हेळवे मोहन बसवराज** रा. ए/पी करजगी, ता. अक्कलकोट, सोलापूर |
| ६ | १५४१/२०२४-२५ | १,१२,०१९.०० | १<br>२ | **तोळणूरे अंजली जयप्रकाश** रा. जुना आडत बाजार, फुटाणे गल्ली, अक्कलकोट, सोलापूर<br>**तोळणूरे जयप्रकाश राजेंद्र** रा. जुना आडत बाजार, फुटाणे गल्ली, अक्कलकोट, सोलापूर |
| ७ | १५४२/२०२४-२५ | १,४१,१२२.०० | १<br>२ | **बिराजदार श्रीदेवी काशिनाथ** रा. पोस्ट उदागी, ता. अक्कलकोट, सोलापूर<br>**बिराजदार काशिनाथ भीमाशंकर** रा. पोस्ट उदागी, ता. अक्कलकोट, सोलापूर |
| ८ | १५४६/२०२४-२५ | ६९,५२९.०० | १<br>२ | **मुल्ला फातिमा पीरसाब** रा. यादगर मोहल्ला, पोस्ट मैंदर्गी, ता. अक्कलकोट, सोलापूर<br>**मुल्ला पीरसाब रजाक** रा. यादगर मोहल्ला, पोस्ट मैंदर्गी, ता. अक्कलकोट, सोलापूर |
| ९ | १५५२/२०२४-२५ | ५४,५३४.०० | १<br>२ | **शिवशेट्टी राणी बसवराज** रा. बोरेगाव ता. अक्कलकोट, पोस्ट डोंबरजवळगे, सोलापूर<br>**शिवशेट्टी बसवराज विश्वनाथ** रा. बोरेगाव ता. अक्कलकोट, पोस्ट डोंबरजवळगे, सोलापूर |
| १० | १५५५/२०२४-२५ | १,३४,८११.०० | २ | **मुजावर उस्मान अल्लाउद्दीन** रा. पोस्ट कुरनूर, अक्कलकोट, सोलापूर |
| ११ | १५५९/२०२४-२५ | ८६,५४८.०० | १<br>२ | **महामुनी पूजा सिध्दराम** रा. कळमेश्वर मंदिर, पोस्ट उडगी, ता. अक्कलकोट, सोलापूर<br>**महामुनी सिध्दराम महादेव** रा. कळमेश्वर मंदिर, पोस्ट उडगी, ता. अक्कलकोट, सोलापूर |
| १२ | १५६१/२०२४-२५ | ७१५,५९.०० | १<br>२ | **पोटेनवरू ज्योती बसवराज** रा. २९४ भीम नगर, मैंदर्गी, विश्वास नगर, अक्कलकोट, सोलापूर<br>**पोटेनवरू बसवराज शिवचलप्पा** रा. २९४ भीम नगर, मैंदर्गी, विश्वास नगर, अक्कलकोट, सोलापूर |
| १३ | १५६२/२०२४-२५ | ९१७,१६.०० | १<br>२ | **हगलदिवटे मसानबी अलाबक्ष** रा. मुसलमान गल्ली, पोस्ट करजगी, ता. अक्कलकोट, सोलापूर<br>**हगलदिवटे अलाबक्ष साहेबलाल** रा. मुसलमान गल्ली, पोस्ट करजगी, ता. अक्कलकोट, सोलापूर |
| १४ | १५६७/२०२४-२५ | १,३८,८५५.०० | १<br>२ | **पाटील सुनिता लक्ष्मण** रा. ग्रामपंचायत जावळ, पोस्ट तडवळ, अक्कलकोट, सोलापूर<br>**पाटील श्रीनिवास लक्ष्मण** रा. ग्रामपंचायत जावळ, पोस्ट तडवळ, अक्कलकोट, सोलापूर |
| १५ | १५६८/२०२४-२५ | १,०४,२०२.०० | १<br>२ | **पात्रे राजेश्री कृष्णदेव** रा. पोस्ट भुरीकवठे, अक्कलकोट, सोलापूर<br>**पात्रे कृष्णदेव लक्ष्मण** रा. पोस्ट भुरीकवठे, अक्कलकोट, सोलापूर |
| १६ | १५७४/२०२४-२५ | १,१२,६३१.०० | १<br>२ | **मासलेकर श्रेया श्रीकांत** रा. टिळक गल्ली, ता. अक्कलकोट, सोलापूर<br>**मासलेकर श्रीकात गोपाळराव** रा. टिळक गल्ली, ता. अक्कलकोट, सोलापूर |
| १७ | १५७५/२०२४-२५ | ९२०९१.०० | १<br>२ | **गुजले रेणुका शेखाप्पा** रा. ५११, कुंभार गल्ली, शास्त्री नगर, सोलापूर, उत्तर जिल्हा न्यायालय, सोलापूर<br>**गुजले शेखाप्पा खाजप्पा** रा. ५११, कुंभार गल्ली, शास्त्री नगर, सोलापूर, उत्तर जिल्हा न्यायालय, सोलापूर |
| १८ | १३६५/२०२४-२५ | १,११,४८५.०० | १<br>२ | **शेख सुमैय्या मोहमद शफी** रा. सी ५००/२, गोदुताई विडी घरकुल, कुंभारी, दक्षिण सोलापूर, सोलापूर<br>**शेख मोहमद शफी** रा. सी ५००/२, गोदुताई विडी घरकुल, कुंभारी, दक्षिण सोलापूर, सोलापूर |

या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु जाब देणार समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. २५/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०६/०५/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# कोलकाताला प्लेऑफची आशा

## धोनीचा करिष्मा पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकता




◆ **कोलकाता, ६ मे**

बुधवारी इंडियन प्रीमियर लीगमध्ये कोलकाता नाईट रायडर्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. कदाचित ऐतिहासिक मैदानावर हा शेवटचा सामना होईल.कोलकाता प्लेऑफची आशा आहे.

पाच वेळा विजेता चेन्नई संघ प्लेऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर पडला आहे, परंतु धोनीचा करिष्मा नेहमीसारखाच कायम आहे आणि त्याची उपस्थितीच नाईट रायडर्सच्या घरच्या मैदानाला पिवळे रंग देऊ शकते. कोलकाता शहराशी धोनीचेही जवळचे नाते आहे. त्याचे सासरे याच शहरात राहतात आणि त्याने आपला बहुतेक वेळ याच शहरात ज्युनियर क्रिकेटमध्ये घालवला आहे. त्यामुळे बुधवार हा ४३ वर्षीय खेळाडू आणि त्याच्या चाहत्यांसाठी भावनिक दिवस असू शकतो.

ईडन गार्डन्स धोनीच्या अनेक कामगिरीचे साक्षीदार आहे, ज्यामध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटमधील त्याचे पहिले शतक आणि कसोटी क्रिकेटमधील दोन शतके यांचा समावेश आहे. तो येथे क्लब क्रिकेट देखील खेळला आहे, ज्यामध्ये शंबाजार क्लबसाठी संस्मरणीय पी सेन ट्रॉफी फायनलचा समावेश आहे.

धोनीचा खेळ आता पूर्वीसारखा प्रभावी राहिलेला नाही पण त्याच्या चाहत्यांना त्याच्याशी भावनिक ओढ आहे आणि म्हणूनच ते मोठ्या संख्येने येथे पोहोचू शकतात. गेल्या सामन्यात चेन्नई संघाला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून दोन धावांनी पराभव पत्करावा लागला होता. या सामन्यात धोनीने आठ चेंडूत १२ धावा केल्या पण शेवटच्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर तो बाद झाला. त्यामुळे चेन्नईचा संघ लक्ष्य गाठू शकला नाही. सामन्यानंतर धोनीने पराभवाची जबाबदारी घेतली.

चेन्नईकडे आता गमावण्यासारखे काहीही नाही आणि ते या सामन्यात अधिक मोकळेपणाने खेळतील पण कोलकातासाठी हा सामना करा किंवा मरो असा आहे कारण प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी त्यांना उर्वरित तीनही सामने जिंकावे लागतील.

कोलकाता संघाचे सध्या ११ गुण आहेत आणि जर त्यांनी पुढील तीन सामने जिंकले तर त्यांचे १७ गुण होतील. इथे पोहोचल्यानंतरही प्लेऑफमधील त्याचे स्थान निश्चित होईल असे म्हणता येणार नाही कारण बरेच काही इतर संघांच्या निकालांवर अवलंबून असेल आणि अशा परिस्थितीत, नेट रन रेटवरही हा मुद्दा अडकू शकतो.

चेन्नईनंतर, कोलकाता संघाचे घरच्या मैदानावर सनरायझर्स हैदराबाद आणि आरसीबीविरुद्ध सामने आहेत, परंतु सध्या तरी त्यांना राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या एका धावेने विजयाची लय कायम ठेवायची आहे. त्या सामन्यात आंद्रे रसेलचे फॉर्ममध्ये परतणे महत्त्वाचे होते आणि अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील कोलकाता संघालाही या हंगामात आतापर्यंत धावा काढण्यात संघर्ष करणाऱ्या व्यंकटेश अय्यरकडून अशाच कामगिरीची अपेक्षा असेल. ◂(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्ज**
**स्थळ** : ईडन गार्डन्स, कोलकाता
**वेळ** : संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# विजयाच्या ईर्ष्येने खेळणार भारत, द. आफ्रिका

### महिला तिरंगी एकदिवसीय मालिका




हरमनप्रीत कौर लॉरा वोल्वार्ड

◆ **कोलंबो, ६ मे**

श्रीलंकेविरुद्धच्या मागील पराभवातून सावरण्यासाठी आणि बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या महिलांच्या तिरंगी एकदिवसीय मालिकेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित करण्यासाठी भारतीय महिला उत्सुक आहेत.

रविवारी यजमान श्रीलंकेविरुद्धच्या पराभवाने हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाची आठ सामन्यांची विजयी मालिका संपुष्टात आली. जरी भारत त्यांच्या चांगल्या धावगतीमुळे अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी अजूनही फेव्हरिट असला तरी, त्यांना त्यांचा पुढचा सामना जिंकून या टप्प्यावर पोहोचायचे आहे.

तीन सामन्यांत चार गुण मिळवून भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. ते दुसऱ्या स्थानावर असलेल्या श्रीलंकेपेक्षा पुढे आहेत, ज्यांचेही चार गुण आहेत पण त्यांचा निव्वळ धावगती -०.१६६ आहे. भारताचा नेट रन रेट ०.४३३ आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने अद्याप एकही सामना जिंकलेला नाही पण त्यांना अजूनही दोन सामने खेळायचे आहेत आणि जर त्यांनी ते जिंकले तर ते अंतिम फेरीतही पोहोचू शकतात.

या मालिकेत भारताची फलंदाजी खूप सकारात्मक राहिली आहे. सलामीवीर प्रतीका रावलने दोन अर्धशतकांसह १६३ धावा करून सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थान पटकावले आहे. इतर फलंदाजांनीही यात योगदान दिले आहे.

स्नेह राणाने गोलंदाजीची जबाबदारी चांगली घेतली आहे. तिने तीन सामन्यांत ११ बळी घेतले आहेत. राणाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात पाच गडी बाद केले होते आणि ती तीच कामगिरी पुन्हा करू इच्छिते.

पहिल्या दोन सामन्यांमध्ये गोलंदाजांनी भारताला विजय मिळवून दिला, परंतु श्रीलंकेविरुद्ध त्यांची कामगिरी चांगली नव्हती. या सामन्यात, अष्टपैलू काश्वी गौतम फक्त पाच षटके टाकून मैदानाबाहेर गेली.

दक्षिण आफ्रिकेचा विचार केला तर, त्यांचा संघ संघर्ष करत असल्याचे दिसून येतो. त्यांनी गेल्या नऊ एकदिवसीय सामन्यांपैकी आठ गमावले आहेत, ज्यात या मालिकेतील दोन्ही सामने समाविष्ट आहेत. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी १० वाजता आर. प्रेमदासा स्टेडियमवर सुरू होईल. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### नीरज चोप्रा क्लासिक २०२५ साठी तिकिट विक्री सुरू



**बंगळुरू** : नीरज चोप्रा क्लासिकच्या तिकिटांची विक्री सुरू झाली आहे. आयोजकांनी सोमवारी याची घोषणा केली. या स्पर्धेत नीरज चोप्रा, थॉमस रोहलर आणि अँडरसन पीटर्ससह अनेक ऑलिम्पिक पदक विजेते सहभागी होतील. भारतात होणारी ही पहिली आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धा आहे. एनसी क्लासिक स्पर्धा २४ मे पासून बंगळुरू येथे सुरू होईल. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, तिकिटे १९९ रुपयांपासून ते ९,९९९ रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. प्रसिद्धिपत्रकानुसार, ४४,९९९ रुपयांच्या किमतीचे पाच कॉर्पोरेट बॉक्स देखील उपलब्ध आहेत. कर्नाटक ऑलिम्पिक असोसिएशन आणि युवा सक्षमीकरण आणि क्रीडा विभाग यासह राज्य संघटना आणि सरकारी संस्था जागतिक दर्जाच्या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी कर्नाटक सरकारसोबत काम करत आहेत. पुरेशा प्रकाशयोजनेअभावी नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धेचा पहिला टप्पा २४ मे रोजी बंगळुरूमधील कांतीरवा स्टेडियममध्ये होणार आहे. या स्पर्धेला जागतिक अ‍ॅथलेटिक्सने श्रेणी अ दर्जा दिला आहे, म्हणजेच या स्पर्धेला जगातील अ‍ॅथलेटिक्सची सर्वोच्च संस्था असलेल्या जागतिक अ‍ॅथलेटिक्सने मान्यता दिली आहे. याविषयी नीरज चोप्रा म्हणाला, ही स्पर्धा पंचकुलामध्ये व्हावी अशी माझी इच्छा होती, पण तिथल्या स्टेडियममधील प्रकाश व्यवस्थेशी संबंधित काही समस्या आहेत.

### महाराष्ट्र तलवारबाजी संघ प्रशिक्षकपदी पवन भोसले



**सोलापूर, दि. ६ मे -**
पटना, बिहार येथे ११ ते १५ मे दरम्यान होणाऱ्या सातव्या खेलो इंडिया तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र तलवारबाजी संघाचे प्रशिक्षक म्हणून पवन भोसले यांची निवड झाली.भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले आहे. महाराष्ट्र संघाचे सराव शिबिर त्यांच्या मार्गदर्शनाखाली २ ते ९ मे दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे होणार असून ९ तारखेस महाराष्ट्राचा संघ तेथून रवाना होणार आहे. भोसले सध्या बी.एफ दमाणी प्रशाला व श्री सिद्धेश्वर इंग्लिश मिडीयम हायस्कूलमध्ये क्रीडा शिक्षक म्हणून कार्य करीत आहेत. त्यांचे महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश काटुळे, सचिव उदय डोंगरे व जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी अभिनंदन केले.

### कराटे, ज्युदो व योगासन शिबिर आजपासून

सोलापूर, दि. ६ मे -
स्कूल ऑफ मार्शल आर्ट कराटे व ज्युदो असोसिएशनच्या वतीने ७ मे ते १० जूनपर्यंत कराटे, ज्युदो व योगासनासह विविध खेळांचे शिबिर आयोजिले आहे. हे शिबिर शिवशक्ती तरुण मित्र मंडळाच्या मैदानावर स. ६ ते १० आणि सायंकाळी ४ ते ६ यावेळेत होईल. इच्छुकांनी मुख्य प्रशिक्षक मुस्ताक काराभारी (मो.८४२१५०३६९५) यांच्याशी संपर्क साधावा.

### सोलापूर जिल्हा १५ वर्षाखालील मुलींची क्रिकेट निवड चाचणी शुक्रवारी

**सोलापूर, दि. ६ मे-**
सोलापूर जिल्ह्यातील मुलींची १५ वर्षाखालील गटाची क्रिकेट निवड चाचणी शुक्रवारी ९ मे रोजी सकाळी १० वाजता इंदिरा गांधी पार्क स्टेडियम वर होईल. १ सप्टेंबर २०१०च्या पुढील व ३१ ऑगस्ट २०१३ च्या आत जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. निवड समितीचे चेअरमन किरण मणिहार,स्नेहल जाधव, सारिका कुरनूरकर व मानसी जाधव हे ही निवड करणार आहेत, असे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबरसो यांनी कळविले आहे.



# राज्य फुटबॉल स्पर्धेत समर्थ क्रीडा भारतीचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

बारा वर्षांखालील राज्य फुटबॉल लिग स्पर्धेत येथील समर्थ क्रीडा भारती संघाने उल्लेखनीय कामगिरी केली.

ही स्पर्धा वायफा, राज्य फुटबॉल असोसिएशनच्या मान्यतेने संजीवनी स्कुल पाचगणी येथे पार पडली. सलामीच्या सामन्यात मुंबईच्या इंडिया रश सॉकर क्लबरोबर ०-३ असा पराभव झाला. त्यानंतर मुंबईच्या रायझिंग अकादमीबरोबर कडव्या लढतीनंतर १-२ अशी हार पत्करावी लागली. शेवटच्या सत्रात मुंबई संघाने आघाडी घेतली. दुसऱ्या सामन्यात पुणे रायझींगला सोलापूरने १-१ बरोबरीत रोखले. तिसऱ्या सामन्यात कोल्हापूरच्या रिव्हा फुटबॉल क्लबला १-० असे हरविले.

युवराज उमदी, ओंकार बाके, संकेत काशीद यांच्या दमदार खेळीने सोलापूर संघाला यश प्राप्त झाले. यात कर्णधार संकेत काशिद, ओंकार बाके, समर्थ भोई, कौस्तुभ कुंभार, विघ्नेश पवार, युवराज उमदी व वेदांत गायकवाड यांनी त्यांना साथ दिली. या संघास प्रशिक्षक सुमित राजपूत, व्यवस्थापक राऊत भाऊ यांनी मार्गदर्शन केले. संघाचे क्रीडा भारतीचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे व सचिव राजेश कळमणकर यांनी अभिनंदन केले.




# 'सिद्धेश्वर वुमेन्स'मध्ये कराटे प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थिनींच्या आत्मरक्षणासाठी, आत्म विश्वास वाढवण्यासाठी आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी जानेवारी ते एप्रिल दरम्यान तीन महिन्यांचे कराटे प्रशिक्षण शिबिराचा समारोप करण्यात आला.

या शिबिराचे आयोजन पॉलिटेक्निकच्या एनएसएस युनिटमार्फत करण्यात आले होते. या शिबिरात विविध शाखामधून १०४४ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. युवराज गायकवाड यांनी या विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. त्यांनी केवळ विद्यार्थिनींना शारीरिक तंत्रांचेच नव्हे, तर मानसिक तयारी, आत्म विश्वास वाढवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत कृती कशी करावी, याचेही मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनण्यासाठी आणि त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास होण्यासाठी अशा कार्यशाळा सातत्याने आयोजित केल्या. आपल्या वेळेचं आणि मानसिक आरोग्याचं संरक्षण करणे ही आपली जबाबदारी असून नवीन गोष्टी शिकताना चुका झाल्या, तरी स्वतःला दोष देऊ नका.असे मागदर्शन केले

कार्यक्रमाचा समारोपप्रसंगी विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. आयुष्यभर दुर्बळ म्हणून नव्हे, तर कणखर नारी म्हणून जीवन जगा, हा संदेश देऊन प्राचार्य गजानन धरणे विद्यार्थिनींना प्रेरणा दिली. शिबिरात विद्यार्थिनींना मूलभूत कराटे तंत्र, स्वसंरक्षणाचे कौशल्य, शरीर संतुलन व सामूहिक शिस्त यांचे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरासाठी एनएसएस प्रमुख प्रतिभा पाटील, मृदुला हरसुरे, रक्षा मुथा, संग्राम माने, रेशा देशमुख, रजनी निंबेणी आदींनी परिश्रम घेतले.

# मॉडेल अकॅडमीचा साऊथ सोलापूर आपटे ग्रुपवर दणदणीत विजय

### रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : आदर्श नागोजी सामनावीर




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूटच्या ७८ व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकॅडमी ब संघाने साउथ सोलापूर आपटे ग्रुपवर ८ गडी राखून विजय मिळविला.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या साउथ सोलापूरने सर्व बाद १७६ धावा केल्या. विजयी १७७ धावांचे लक्ष्य मॉडेल अकादमीने दोन गडी गमावित गाठले. पाच बळी टिपणारा आदर्श नागोजी सामन्याच्या मानकरी ठरला. जेष्ठ क्रिकेट खेळाडू के. टी. पवार यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. यावेळी विक्रांत पवार, प्रवीण देशेट्टी, वैभव इराबत्ती व केयुरेश पवार उपस्थित होते.

प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत.पंच म्हणून अतिक शेख व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले

**संक्षिप्त धावफलक**

**साऊथ सोलापूर आपटे ग्रुप** : २५.४ षटकात सर्व बाद १७६ ( चेतक गोरे नाबाद ७७, मंदार काळे २५, निरंजन कदम २० धावा, आदर्श नागोजी ५ बळी, सुदेश राठोड व प्रथमेश राठोड प्रत्येकी २ बळी) पराभूत विरुद्ध **मॉडेल क्रिकेट अकॅडमी (ब)** : २९.१ षटकात २ बाद १७७ (विवेक अनची नाबाद ६६, अक्षय हावळे ४८, वैष्णव जावळे नाबाद ४६, रोहित जोशी व ओंकार भांबुरे प्रत्येकी १ बळी.)




# मॉडेल अकादमी व सोलापूर स्पोर्टस्‌चे शानदार विजय

### ● उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकादमी व सोलापूर स्पोर्टस्‌ने शानदार विजय मिळविले.

मास्टर्स अकादमीने आयोजिलेली ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरु आहे. मंगळवारी झालेल्या सामन्यात मॉडेल अकादमीने श्री साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट अकादमीवर १८१ धावांनी दणदणीत विजय मिळविला. तडफदार ९० धावांची खेळी करणारा अब्दुल मुल्ला सामन्याचा मानकरी ठरला. दुसऱ्या सामन्यात सोलापूर स्पोर्टस्‌ने साऊथ सोलापूरवर ७ गडी राखून मात केली. तीन बळी टिपणारा रवन तमटम सामन्याचा मानकरी ठरला. हे पुरस्कार लक्ष्मण दुडम व चन्नवीर चिट्टे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी राजेश येमुल, अनिल सांब्रानी व अमोल अंगडी उपस्थित होते.

**संक्षिप्त धावफलक : मॉडेल अकादमी :** ३० षटकात ३ बाद २४६ (अब्दुल मुल्ला ९०, अभिषेक देशमुख ८१, समृध्दी चट्टे २-१४) वि. वि. **श्री साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट अकादमी** : २३.५ षटकात सर्व बाद ६५ ( झहिद शेख २-१२, गौरव गादेकर २-६). **साऊथ सोलापूर :** ३० षटकात ७ बाद १२५ (उध्दवराज शिवसिंगवाले २०, रमन तवटम ३-२१) पराभूत विरुद्ध **सोलापूर स्पोर्टस :** ३ बाद १२६(अप्पु स्वामी ३७).

# सोलापूरचे आठ गुण, आज हिंगोलीबरोबर लढत

### राज्य निमंत्रित १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा

### सोहम कुलकर्णी व श्रवण माळीची शानदार खेळी



सोहम कुलकर्णी



श्रवण माळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १६ वर्षांखालील निमंत्रित साखळी क्रिकेट स्पर्धेत सोलापूरने आठ गुण मिळविले असून गुरुवारी सात व आठ मे त्यांची लढत हिंगोली जिल्हा संघाबरोबर होणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत सलामीच्या सामन्यात जळगाव संघाने सोलापूर संघावर पहिल्या डावाच्या आघाडीवर तीन गुण प्राप्त केले. सोलापूर संघाला एक गुण मिळाला. दुसऱ्या सामन्यात सोलापूरने नंदुरबारवर दहा गडी राखून दणदणीत विजय मिळविला. यात सोलापूरने सात गुण प्राप्त केले.

**संक्षिप्त धावफलक**

**पहिला डाव : सोलापूर** : सर्व बाद २२३ धावा (दर्शील फाळके ५७, संदेश गाडी २६, सोहम कुलकर्णी ३१, अभिजीत सरवदे ५८, प्रसाद मुके २१ धावा). **जळगाव :** ९ बाद ३०२ घोषित (यश माने देशमुख ३ बळी, श्रवण माळी २ बळी, अभिजीत सरवदे, दर्शील फाळके व विश्वजीत गोडसे यांनी प्रत्येकी १ बळी). **दुसरा डाव** : सोलापूर : ८ बाद १६८ घोषित (विराज वर्मा ७२, अभिजीत सरवदे ५०) जळगाव : ५ बाद ५९ ( श्रवण माळी ३ बळी, दक्षिण फाळके १ बळी)

**पहिला डाव : नंदुरबार :** सर्व बाद ७५ (सोहम कुलकर्णी ६-१६, श्रवण माळी ४-१६). **सोलापूर :** नऊ बाद २०५ घोषित (दर्शील फाळके ५६, संदेश गाडे ३६, विश्वजीत गोडसे २८, मयंक पात्रे १९, सार्थक कन्ना नाबाद ४०). **दुसरा डाव :** नंदुरबार सर्व बाद १७८ (सोहम कुलकर्णी ३-३९, श्रवण माळी २-४०, यश माने देशमुख १-३ सार्थक कन्ना २-२३). दुसरा डाव : सोलापूर बिनबाद ४९ धावा).

# पुनर्वसित गावांच्या समस्यांवर तोडग्याचे निर्देश

## खा. धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोलापुरात पार पडली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

जिल्ह्यातील करमाळा, माढा व पंढरपूर या तालक्यांमधील पुनर्वसित गावांच्या विविध समस्यांबाबत जिल्हा नियोजन भवन येथे झालेल्या बैठकीत वादळी चर्चेनंतर तोडगा काढण्याचे निर्देश देण्यात आल्याचे वृत्त आहे.

करमाळा, माढा व पंढरपुर तालुक्यातील पुनर्वसित गावांच्या विविध समस्यांसंदर्भात मंगळवार, ६ मे रोजी जिल्हा नियोजन भवन येथे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांचे अध्यक्षतेखाली आणि जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यावेळी माढा तालुक्याचे आमदार अभिजित पाटील यांचेसह संबधित विषयांचे आधिकारी उपस्थित होते. सोलापुर जिल्ह्यात सुमारे ६४ पुनर्वसित गावठाणे आहेत या गावठाणांना पुनर्वसन कायद्याअंतर्गत १८ नागरी सुविधा देय असतात. यासाठी एकदाच निधी देता येतो. १८ पैकी किमान ११ सुविधा पूर्ण असतील तरच त्याचे जि.प कडे हस्तांतरण होऊन देखभाल दुरुस्ती होते.




बहुतांश गावात किमान ११ सुविधा पूर्ण नसल्याने आणि जिथे ११ सुविधा पूर्ण आहेत परंतु त्या २५ ते ३० वर्षापूर्वीच्या आहेत. त्या देखभाल दुरुस्ती अभावी जीर्ण झालेल्या आहेत. परिणामी जि.प.हस्तांतरण करुन घेत नव्हती, त्यावर हस्तांतर करुन घेण्यास जि.प सोलापूर यांनी सहमती दर्शवली. संबंधित तालुक्यातील काही पुनर्वसित गावांचे नकाशे उपलब्द नाहीत, ते ८ दिवसांच्या आत उपलब्द करुन देण्याचे निर्देश जिल्हाधिकार्यांनी संबंधितांना दिले. तसेच ज्या प्लॉट धारकांच्या सातबारा उताऱ्यावर नोंदी लागलेल्या नाहीत, त्या लावण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागास दिल्या.

पुनर्वसन गावठाणात लोकांना दिलेल्या प्लॉटचे आदेश-सनदवर असणारे प्लॉट नंबर, सिटी सर्व्हेचे नंबर व ग्रामपंचायतीचे घर नंबर वेगवेगळे असल्याने कर्ज घेणे, वारस नोंद करताना अडचण येत होत्या. त्यासाठी तिन्ही विभागातर्फे सुसूत्रीकरण करून एकच नंबर प्लॉटला देण्यात यावा. तसेच सरकारी मोजणी करून प्लॉट क्षेत्र/हद्द निश्चित करण्यात सर्व विभागात समन्वय साधुन एकसुत्रता आणण्याचे निश्चित करण्यात आले.

उजनी प्रकल्पाअंतर्गत करमाळा तालुक्यातील खातगाव १,२,३ चिखलठाण १,२,सांगवी १,२ सोगाव पुर्व,पश्चिम,बिटरगाव (वां),केत्तुर १,२, वांगी-४ - भिवरवाडी या गावांचे पुनर्वसनामुळे दोन भाग झालेले आहेत,भौगोलिक दृष्ट्या ही गावे भिन्न आहेत.एका भागातुन दुसर्या भागाकडे जाताना काही ठिकानी १५ कि.मी अंतर पार करावे लागते,कार्यालय एका भागात असल्याने नागरिकांना सुविधा मिळत नाही,ही गावे पुनर्वसन कायद्यातील लोकसंख्येची अट पुर्ण करतात त्यामुळे हद्द निश्चित करुन त्यांचे विभाजन करुन वेगळ्या ग्रामपंचायती स्थापन करण्यासंदर्भातली कार्यवाही सुरु करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी संबधितांना आदेश दिले. सीना कोळेगाव प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधे भुसंपादनाच्या दृष्टिने काही शेतकर्यांच्या जमीनीवर शेरे मारलेले आहेत पण अजून संपादन केलेले नव्हते, तशी कार्यवाही नाही तरीही लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीवरील शेरे पूर्णपणे उठवलेले नाहीत. शेरे उठवण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकार्यांनी निर्देश दिले. तसेच पुनर्वसित गावठाणांचे विद्युतीकरणाच्या समस्या सोडवण्याचे संबंधितांना निर्देश देण्यात आले. चर्चा झालेल्या मुद्यांवर कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे याचे अपडेट घेण्यासाठी पुन्हा १० दिवसांनी बैठक घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकार्यांनी संबधित अधिकाऱ्यांना सांगितले आहे.

## महत्वाचे...



### १९ वर्षापासून महाप्रसाद सेवा कार्य कौतुकास्पद - नरेश अहिर

**अक्कलकोट दि ६ मे-**

प्रत्येक महिन्याच्या अष्ठमीला व श्री सदगुरु शंकर महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त १९ वर्षापासुन महाप्रसाद सेवा मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ रेवडे व त्यांचे सहकारी राबवित आहेत. अन्नदान सर्वात श्रेष्ठदान असल्याचे गौरवोद्गार स्वामी भक्त नरेश अहिर यांनी काढले. सविता नरसिंग तुपे, स्वामीभक्त नरेश अहिर यांचा अध्यक्ष राजाभाऊ रेवडे यांच्या हस्ते श्री ची प्रतिमा कृपा वस्त्र शाल' देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नरेश अहिर बोलत होते. निलेश साळुंके, गजेद्र वरगडे, योगेश शिंदे, विशाल अव्हाड, हेमंत गोवंडे, श्रीकांत चव्हाण, किरण बडगुजर, सचिन कासार, हेरंब वाळके, विशाल कुलधर्मे, संतोष गायकवाड, स्वप्निल सातव, आदि उपस्थित होते. श्री सदगुरू संतवर्य योगीराज शंकर महाराजाचा ७८ वा समाधी सोहळा निमित्त हजारो भाविकांनी शंकर महाराज समाधीचे दर्शन घेतले. सुमारे ३० हजार पेक्षा अधिक भाविकानी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### खा. ओम राजेनिंबाळकर यांची जिल्हा विद्युत समितीवर अध्यक्ष म्हणून निवड

**बार्शी दि.६ मे-**

केंद्र शासनाच्या ऊर्जा मंत्रालयाच्या निर्देशानुसार Revamped Distribution Sector Scheme (RDSS) या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सोलापूर जिल्ह्यात जिल्हा वीज समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी खा. ओमप्रकाश राजे निंबाळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दि. १६ सप्टेंबर २०२१ रोजी प्राप्त केंद्र शासनाच्या आदेशानुसार ही समिती गठीत केली असून, यामध्ये खा. प्रणितीताई शिंदे व खा. धैर्यशील मोहिते पाटील यांची सह अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. खा. निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती जिल्ह्यातील वीज वितरण प्रणाली अधिक सक्षम व सुस्थित करण्यासाठी काम करणार आहे. नवीन सब स्टेशन, पावर ट्रांसफार्मर, एलटी लाईन, शेतकऱ्यांकरिता नवीन ट्रांसफार्मर, सुविधा उपलब्ध देणार असल्याचा विश्वास त्यांनी दिला.

### वाहतूक शाखा बंद करण्याची अक्कलकोट आरपीआय अध्यक्षाची मागणी

**अक्कलकोट, दि ६ मे-**

राज्यातील ग्रामीण पोलिसांच्या अंतर्गत जिल्हा वाहतूक शाखा गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहेत, एकीकडे अनेक पोलीस ठाण्यातून पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या ही ज्या त्या हद्दीतील लोकसंख्येच्या प्रमाणात नसल्याने पोलिसांवरील ताण वाढत आहे. त्यामुळे सदरची शाखा बंद करण्याची मागणी आर.पी.आय. (आठवले गटाचे) तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या शाखेच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य पाहता उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम पाहायला मिळत आहे. सर्व सामान्यांना याचा काहींच उपयोग नाही अशी स्थिती आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक पोलीस ठाण्यामध्ये पोलिसांची कमतरता असताना जिल्हा वाहतूक शाखेत मात्र प्रमाणापेक्षा अधिक कार्यरत आहेत. ही वस्तुस्थिती असल्याचे सांगून मडीखांबे यांनी जिल्हा वाहतूक पोलीस शाखेत सध्या कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांना तत्काळ पोलीस ठाणे देण्याची मागणी करून जिल्हा वाहतूक म्हणजे केवळ कारवाई चा नुसता फार्स आहे. एकूणच या शाखेतील अधिकारी, कर्मचारी व वाहनांची संख्या पाहता एकप्रकारचा शासनाला भुर्दंड आहे असे म्हटले आहे.

### महाराष्ट्र विद्यालयाचा निकाल ८४.१३ टक्के

**बार्शी, दि. ६ मे-**

राज्य मंडळाकडून फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत बार्शीतील महाराष्ट्र विद्यालयाचा कला, विज्ञान शाखेचा एकत्रित निकाल ८४.१३ टक्के लागला. विज्ञान शाखेचा निकाल ९६.४० टक्के लागला. पूर्वा हनुमंत व्हनकळस हिने (९२.५० टक्के) विद्यालयात प्रथम, हर्षवर्धन सचिन वीर (८९.३३ टक्के) याने द्वितीय, अनुष्का गजेंद्र गाडे (८७ टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला. कला शाखेचा निकाल ४७.८७ टक्के लागला. निकिता सुधीर मस्के हिने ( ८७.६७ टक्के) प्रथम, शुभम भागवत भोसले ( ८४.८३ टक्के) याने द्वितीय, राजेश्री राजेंद्र वाघमारे हिने ( ७६.१७ टक्के ) तृतीय क्रमांक पटकावला. किमान कौशल्य शाखेचा निकाल ७६.९२ टक्के लागला. महेंद्र सुभाष मारकड याने (६५.६७ ) प्रथम, मुस्तकीन मोहमदरफिक शेख(६४.८३) हिने द्वितीय तर अभिषेक संतोष धुमाळ याने (६१.६७) तृतीय क्रमांक पटकावला. प्राचार्य धावणे मॅडम यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


# डाक विभागाची ज्ञान पोस्ट ही नवीन सेवा सुरु

## लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर दि.६ मे -**

भारतीय डाक विभागाने देशातील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये दि.१ मे पासून ज्ञान पोस्ट या नवीन सेवेची सुरुवात केली आहे. या सेवेंतर्गत ज्ञान प्रसाराचे लेखी दस्तावेज, पुस्तके, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक साहित्य (लेखन) माफक दरात पाठवणे शक्य होणार आहे. ही सेवा पंढरपूर प्रधान डाक घर येथे उपलब्ध असल्याची माहिती डाकघर अधिक्षक चंद्रकांत भोर यांनी दिली.

टपाल विभाग शैक्षणिक पुस्तके, स्पर्धा परीक्षांच्या तयारीशी संबंधित अभ्यास, साहित्य आणि सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित पुस्तके पाठवण्यासाठी एक विशेष सेवा प्रदान करेल. सेवेद्वारे वस्तूचे ट्रॅक व ट्रेस सुविधा उपलब्ध आहे तसेच रजिस्ट्रेशन, इंस्शुरन्स, वितरणाचा पुरावा, अशा 'मूल्यवर्धित सेवांचा' ही




समावेश आहे. पुस्तके असलेल्या पॅकेटवर ज्ञान पोस्ट असे चिन्हांकित केले जावे. पॅकेटमधील पुस्तकावर मुद्रक किंवा प्रकाशकाचे नाव असावे. पुस्तकांमध्ये 'आकस्मिक घोषणा' किंवा 'पुस्तकांची यादी' व्यतिरिक्त कोणतीही जाहिरात असू नये. या उत्पादनाद्वारे व्यावसायिक किंवा व्यावसायिक स्वरूपाचे कोणतेही पुस्तक पाठवले जाणार नाही. ज्ञान पोस्ट अंतर्गत कमीत-कमी ३०० ग्रॅम वजनाचे पॅकेट २० रुपयांपासून सुरु होते. ५ किलो ग्रॅमच्या वजनाच्या पॅकेटसाठी लागू कर वगळून १०० रुपयांपासून सुरु होतात. ही सेवा ग्रामीण विद्यार्थ्यांना आहे.

# सांगोल्यातील रेल्वे ब्रिज खालील रस्ता दुरुस्त करा

## शहीद अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ मे-**

सांगोला-मिरज रोड येथील आर यू बी क्रमांक-३२ अ रेल्वे ब्रिजखाली अनेक मोठे खड्डे पडले आहेत. सातत्याने पाणी साठत असल्याने या ब्रिजमध्ये वारंवार अपघाताचे प्रमाण वाढले आहे. येथील रस्ता पूर्णपणे खराब झालेला आहे. तरी तात्काळ दुरुस्ती करावी अशा मागणीचे निवेदन शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने सहा.मंडल अभियंता, पंढरपूर, वरिष्ठ मंडळ विद्युत इंजिनियर, मध्य रेल्वे, सोलापूर यांना देण्यात आल्याची माहिती अध्यक्ष निलकंठ शिंदे यांनी दिली.

याठिकाणी अंधार असल्याने मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. सध्या या मार्गावर पाणी नसल्याने उन्हाळ्यात काम दर्जेदार होऊ शकते. यापूर्वी देखील ५-६ निवेदनपत्राद्वारे कळविण्यात आले होते. रेल्वे विभाग, जिल्हाधिकारी, नगरपालिका, एमएसईबी विभागाकडे अनेकवेळा स्ट्रीट लाईट बसवावी व ते गरजेचे आहे याबाबत पत्रव्यवहार केले. प्रत्येक विभाग आमच्याकडे या कामाची जबाबदारी नाही असे म्हणतात व जबाबदारी झटकतात. आपणास अंतिम पत्राद्वारे कळविण्यात येते की याठिकाणी मर्क्युरी दिवे (स्ट्रीट लाईट) बसवावेत अन्यथा अपघात



झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी रेल्वे प्रशासनाची राहील. तरी हा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा असे निवेदनात म्हटले आहे. या निवेदनाची प्रत मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक सोलापूर यांनाही देण्यात आली आहे.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**

येथील महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त इतिहास अभ्यास मंडळाच्यावतीने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ बाळासाहेब पाटील, प्रा मनीषा शिंदे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा कल्पना स्वामी, प्रा स्वप्नाली जमदाडे, प्रा. रवींद्र कालीबत्ती, बसवराज कामाठी आदी उपस्थित होते. राजर्षी शाहू महाराज यांनी वंचित उपेक्षित अस्पृश्य समाजाला न्याय दिला. शेतकरी शेतमजूर यांचे प्रश्न



सोडविले. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. शिक्षण, साहित्य, क्रीडा व संस्कृती या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली म्हणूनच ते रयतेचा राजा म्हणून ओळखले जातात असे गौरवोद्गार मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी काढले. प्रस्ताविक डॉ. बाळासाहेब पाटील यांनी केले. आभार प्रा. मनीषा शिंदे यांनी मानले.

# हुतात्मासह इंटरसिटी एक्स्प्रेसला जेऊर व माढा स्थानकावर थांबा द्या

## प्रवासी संघटनांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.६ मे-**

करमाळा, परंडा, जामखेड या तीन तालुक्यातील २५० ते ३५० गावातील नागरिक जेऊर स्थानकावरून दररोज प्रवास करतात, दौंड, कुर्डूवाडी, पुणे, सोलापूर या शहरांच्या ठिकाणी जाणे-येण्यासाठी हुतात्मा इंटरसिटी ही गाडी अत्यंत महत्त्वाची असून माढा व जेऊर स्थानकावरून सकाळी पुण्याच्या दिशेने जाताना व संध्याकाळी माघारी येताना खूप सोयीची असल्याने या गाडीला माढा व जेऊर स्थानकावर थांबा मिळण्याची मागणी प्रवासी संघटनेने केली आहे.

येथे थांबा मंजूर झाल्यास ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी यांची दळणवळणाच्या दृष्टीने सोय होणार आहे. तसेच वाशिंबे स्थानकावर दौंड सोलापूर डेमो व दौंड



कलबुर्गी शटलला थांबा देण्याची मागणीही प्रवासी संघटनेसह नागरिकांकडून करण्यात येत आहे. या सर्व बाबींचा विचार करून गाडीचा थांबा मंजूर करण्यात यावा म्हणून सोलापूर विभाग रेल्वे सल्लागार समितीचे अध्यक्ष संजय पाटील तसेच प्रवासी असोसिएशन जेऊरचे अध्यक्ष सुहास सुर्यवंशी व असोसिएशनचे सचिव प्रमोद जानकर, सुयोग झोळ यांच्या वतीने सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक जे.एन.गुप्ता व सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक सुदर्शन देशपांडे यांना भेटून निवेदन देण्यात आले.

> मागील अर्थिक वर्षात वाशिंबे स्थानकावरून डेमो पॅंसेंजरने चढणाऱ्या व उतरणाऱ्या प्रवाशांची एकुण संख्या २७.३७५ इतकी आहे. कोणत्याही महत्त्वाच्या गाडीला थांबा नसतानाही प्रवाशांचा प्रतिसाद आहे. त्यामुळे हडपसर- काझीपेठ, दौंड - सोलापूर डेमो व दौंड - कलबुर्गी डेमो या गाडीला वाशिंबे स्थानकावर थांबा द्यावा यासाठी प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष पाटील यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. रेल्वे विभागाने याची दखल घेत दौंड सोलापूर तसेच दौंड कलबुर्गी गाड्यांना थांबा मिळावा यासाठी प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवू असे सांगितले आहे.
>
> **- सुयोग झोळ**

# तळसंगी सोसायटीत 'दामाजी'चे अध्यक्ष शिवानंद पाटील गटाचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.६ मे-**

राजकीयदृष्ट्या प्रतिष्ठेची केलेल्या तालुक्यातील तळसंगी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवारांनी मोठ्या फरकाने विजय मिळवत परिवर्तन विकास पॅनेलचा पराभव केला.

पराभूत गट हा भाजप आ.समाधान आवताडे समर्थकांचा असून विजयी गट भाजपचेच माजी आमदार प्रशांत परिचारक समर्थक दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील यांचा आहे. तालुक्यात सहकारी संस्थेच्या निवडणूका सामंजस्य भूमिकेतून बिनविरोध निघतात मात्र तळसंगी सोसायटीची निवडणूक लागून प्रतिष्ठेची झाली. गत सोसायटीची निवडणूक देखील प्रतिष्ठेची केली. त्यातही अध्यक्ष शिवानंद पाटीलचा गट विजयी झाला. आज सकाळपासून मतदान करण्यासाठी दोन्ही गटाकडून मतदारांना मतदान केंद्रावर आणले जात



होते. सकाळच्या सत्रात मतदानावरून दोन गटात बाचाबाची झाली. निवडणुकीसाठी आज सकाळी मोठ्या चुरशीने मतदान झाले, एकूण ८६६ मतदारांपैकी ७३९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये जवळपास ६६ मतदार हे मयत आणि परगावी होते. निकालानंतर मोठा जल्लोष करण्यात आला. उमेदवार निहाय पडलेली मते पुढील प्रमाणे : सर्वसाधारण गट विजयी उमेदवार सतीश सावताडे (४२८), रतन बिचुकले (४५१), भगवान दुधाळ(४३७), नानासो गायकवाड(४५२), दादासो कोंडोरी(४६६), बलभीम पाटील (४६५ ),चिदानंद पाटील(४५४), शिवाजी शिंदे(४५९) पराभूत उमेदवार : औदुंबर बिचुकले (२१६), ईश्वर दुधाळ (२१०), शिवाप्पा हुग्गे (२२४), संजय जामगोंडे (२२५), समाधान कोडग (२२७), राजेंद्र कुडगे (२३०), अतुल मुंगसे (२२९), प्रशांत शेणवे (२५४), राखीव मतदार संघ विजयी : किसन दोडके (४८३), पराभूत अरविंद ऐवळे (२४२). महिला राखीव मतदार संघ विजयी : कांताबाई पाटील (४६६), पद्माबाई पांढरे (४४४), उषाताई अवताडे(२३५), शोभा पाटील(२६५). इतर मागासवर्गीय मतदार संघ विजयी : अशोक खंडागळे (४८४), पराभूत गोरख कोळी (२३९), भटक्या आर्थिक दुर्बल मतदार संघ विजयी महादेव बिचुकले (४८७) पराभूत बाळासाहेब पांढरे (२३७).

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अरविंद कांबळे यांनी काम पाहिले तर मतमोजणीसाठी ज्ञानेश्वर भंडगे, संतोष वाळके, पी एन सुळ, वाय.जी.काकडे, जी.एस.लांडे, सुश उमडाळे, गजानन जाधव, भागवत कांबळे, प्रताप माने, डी.पी.राऊत, एम.बी.सावंत, ए.डी.टाक, भ.वि.यलमार, सु.ल.मासाळ, सुभाष जगदाळे यांनी काम पाहिले. निकालानंतर विजयी उमेदवारांनी जल्लोष केला.

> सोसायटी व ग्रामपंचायतीमध्ये विकासकामे केल्यामुळे मतदारांकडून आमच्या गटाला संधी दिली जाते.दामाजीच्या निवडणुकीत सभासदांनी विश्वास ठेवून संधी दिली त्या विश्वासाला पात्र राहण्याची भूमिका संचालक मंडळाने बजावली. माझ्या राजकीय वर्चस्वाला शह देण्यासाठी निवडणुक लादली पण सभासदांनी मतदानातून योग्य उत्तर दिले.
>
> **- शिवानंद पाटील,**
> **अध्यक्ष, दामाजी शुगर.**

## निधन वृत्त...

### रखमाजी राजगुरू



**सोलापूर, दि. ६ मे-**

गजानन नगर येथील रहिवासी रखमाजी आनंदा राजगुरू (वय ७७) यांचे ६ मे २०२५ रोजी सकाळी ९ वाजता निधन झाले असून त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते आतिश सिरसट यांचे सासरे होते.

### प्रकाश सोमा



**सोलापूर, दि. ६ मे-**

साखर पेठ, आचार्य रंगा चौक येथील रहिवाशी प्रकाश दत्तात्रय सोमा यांचे सोमवार दि. ५ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर पद्मशाली स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पाकणी येथील वनविभागाच्या जागेतील प्रस्तावीत जलशुद्धीकरण केंद्राचा मार्ग अखेर मोकळा

## ● आ. देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नांना यश, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मिळवून दिली मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूरकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या पाणी प्रश्नातील महत्त्वाचा घटक असलेल्या पाकणी येथील प्रस्तावित जलशुद्धीकरण केंद्राचा मार्ग मंगळवारी झालेल्या शासन निर्णयामुळे अखेर मोकळा झाला आहे. आमदार देवेंद्र कोठे यांनी याबाबत शासन दरबारी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून या शासन निर्णयामुळे सोलापूर महानगरपालिकेचे आठ कोटी रुपये वाचणार आहेत.



दरम्यान, या निर्णयाकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानले आहेत.सोलापूर शहरवासियांना पाणीपुरवठा करणाऱ्या उजनीतून जलवाहिनीद्वारे आलेले पाणी शुद्ध करण्यासाठी पाकणी येथे ६६ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र प्रस्तावित आहे. या जलशुद्धीकरण केंद्रासाठी वनविभागाची जागा सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतर करण्याचा विषय गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित होता. या प्रश्नी आमदार देवेंद्र कोठे यांनी पुढाकार घेऊन ३० जानेवारी रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आवाज उठवला. सोलापूर महानगरपालिकेने जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागा हस्तांतरित न करून घेताच निविदा काढल्याने महापालिकेचा कारभार आ. देवेंद्र कोठे यांनी चव्हाट्यावर आणला. तसेच पाकणी येथील वनविभागाची जागा सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी आणि नियमित पाठपुरावा केला होता. यावर सोलापूरची पाणी समस्या सोडवण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आमदार देवेंद्र कोठे यांना दिले होते. अखेर मंगळवारी शासनाने वनविभागाची जागा जलशुद्धीकरण केंद्रासाठी सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबतचा शासन निर्णय जाहीर करून सोलापूरकरांना मोठा दिलासा दिला आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना सोलापूर जिल्ह्यातील नव्याने प्रस्तावित नगर - सोलापूर - अक्कलकोट - महाराष्ट्र कर्नाटक सीमा हद्द ग्रीनफिल्ड अलाइनमेंट राष्ट्रीय महामार्गात बाधित होत असलेल्या ५ हेक्टर २३ आर व सोलापूर शहराच्या पाणीपुरवठा सुधारण्याकरिता उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनी टाकण्यासाठी पाकणी जलशुद्धीकरण केंद्र येथील अस्तित्वात असलेले ८० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र आणि प्रस्तावित असलेले ६६ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्रासाठी बाधित होत असलेल्या ६ हेक्टर वन जमिनीच्या मोबदल्यात आंधळगाव (ता. मंगळवेढा) येथील एकूण ११ हेक्टर २३ आर गायरान जमीन ग्रीनफील्ड अलाइनमेंट राष्ट्रीय महामार्गात बाधित होत असलेल्या ५ हेक्टर २३ आर वनीकरण संदर्भात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून एनपीव्हि वसूल करून व चालू वर्षाच्या बाजारभावानुसार येणारे मूल्यांकन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून वसूल करून शासनाची पूर्व मान्यता देण्यात आली आहे. तसेच जलशुद्धीकरण केंद्रकरिता बाधित होत असलेल्या ६ हेक्टर वनीकरणाबाबत सोलापूर महानगरपालिकेकडून एनपीव्ही वसूल करून आणि पाणीपुरवठा हे सार्वजनिक प्रयोजन असल्यामुळे महसूलमुक्त व भोगवटामूल्यरहित किमतीने वनसंरक्षक यांना कब्जे हक्काने प्रदान करण्यास शासनाने मंगळवारी मंजुरी दिली. शासनाच्या या निर्णयामुळे सोलापूरकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

### ▶▶ महापालिकेचे वाचणार ८ कोटी रुपये

सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता वनविभागाच्या जागेचा मोबदला म्हणून ८ कोटी रुपये देणे महापालिकेला शक्य नाही. यावर उपाय म्हणून ही जागा महापालिकेकडून एनपीव्ही वसूल करून महसूलमुक्त व भोगवटामूल्यरहित किमतीने कब्जे हक्काने देण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. यानंतर सोलापूर महानगरपालिकेचे ८ कोटी रुपये वाचण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा घेतला.

### ▶▶ समस्त सोलापूरकरांतर्फे मुख्यमंत्र्यांचे आभार : आ. कोठे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूरकरांना दिलेला विकासाचा शब्द या शासन निर्णयाच्या माध्यमातून पुन्हा एकदा पाळला आहे. गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या सोलापूरच्या पाणीपुरवठ्याची समस्या पूर्णत्वाने सोडवण्याकरता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल समस्त सोलापूरकरांतर्फे आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

## ▶▶ महत्वाचे...



### एमआयडीसीच्या 'एसव्हीसएस'चा बारावीचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि. ६ मे-**

एस. व्ही. सी. एस. जूनियर कॉलेज एमआयडीसी येथील विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. अमृता क्षीरसागर ७९.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, महारुद्र हिरेमठ ७५.५० टक्के द्वितीय व आकाश जमादार ७३.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. वाणिज्य शाखेचा निकालही शंभर टक्के लागला आहे. अंबिका गायकवाड ८९.८३ टक्के प्रथम, कावेरी हिरापुरे ८९.३३ टक्के द्वितीय व साक्षी पाताळे ८३.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविली. कला शाखेचा निकाल ९६.८८ टक्के लागला असून ऐश्वर्या मुंडासे ७२.६७ टक्के प्रथम, सरस्वती कराळे ७२.५० टक्के द्वितीय व हिना शेख ७२.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. एमसीव्हीसी विभागातील ऑटो शाखेचा निकाल ९५.२५ टक्के, इलेक्ट्रिक शाखेचा ९४.११ टक्के व क्रॉप सायन्स शाखेचा निकाल ९२.८५ लागलेला असून प्रशालेने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, कॉलेजचे प्राचार्य संगप्पा म्हमाणे, उपप्राचार्य धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांनी अभिनंदन केले.

### उभ्याने चिरण्याची धमकी देऊन लोखंडी रॉडने मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ मे -**

तुला उभ्याने चिरतो अशी धमकी देत लोखंडी रॉडने मारहाण करणाऱ्या चौघांवर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत करण दिपक बनसोडे (वय २४, रा. जुना बोरामणी नाका, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन आकाश मोहिते, विशाल मोहिते, गणेश मोहिते, विशाल मोहिते (रा. रविवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ एप्रिल रोजी सायंकाळी रविवार पेठ येथे करण बनसोडे याचा भाऊ नागेश बनसोडे याच्या मोबाईलवर विशाल मोहिते याने फोन करून भावाचे स्टेटस काढून टाक नाही तर तुझ्यामध्ये दम असेल तर सुत मिल जवळ ये, तुला उभ्याने चिरतो अशी धमकी देऊन शिवीगाळ करून मोबाईल बंद केला. त्यानंतर करण बनसोडे, भाऊ नागेश व मित्र सागर, आकाश असे रिक्षातून सुत मिल येथे जाऊन मोबाईलवरून शिवीगाळ का करतो असे विचारले. त्यावेळी मोहिते यांनी लोखंडी रॉडने नागेश याच्या डाव्या हातावर जबर मारहाण करून जखमी केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मेंडके पुढील तपास करीत आहेत.

### बुक्कीने बायकोला मारहाण करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ मे -**

घरगुती कारणावरून बायकोला बुक्कीने मारहाण करून जखमी करणाऱ्या पतीविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अलाशा मुस्तफा नदाफ (वय २८, रा. बैतुल मुकरम अपार्टमेंट, किडवाई चौक, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन मुस्तफा नदाफ (रा. बैतुल मुकरम अपार्टमेंट, किडवाई चौक, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ एप्रिल रोजी रात्री आकराच्या सुमारास अलाशा या घरी असताना पती मुस्तफा हा दारू पिऊन घरी आला. त्यावेळी घरगुती कारणावरून दारूच्या नशेत मुस्तफा याने अलाशा हिच्या डाव्या कानावर जोरात बुक्की मारून तिस दुखापत केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मेंडके पुढील तपास करीत आहेत.

### प्रताप नगर तांड्यावर मारहाण करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ मे -**

प्रताप नगर तांड्यावर तरूणास मारहाण करणाऱ्या तिघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ऋतिक नागनाथ राठोड (वय २०, रा. प्रताप नगर तांडा, विजापूर रोड, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन मिथुन धनसिंग पवार, अंजली पवार, गंगा (रा. प्रताप नगर तांडा, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ एप्रिल रोजी दुपारी प्रताप नगर तांडा येथे ऋतिक राठोड हा मिथून पवार याच्या भावाची मुलीसोबत बोलत असल्याच्या कारणावरून लोंखडी वस्तुने राठोड यास मारहाण करून जखमी केले. तसेच राठोड याची आजी शांताबाई राठोड या भांडण मिटविण्यासाठी आल्या असता त्यांच्याही डाव्या करंगळीचे बोटाला मारून जखमी केले. तसेच अंजली पवार व गंगा यांनी राठोड यास शिवीगाळ केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# थेट मणिपूर येथे सोलापूरच्या ज्ञानप्रबोधिनीचा संवाद-मैत्री उपक्रम

✔ प्रशिक्षणातून संवाद अन् संवादातून मैत्रीने जोडला पूर्वांचल भारत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

येथील ज्ञान प्रबोधिनी संस्थेने पूर्वांचल भारतातील मणिपूरमध्ये जाऊन संवाद मैत्रीद्वारे तेथील विद्यार्थ्यांना संकणकाचे प्रशिक्षण देत प्रशिक्षणातून संवाद अन संवादातून मैत्रीने पूर्वांचल भारताला सोलापूरशी जोडण्याचे काम केले आहे.

मणिपूरच्या विद्यार्थ्यांना गेल्या एक वर्षापासून संगणकाचे ऑनलाईन प्रशिक्षण दिले जात आहे. त्याचा पुढील भाग म्हणून संस्थेचे काही प्रशिक्षक विद्यार्थ्यांशी मैत्री संवाद साधण्यासाठी थेट मणिपूर येथे पोहोचले. त्याच संवादातून मैत्री अधिक दृढ झाल्याची भावना युवक प्रतोद देविदास यादव यांनी व्यक्त केली.

फेब्रुवारी २०२४ पासून मणिपूरची राजधानी इंफाळपासून ३५ किमी. दूर डोंगर पायथ्याशी व सुविधांपासून वंचित हैरोक गावात तसेच इंफाळपासून ७० किमी.वरील डोंगर द-यातील दुर्गम अशा मरींग जनजातीच्या मची येथे ऑनलाइन शिक्षण व संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तेव्हापासून सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी हे गणित व इंग्रजी हे विषय दर रविवारी एक तास ऑनलाइन शिकवत आहेत व श्री. यादव संगणक प्रशिक्षण घेत आहेत. तेथील विद्यार्थी व युवकांशी मैत्री व्हावी व शिकवणे सहज सोपे व्हावे यासाठी तेथे प्रत्यक्ष भेट देण्याचे ठरवून येथील प्रशिक्षकांनी मणिपूर गाठले अन विद्यार्थ्यांशी मैत्री केली.

याबाबत माहिती देताना श्री. यादव म्हणाले, २३ एप्रिल २०२५ रोजी अनंतदादा, मी व युवक हर्ष भैरप्पा असे तिघेही मुलांना सोडण्यासाठी व तेथे संगणक प्रशिक्षण देण्यासाठी सोलापूरहून निघालो. ३ दिवस अत्यंत कष्टदायक प्रवास करून २६ एप्रिल रोजी मणिपूरला पोहोचलो. दि. २७ ते २९ एप्रिल या कालावधीत आम्ही हैरोक प्रशिक्षण केंद्र संयोजक चित्तरंजनजी यांच्या घरी राहून विद्यार्थ्यांसाठी विज्ञान, संगणक ओळख, करिअर गायडन्स ही सत्रे घेतली. ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी अतिशय कुतुहलाने व उत्साहाने यात सहभागी झाले. १२ युवक-युवतींना संगणकातील मायक्रोसॉफ्ट, चॅट, जीपीटी हे विषय घेतले.

सायंकाळी त्यांच्याबरोबर फुटबॉल खेळणे, घरी चहापानाला जाणे यातून त्यांच्याबरोबर मैत्रीची सुरुवात झाली. ३० एप्रिल ते दि २ मे या काळात आम्ही मची प्रशिक्षण केंद्र संयोजक श्री मोफुनजी यांच्या घरी राहिलो व युवकांचे संगणक प्रशिक्षण घेतले. नदीत अंघोळ, व्हॉलीबॉलचा खेळ यांतून तेथील युवकांशी मैत्र जुळले. यात १० युवक-युवती सहभागी होते.

३ मे रोजी आम्ही मची येथील प्रशिक्षण वर्ग संपवून इंफाळच्या दिशेने निघालो होतो. हैरोक येथे आल्यावर आम्हाला समजले की मणिपूरमध्ये बंद घोषित केला आहे. २ तास प्रतिक्षा केल्यावर एक ट्रॅक्टरने आम्हाला इंफाळपर्यंत सोडण्यास तयार झाला. आम्ही आमचे सर्व साहित्य घेऊन कसेबसे प्रति तास १० किमी. वेगाने अडीच तासात ३५ किमी. अंतर पूर्ण करून इंफाळला पोहचलो. दि. ४ मे ला आम्ही सोलापुरात पोहोचलो. या दोन्ही ठिकाणी विद्यार्थी व युवकांशी घट्ट मैत्री होण्यासाठी वारंवार जाण्याची गरज आहे. येत्या काळात तशी योजना करण्याचा विचार आहे असेही श्री. यादव यांनी सांगितले.

# चालती एसटी आगीच्या भक्ष्यस्थानी

**महिला वाहकाच्या सतर्कतेमुळे वाचले ४७ प्रवाशांचे प्राण : तुळजापूर नाका येथील घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मे-**

तुळजापूरहून सोलापूरला येणाऱ्या एम.एच.२९ बी.एल.४२२६ एसटी बसला तुळजापूर नाका येथे अचानक आग लागली. याआगीत चालकाची केबिन भक्षस्थानी पडली. सुदैवाने या घटनेमध्ये कोणतेही जीवितहानी झाली नाही. एसटी प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांना तात्काळ सुखरूप बाहेर काढण्यात आले. मात्र या आगीमध्ये एसटीचे लाखोंचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, जुना तुळजापूर नाका येथे चालत्या एसटीने अचानक पेट घेतला. कर्तव्यावर असणाऱ्या महिला एसटी वाहकाच्या प्रसंगावधानामुळे होणारा मोठा अनर्थ टळला. चालकाच्या केबिन मधून धूर येत असल्याचे लक्षात आल्यानंतर, महिला वाहकाने एसटी चालकास तात्काळ एसटी थांबवण्यास सांगितले. त्यानंतर एसटी मधील सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. प्रवाशांना बाहेर काढल्यानंतर काही वेळातच चालकाच्या केबिनमध्ये असणारे एसटीचे इंजिन आगीच्या भक्षस्थानी पडले. मात्र आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असून या घटनेचा तपास पोलीस आणि एसटी महामंडळाच्या अधिकारी करत आहेत.

प्रसंगावधान दाखवत एसटी कर्मचाऱ्यांनी तात्काळ अग्नीशामक दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशामक दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करत एसटी बसला लागलेली आग आटोक्यात आणली. सदरची एसटी बस ही तुळजापूर आगाराची असून घटनेचा पुढील तपास सुरू असल्याचे एसटी महामंडळाच्या वतीने सांगण्यात आले.



**सोलापूर : तुळजापूर नाका येथे चालत्या एसटी बसला अचानक आग लागली. अग्निशामक दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करत आग आटोक्यात आणली.**

### आगीची तपासणी सुरू आहे

सदरची बस तुळजापूर वरून सोलापूरला येत होती. याएसटी बसमध्ये ४७ प्रवासी प्रवास करत होते. आगीची घटना लक्षात आल्यानंतर तात्काळ बस उभी करून प्रवासी सुखरूप बाहेर काढण्यात आले. अग्निशामक दलाच्या वतीने एसटी बसला लागलेली आग विझवण्यात आली. ज्या घटनेत एसटीचे अंदाजे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सदर घटनेची तपासणी सुरू आहे. बोनेट तपासले जात आहे. आग कशाने लागली हे अद्यापही समजले नाही. ही एसटी तुळजापूर डेपोची असून साधारणतः ८ वर्षांपूवीची आहे.

**- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग**

# सोलापूर विद्यापीठ परीक्षा विभागाच्या संचालकांनी राजीनामा द्यावा

**अधिसभा सदस्य ॲड. नीता मंकणी यांची मागणी; परीक्षा विभागाच्या सावळ्या गोंधळामुळे परीक्षा पुढे ढकलल्या**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचा गलथान कारभार, बेफिकीर आणि मनमानी पद्धत विद्यापीठामध्ये नेहमीचीच झाली आहे. ना जबाबदारी, ना संवाद फक्त अचानक घेतलेले निर्णय. ज्याचा फटका विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होत आहे. त्यामुळे परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या ॲड. नीता मंकणी यांनी केली आहे.

वेळेपूर्वीच परीक्षेच्या तारखा निश्चित करण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या होत्या. कारण अनेक विद्यार्थी दूरवरून मोठ्या अडचणींवर मात करून, आर्थिक ताण, आरक्षणाच्या समस्या आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या बाजूला ठेवून परीक्षेसाठी येतात. तरीसुद्धा डॉ. अंधारे यांनी एकाच






परिपत्रकाद्वारे पदव्युत्तर विभागाच्या परीक्षा एक दिवस अगोदर पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. तोही केवळ आपल्या केबिनमध्ये बसून विद्यार्थ्यांच्या व्यथेतेचा जराही विचार न करता, असे त्यांचेय म्हणणे आहे.

**परीक्षा संचालकाचे वक्तव्य दिशाभूल करणारे, कुलपतींनी लक्ष घालावे**

ॲड. मंकणी यांचे असे म्हणणे आहे की परीक्षा पुढे ढकलण्यामागील मुख्य कारण म्हणजे विद्यापीठाच्या एज्युलॅब या सॉफ्टवेअरमध्ये अद्याप प्रश्नपत्रिका तयार नसणे हे आहे. परंतु संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी वृत्तपत्रामधील उत्तरामध्ये हे कबूल न करता ''प्रशासकीय कारणामुळे परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या'' असे सांगितले. जे अत्यंत दिशाभूल करणारे आणि अपारदर्शक आहे. प्रत्येक वेळी ते परीक्षा पुढे ढकलणार का? खरे कारण म्हणजे सॉफ्टवेअरची अपयशी कार्यप्रणाली आणि परीक्षेच्या यंत्रणेची तयारी पूर्ण न होणे हे आहे. आजची अडचण तर फक्त सुरुवात आहे. १४ मेनंतर परीक्षा सुरु झाल्यावर आणखी कोणते संकट ओढवेल, हे कोणालाही सांगता येणार नाही. ही संपूर्ण असमर्थता आणि अनिश्चितता हे गंभीर चिंतेचे कारण आहे. त्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना अधिक चांगली व्यवस्था आणि जबाबदार नेतृत्वाची गरज आहे. जर ही परिस्थिती अशीच राहिली तर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मानसिक त्रास होईल. तरी यात कुलपती महोदयांनी लक्ष घालावे.

# सहा मे पासून शाळांना सुट्टी, १६ जूनपासून होणार शाळा सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

२५ एप्रिल रोजी वार्षिक परीक्षा संपल्यानंतर एक मे रोजी वार्षिक परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यानंतर मंगळवार ६ मे पासून रविवार १४ जून पर्यंत शाळांना सुटी देण्यात आली असून १६ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरूवात होणार आहे.

परीक्षा संपल्या तरी निपुण भारत अंतर्गत अध्ययन स्तर उंचविण्यासाठी मुलांना ६ मे पर्यंत शाळेत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आले होते. मात्र परीक्षा संपल्यानंतर मुले शाळांकडे फिरकलेच नाहीत. त्यामुळे शिक्षकांनी कागदी घोडे नाचवून निपुण भारत अभियान यशस्वी केल्यानंतर मंगळवार ६ मे पासून सुटी देण्यात आली आहे. राज्यातील सर्व शाळांसाठी एकाच वेळी परीक्षा आणि ऊन्हाळी सुटी जाहीर केलीआहे. तीन मे पासून सुट्टी मिळणे अपेक्षित होते. मात्र शिक्षण विभागाने सर्व मुख्याध्यापकांना पत्र काढून ६ मे पासून उन्हाळी सुटी जाहीर केली आहे.

# चंदननगर परिसरातील रस्ता दुरूस्तीची मागणी

**सोलापूर, दि.६ मे-**

जुळे सोलापूरातील डीमार्ट चौकापासून ते मजरेवाडी रेल्वे गटेपर्यंतचा चंदनगरातील रस्ता पाईपलाईन तसेच अन्य कामामुळे खोदून ठेवल्याने नादुरूस्त झाला आहे. तो लवकर दुरूस्त करण्याची मागणी नागरिकातून होत आहे. या रस्त्याचे काम अनेक वर्षानंतर झाले होते. तो आता खोदाईच्या कामामुळे खड्डेमय झाला आहे. त्यामुळे वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. खोदाईचे काम संपल्यानंतरही रस्ता दुरूस्त केला जात नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## देऋब्रातर्फे आज मोफत सामुदायिक मौजीबंधन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर यांच्यावतीने उद्या बुधवार दि. ७ मे रोजी द्वारकाधीश मंदिरात नऊ बटूंचा सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा सामुदायिक मौजीबंधन सोहळा विजापूर रोडवरील द्वारकाधीश मंदिरात सकाळी १० वा. १३ मिनिटांनी होत आहे. या मौजीबंधन सोहळ्यात अहिल्यानगर, पालघर येथील बटूंसह सोलापुरातील बटूही सहभागी होणार आहेत. हा मौजीबंधन सोहळा पूर्णपणे मोफत करण्यात येत आहे. तसेच बटूंसमवेत येणाऱ्या मर्यादित पाहुणे मंडळींना मोफत भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तसेच मुंजी साठी लागणारे सर्व साहित्य आणि सर्व धार्मिक विधी संस्थेतर्फे केला जाणार आहे. यासाठी कसल्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेले नाही.

गेल्या जवळपास एक-दीड महिन्यापासून या सोहळ्याची तयारी करण्यात आली आहे. यानिमित्ताने बटूंना आशीर्वाद देण्यासाठी समाजातील अनेक मान्यवरांनाही निमंत्रण देण्यात आले आहे, अशी माहिती या सामुदायिक मौजीबंधन सोहळ्याचे प्रमुख आणि युवक शाखेचे अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांनी दिली आहे. या सामुदायिक मौजी बंधन सोहळ्यानिमित्त सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आली आहे. बुधवार ७ मे रोजी सकाळी नऊ वाजल्यापासून द्वारकाधीश मंदिरामध्येच रक्तदान शिबिर होत आहे. डॉ. हेडगेवार रक्त संकलन केंद्राच्या सहकार्याने हे शिबिर होणार असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### रामेश्वर उदगिरी यांना अमेरिकेच्या विद्यापीठातून मास्टर डिग्री प्रदान

**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापुरातील रामेश्वर संतोष उदगिरी यांनी अमेरिकेतील बोस्टन येथे नॉर्थ ईस्टर्न युनिव्हर्सिटीमधून मास्टर ऑफ सायन्ससेस इन मेकॅनिकल इंजिनिअर विभागातून मास्टर डिग्री संपादन केली आहे. अमेरिकेत नुकताच पदवीदान समारंभ पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रामेश्वर यांनी पदवी संपादन केली. रामेश्वर हे सोलापुरातील समर्थ जाहिरात एजन्सीचे प्रमुख संतोष उदगिरी यांचे चिरंजीव आहेत.



### एक जिल्हा; एक नोंदणी योजना कार्यान्वित

**सोलापूर, दि. ६ मे-**

राज्य शासनाच्या एक जिल्हा, एक नोंदणी या नव्या योजनेची अंमलबजावणी सोलापूर जिल्ह्यात दि.१ मे पासून सुरू झाली आहे. या योजनेनुसार जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांचे दस्तऐवज नोंदणीचे कार्यक्षेत्र आता सामायिक करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यातील मिळकतीच्या दस्त नोंदणीसाठी त्याच तालुक्यातील नोंदणी कार्यालयात जाऊन दस्त नोंदणी करणे अनिवार्य नाही. जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यातील मिळकतीच्या दस्ताची नोंदणी कोणत्याही तालुक्यातील नोंदणी कार्यालयात करता येईल. नागरीकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सह जिल्हा निबंधक (वर्ग १) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पी.जी. खोमणे यांनी केले आहे.

### २१ मे ला जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धा

**सोलापूर, दि. ६ मे-**

शब्दसृजन प्रतिष्ठान आणि दी माही वे चॅरिटेबल अँड एज्युकेशनल ट्रस्टच्या वतीने 'जिल्हास्तरीय खुल्या काव्यवाचन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षीसांसह स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र आणि काव्यसंग्रह दिले जाणार आहेत. एकूण सहा बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेमध्ये वय वर्षे १८ पासून पुढे कोणत्याही स्पर्धकास सहभागी होता येईल. या स्पर्धेमध्ये स्पर्धकांना आपल्या आवडत्या कोणत्याही कवी वा कवयित्रींनी लिहिलेली रचना सादर करता येईल. ही काव्यवाचन स्पर्धा असल्याने काव्य सादरीकरणाला महत्त्व आहे. स्पर्धेत मराठी भाषेतील कविता व रचना सादर करता येतील. या स्पर्धेत केवळ पहिल्या ४० स्पर्धकांनाच प्रवेश देण्यात येणार असल्याने प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असेल. ही स्पर्धा दिनांक २१ मे रोजी आयएमआय हॉल येथे संध्याकाळी साडेपाच वाजता संपन्न होणार असून या स्पर्धेमध्ये शहर आणि जिल्ह्यातील जास्तीत जास्त काव्यप्रेमी कलावंतांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन या स्पर्धेचे संयोजक प्रथमेश कासार, रश्मी मोहोळकर, नितीन जाधव आणि बळवंत जोशी यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी प्रथमेश कासार ८६९८१७७१३१, रश्मी मोहोळकर ७२४९१०१६८९ या क्रमांकावर संपर्क करावा.

### शंभुराजे छावा जन्मोत्सव अध्यक्षपदी आशितोष इंगवले तर उपाध्यक्षपदी प्रताप खंदारे



आशितोष इंगवले



प्रताप खंदारे

**सोलापूर, दि. ६ मे-**

शंभुराजे युवा संघटन प्रणित शंभुराजे छावा जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाची बैठक शंभुराजे संपर्क कार्यालय शिंदे चौक येथे संघटनेचे अध्यक्ष नितीन चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. उत्सव समिती अध्यक्षपदी आशितोष इंगवले यांची एकमताने निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी प्रताप खंदारे, खजिनदार ऋषीकेश सुरवसकर, सचिव राहुल पाटील, पूजा प्रमुख अनिल कवडे यांची निवड करण्यात आली. मध्यवर्ती मंडळाच्या नुतन पदाधिकारी निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन चव्हाध, उपाध्यक्ष अभिजीत पवार, सचिव दत्तात्रय सुरखसकर, राज पंचारिया, शहराध्यक्ष प्रशांत गुंडला, प्रसिद्धीप्रमुख अनिल कवडे, राकेश पंचारीया, चंद्रकांत मोरे, अनिकेत भिसे, विजय गुंड, नितेश माने, सुशांत सुकोलालू, अजय पुजारी, उपस्थित होते.

# सोलापूर महापालिका निवडणूक जून २०२२ च्या आरक्षणानुसार होणार

- महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक लागले कामाला
- सर्व पक्षांकडून मोर्चेबांधणीला होणार सुरुवात
- महायुती आणि महाविकास आघाडीच्या पातळीवर लागणार चुरस

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ६ मे-**

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्याच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात आदेश दिले आहेत. यामुळे आता तीन वर्षानंतर पुन्हा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरु होणार आहे तर दुसरीकडे इच्छुक उमेदवार ही कामाला लागणार आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या पातळीवर ही निवडणूक चांगलीच चुरशीची ठरणार आहे. सोलापूर महापालिका निवडणुक १३ जून २०२२ रोजी जाहीर झालेल्या अंतीम आरक्षणा नुसार होईल अशी चर्चा होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या. सन १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. यामुळे आता महापालिका निवडणुकीची लगबग सुरू होणार आहे. मुंबई वगळता राज्यातील सोलापूर महापालिकेसह सर्व महापालिकांमध्ये पुन्हा



एकदा चार सदस्यीय प्रभाग पद्धती लागू करण्याचा निर्णय फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार, याबाबत मात्र संभ्रम आणि उत्सुकता लागून राहिली होती. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आजच्या आदेशामुळे आता महापालिका निवडणुकीसाठी पुन्हा मोर्चेबांधणी सुरु होणार आहे.

महाराष्ट्र राज्यात गेली २० वर्षे महापालिकांमधील प्रभाग रचनेत वेळोवेळी बदल करण्यात आला. सत्ताबदल झाल्यानंतर नवीन सरकार आपापल्या राजकीय सोयीने प्रभागांच्या संख्येत बदल करण्यात आले आहेत. सन २००१मध्ये विलासराव देशमुख सरकारच्या काळात बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू करण्यात आली. तेव्हापासून दर पाच वर्षांनंतर प्रभागांच्या संख्येत बदल करण्यात येत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने सन २०१७ मध्ये बहुसदस्यीय म्हणजेच चार सदस्यांची एक प्रभाग पद्धती लागू केली होती. मात्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने सन २०१९मध्ये फडणवीस सरकारचा निर्णय रद्द करीत पुन्हा एकदा एकसदस्यीय प्रभाग रचना लागू केली होती. त्यानंतर पुन्हा ठाकरे सरकारनेच सप्टेंबर २०२१ मध्ये तीन सदस्यीय प्रभाग रचनेचा निर्णय घेतला. दरम्यानच्या काळात कोरोनामुळे महापालिकांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या. त्यानंतर न्यायप्रवीष्ट असल्याने महापालिका निवडणुकांना मुहूर्त मिळालेला नव्हता.

### २०१७ मध्ये चार सदस्यांचा होता एक प्रभाग

यापूर्वी महापालिका निवडणूक २०१७ मध्ये चार सदस्यांचा एक प्रभाग होता. यात प्रत्येकी दोन जागा महिलांसाठी तर दोन जागा सर्वसाधारण अशी रचना होती. त्यामुळे सर्वांना संधी उपलब्ध झाली होती. सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी अंतीम आरक्षण १३ जून २०२२ रोजी जाहीर केले होते. त्यावेळी महापालिका निवडणुकीत एकुण ११३ जागांसाठी तीन सदस्यांचा एक प्रभाग अशी रचना करण्याचा निर्णय झाला होता. यामुळे मागील चार सदस्य मधील एकावर गंडांतर येणार होते. ओबीसींच्या आरक्षणाशिवाय निवडणुकीच्या आधी निर्देशानुसार आरक्षण सोडत जाहीर झाली होती. काही जण सेफझोन मध्ये तर काही दिग्गज डेंजर झोन मध्ये असल्याचे चित्र होते. यामुळे शेजारील प्रभाग शोधण्यासाठी धडपड करावी लागणार होती. दरम्यान पुन्हा आता महापालिकेत आता ४ सदस्यांचा प्रभाग पद्धतीच्या निर्णयावर राज्य मंत्रीमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब झाला होता.

### सोलापूर महापालिका निवडणूक २०२२ साठी असे होते प्रभाग आरक्षण

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२२ करिता शासन आदेशानुसार अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभाग निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले होते. एकूण ११३ जागांपैकी ५७ जागा महिलांसाठी आरक्षित होत्या. प्रवर्गनिहाय एकूण जागांची संख्या आणि कंसात महिलांकरिता आरक्षित जागा याप्रमाणे - अनुसूचित जाती - एकूण जागा १६ (८), अनुसूचित जमाती - ०२(०१), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) - ३०(१५), सर्वसाधारण- ६५(३३).

### असा झाला प्रभाग रचनेत वेळोवेळी बदल!

- २००२ : बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू. तीन सदस्यीय प्रभाग
- २००७ : पुन्हा एक सदस्यीय प्रभाग पद्धत लागू
- २०१२ : चार सदस्यीय प्रभाग पद्धत लागू
- २०१७ : चार सदस्यीय प्रभाग पद्धत कायम
- २०२० : एक सदस्यीय प्रभाग पद्धत
- २०२१ : तीन सदस्यीय प्रभाग पद्धत
- **फेब्रुवारी २०२४** : पुन्हा चार सदस्यीय प्रभाग पद्धत

### सोलापूर महापालिकेत सन २०१७ मध्ये असे होते पक्षीय बलाबल

सोलापूर महापालिकेच्या स्थापनेनंतर प्रथमच सन २०१७ मध्ये सोलापूर महापालिकेत भाजपाची सत्ता प्रस्थापित झाली. यावेळी असलेले एकूण १०२ जागांपैकी पक्षीय बलाबल असे - भाजपा - ४९, शिवसेना - २१, काँगेस - १४, राष्ट्रवादी काँग्रेस - ४, एमआयएम - ९, बसपा -४, माकपा -१.

### सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीतील सदस्य संख्या व आरक्षित जागा अशा

सन २०१७ मध्ये झालेल्या सोलापूर महापालिका निवडणुकीत एकूण १०२ सदस्य होते. चार सदस्यांचा एक प्रभाग होता. एकूण २६ प्रभाग रचना होती. यामध्ये प्रवर्ग निहाय आरक्षण पाहिले असता अनुसूचित जातीसाठी १५ जागा, अनुसूचित जमातीसाठी २ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) २८ जागा अशा एकूण १०२ जागा होत्या. दरम्यान एकूण १०२ सदस्यांपैकी राखीवसह सर्व महिलांसाठी ५१ जागा आरक्षित होत्या.

### सोलापूर महापालिकेच्या आरोग्य अधिकारी

## डॉ. राखी माने, बेले यांच्यावर अदखपात्र गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

गुरूनानक चौक येथील जिल्हा रूग्णालयातील कंत्राटी महिला कर्मचाऱ्यास सोलापूर महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी सुहास माने यांच्याकडून तु कोणाकडे तक्रार केली तर तुझ्या नरडीचा घोट घेतो, तुला कामावरुन काढून टाकेन अशी धमकी देणे. फिर्यादी यांची चारीत्र्यावरुन सर्वत्र बदनामी करणे, परिणामी आदी तक्रारींवरून सदरच्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांनी सदर पोलिस स्टेशन मध्ये लेखी तक्रार दिली आहे. त्यामुळे सोलापूर महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी सुहास माने आणि विजयमाला बेले यांच्यावर सदर बझार पोलिस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

तक्रारदार कंत्राटी महिला कर्मचाऱ्यास संबंधीतांकडून गेल्या ३ महिन्यांपासुन त्रास सुरू असल्याने अखेर पोलिसांकडे धाव घेतली. त्यांनी तक्रारीत म्हटले आहे, की ४ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरुनानक चौक येथील जिल्हा रुग्णालयात मी काम करत असताना यातील डॉ. राखी सुहास माने आणि विजयमाला बेले यांनी तेथे येऊन मला दमदाटी केली. आम्ही मोठ्या पदावर आहे. आमच्या ओळखी खूप आहेत. जर तु कोणाकडे तक्रार दिली तर तुझ्या नरडीचा घोट घेतो. तुला कामावरून काढून टाकेण अशी धमकी दिली, अशा आशयाची सविस्तर तक्रार पोलिसांत दिली आहे. त्यावरून सदर बझार पोलिस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक जगताप करत आहेत.

# उळेगावच्या 'त्या' अपघातग्रस्त पुलाचे काम अखेर सुरु

- सोलापूर दैनिक तरूण भारतच्या वृत्तमालिकेला यश
- उळेगावकरांसह वाहनधारकांतून समाधानाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्रं ५२ चे चौपदरीकरणाचे काम करताना दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावचा जुना पूल तसाच ठेवल्याने या रस्त्यावर वारंवार अपघात होत होते. त्या प्रकल्प संचालकांच्या एका चुकीमुळे काहींचे विनाकारण जीव गेले तर अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणाम नुकसान झाले होते. याबाबत दैनिक तरूण भारतच्या माध्यमातून सलग मालिका प्रकाशित केल्यानंतर नूतन प्रकल्प संचालय राकेश जावडे यांनी चांगलंच मनावर घेवून हा प्रश्न निकाली काढला आणि या नवीन पुलाच्या बांधकामाचा आज मंगळवार, दि. ६ पासून श्रीगणेशाही केला आहे.

दरम्यान, यामुळे उळेगावकर नागरिक आणि अनेक वाहनधारकांतून समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उळे येथील त्या अरुंद पुलावर राष्ट्रीय राजमार्ग बनविल्यापासून महिना दोन महिन्याला अपघाताची मालिका सुरूच होती. त्या अरुंद पुलाकडे संबंधित अधिकाऱ्यांचे तसे दुर्लक्षच झाल्याने याचा त्रास मात्र अनेक वाहनचालकांना सहन करावा लागला आहे. नवीन वाहनचालकांना या अरुंद पुलावरून गाडी चालविताना पुलाचा अंदाज येत नसल्याने अपघात होत असत. यामुळे या अरूंद पुलाचे रूंदीकरण होणार की असेच घडणारे अपघात संबंधित अधिकारी बघतच राहणार? असा संतप्त सवाल वाहनचालक व स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात असे.

उळे येथील तो जुना अरुंद पुल न पाडताच त्यालाच डागडुजी केली व नविन पुल तयार केल्याचे दाखवले. परंतु राष्ट्रीय राजमार्ग तयार झाल्यापासुन याच अरुंद पुलावर अनेक अपघात झाले. काहींना यामुळे आपले प्राण गमवावे लागले असून, अनेकजण जखमी झाले आहेत. तसेच अनेक वाहनांचे अतोनात नुकसानही झाले आहे. या जुन्या व अरुंद पुलामुळे दि.३१ मार्च रोजी साधारणतः दीड ते दोन वाजणेच्या सुमारास तुळजापूरच्या दिशेने जाणारा टेम्पो (टेम्पो क्रं एम एच १३ सी यु ८२३० ) अंदाज न आल्याने त्या अरुंद पुलाच्या कठड्याला जोरदार धडकला व अपघात घडला. या धडकेत पुलाचा कठडा तुटला व सदरील टेम्पो चेंडुसारखा धडकुन रस्त्यावर आडवा झाल्याचे दिसून आले. वारंवार असेच अपघात होत असल्याने दै. तरूण भारतच्या माध्यमातून आम्ही वृत्तमालिका प्रकाशित केली आणि याची दखल महामार्ग अधिकाऱ्यांनी घेतल्याने अखेर त्या पुलाचे काम आज मंगळवारपासून चालू झाले आहे.



### 'तो' जुना पुल त्याचवेळी का पाडला नाही?

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्रं ५२ वरती उळे येथील तो जुना अरुंद व अपघातग्रस्त पुल नवीन रस्ते बांधणी करताना नव्याने का बनवला गेला नाही? हा प्रश्न मात्र कायम अनुत्तरित राहिला आहे. गेल्या ३ महिन्यापासून या उड्डाणपूलावर सुरक्षेसाठी मातीच्या गोणी भरुन, तसेच पुलावर पथदिवे बसवुन (बॅरेकेटिंगमुळे) अपघात घडणार नाहीत याची काळजी घेतल्याने अनेक वाहनधारकांचे अपघात टळले आहेत. तरीही या पुलाची नव्याने बांधणी करावी या मागणीसाठी उळे, कासेगाव येथील नागरीक तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येताच महामार्गाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या पुलाचे काम आता सुरू केल्याचे स्थानिक नागरिकांनी दै. तरूण भारतशी बोलताना सांगितले.

### ३ ते ४ महिन्यांत नाविण्यपूर्ण पुलाची निर्मिती

उळेगाव येथील त्या अरूंद पुलावर वारंवार अपघात होत होते. यामुळे वाहनधारकांनीही नव्याने पूल उभारण्याची मागणी लावून धरली होती. यामुळे आम्ही उळेगाव येथील या अरूंद पुलाची नव्याने उभारणी करण्यासाठी आराखडा तयार करून आमच्या दिल्ली येथील वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला होता. त्यास मंजुरी आल्याने आता प्रत्यक्षात काम चालू केले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी हा पूल उभारण्यासाठी पायाभरणी व पिलर उभे केले जातील. यानंतर पावसाळ्यातही याचे काम चालूच राहणार आहे. किमान ३ ते ४ महिन्यात हा नाविण्यपूर्ण पूल उभारण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. साधारणतः या कामासाठी अंदाजे दीड कोटीपर्यंत खर्च होण्याची शक्यता आहे.

### ● उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील ॲक्शन मोडवर

# सर्व शिक्षण सहसंचालक कार्यालयाची कामत समितीकडून चौकशी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे-**

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील हे ॲक्शन मोडवर आले असून या विभागातर्फे डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून सर्व सहसंचालक कार्यालयाची चौकशी केली जाणार आहे. समिती स्थापन करण्याबाबतचा अध्यादेश सोमवार ५ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.



राज्याच्या उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रशासकीय कामांसाठी टेबलाखालून आर्थिक देवाण-घेवाण केली जात असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. त्यामुळे या कामात पारदर्शकता आणण्यासाठी स्वतः राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काही सहसंचालक कार्यालयाला प्रत्यक्षात भेटी देऊन कार्यालयातील कामकाजात सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर आता राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून सर्व सहसंचालक कार्यालयाची चौकशी करण्यात येणार आहे.

राज्याच्या उच्च शिक्षण संचालक कार्यालयातर्फे राज्य शासनाला सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनियम अधिनस्त असणाऱ्या सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयाचे परखड व वस्तुनिष्ठ कार्यमूल्यांकन करणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यानुसार उच्च शिक्षण कार्यालयातील प्रशासकीय व वित्तीय बाबींची तपासणी करणे, कार्यालयातील प्रलंबितता दूर करणे, प्रशासकीय गतिमानता आणण्याकरिता उपाय योजना सुचवण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली आहे. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली असून उच्च शिक्षण संचालनालयातील लेखा सहाय्यक संचालक शिवाजी ठोंबरे, उच्च शिक्षण संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी सुयश दुसाने यांची या समितीत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयांचे तृतीय पक्षी लेखापरीक्षण केले जाणार आहे. सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या निवृत्ती वेतनाच्या कामासाठी पैसे घेणे, मेडिकल बिल मान्य करण्यासाठी टक्केवारी घेणे, कॅस व इतर कामासाठी भ्रष्ट्राचार होत असल्याचे आरोप वारंवार होत आहेत. तसेच कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील बोगस शिक्षकेतर कर्मचारी भरती झाल्याचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले होते. त्यामुळे यासर्व बाबींची सखोल चौकशी करण्यासाठी कामत समिती स्थापन करण्यात आली असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून सांगितले. परिणामी अनेक लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांचे धाबे दणाणले आहेत.

### अद्याप पत्र प्राप्त नाही

ही समिती नियुक्ती केल्यासंदर्भात सोलापरचे विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. उमेश काकडे यांच्याशी दैनिक तरुण भारतने संपर्क साधला असता या संदर्भात अद्याप आमच्या कार्यालयास पत्र प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

## सोलापूर उर्दू घर येथे १८ मे पासून उर्दू भाषा वर्ग

**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूर उर्दू घर येथे उर्दू भाषेची प्रगती, विस्तार व प्रचारासाठी उर्दू भाषा शिकण्याची सुवर्णसंधी मराठी व इतर भाषिक लोकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

उर्दू भाषा वर्गाचे आयोजन रविवार दि. १८ मे पासून दर रविवारी सकाळी १० ते ११ या वेळेत सोलापूर उर्दू घर (सिव्हील हॉस्पिटल, समोर) येथे करण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी नाव नोंदविण्याकरिता व्यवस्थापक सोलापूर उर्दू घर (९४२२५३२७८६, ९८२२८०९३३२)यांच्याशी संपर्क साधावा.

**प. पू. सद्गुरु इनामदार गुरुजी यांचा ४१ वा पुण्यतिथी महोत्सव**



कार्यक्रम
बुधवार दि. ७/५/२०२५ रोजी
११ ते १२ वा. भजन
१२ वा. गुलाल, नंतर महाप्रसाद वाटप
तरी सर्वांनी कृपादर्शनाचा लाभ घ्यावा ही विनंती.
- विश्वस्त मंडळ -

**श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्ट**
बुधवार पेठ, प्रभाकर महाराज रोड, सम्राट चौक, सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०८

**सृष्टी गेली रे गेली । देवां मोकळवादी जाहली ।**
**ऐशी एक टाळी पिटली । सत्यलोकी ।।**

युध्द हे न्यायासाठी असो किंवा अन्यायाच्या बाजूने असो, त्याचा परिणाम किती भयानक असतो हे या ओवीतून दिसून येते. महाभारतीय युध्द हे पांडव व कौरवातील जरी असले तरी या युध्दात पाच पांडव व शंभर कौरवच लढले जाणार नव्हते. त्यांच्या सोबत, त्यांच्या बाजूने प्रेमापोटी, भीतीपोटी किंवा नाईलाजास्तव म्हणून का होईना लाखो लोक आले होते. युध्दाची जीद्द ही एकटया दुर्योधनानी केली असली तरीही संहार मात्र अनेक निरपराध लोकांचा होणार होता. युध्दासाठी लागणारे साहित्य हे समाजावर दिर्घकाळ विपरीत परिणाम करुन जाणारे होते. समाजाच्या गरजांसाठी हे साहित्य उपयोगात आले असते. पण युध्दामुळे हे साहित्य समाजाच्या उपयोगातून बाहेर काढले जाते. युध्दाचा विपरित परिणाम फक्त व्यक्तिवरच होतो असे नसून त्याचा विपरित परिणाम त्यांच्या कुंटुंबावर, समाजावर सुध्दा होत असतो. शांती हा समाजाच्या उन्नतीचा अत्यंत महत्वाचा मार्ग असल्याची जाणीव पांडवांना होती. म्हणून त्यांनी शांतीचा प्रस्ताव अनेक वेळा कौरवा समोर मांडला. पण कौरंवानी तो फेटाळला. साक्षात श्रीकृष्ण परमात्मा शांतीदुत बनून गेले असता त्यांनाही त्यांनी बंदीत टाकण्याचा प्रयत्न केला. अर्थात, स्वत:ची जिद्द, मोठेपणा, स्वार्थ टिकविण्यासाठी एखादा माणूस अनेकांचे बळी द्यायला तयार होतो. तेव्हा तो केवळ स्वत:पुरताच विचार करीत असतो. माणसाने अशा प्रसंगी इतरांचा विचार केला तर युध्दाऐवजी त्यांना शांती आवडू शकते. युध्द हे महाभारतातील असो की आमचे अंतर्गत असो. भावा-भावातील भांडणे असोत की शेजाऱ्या पाजाऱ्यातील वाद असोत, त्याचे परिणाम हे वाईटच असतात याची जाणीव ठेवलीच पाहिजे.



दोन्ही बाजूंचे अफाट सैन्य पाहिल्यानंतर या युध्दातून होणाऱ्या परिणामाची भीती प्रत्यक्ष ही रणभूमी पहाणाऱ्यांना तर झालीच, पण संजय सांगतो की, हे राजा युध्दाच्या परिणामाची भीती देवलोकांनाही होत आहे. या युध्दामुळे पृथ्वीवर काही शिल्लक राहणार नाही. हा एक महाभयंकर प्रलयकाळ आहे. युध्दाचा परिणाम वाईटच असल्यामुळे युध्द हे देवदिकांनाही आवडत नाही. तर आपण युध्दाची भाषा का करावी ? युध्द लहान असो की मोठे, अंतर्गत असो की बहिर्गत, त्याचा परिणाम वाईटच होणार असल्याने माणसाने युध्दा ऐवजी शांतीचा मार्ग पत्करणे सर्वांसाठी हितावह असते. युध्द करायचेच असेल तर द्वेष, मोह, लोभ, क्रोध, मत्सर, स्वार्थ, या वै-यांशी करावे. या युध्दातून या शत्रूंचा पराभव झाला तर शांती जिंकते. म्हणजे ख-या अर्थाने जीवनाचा आनंद मिळतो. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची, म्हणउनी शांती धरा । उतराल पैलतीरा ।, शांती परते नाही सुख । येर अवघेचि दु:ख ।। ही वचने लक्षात ठेवून सदैव जीवनात शांती सांभाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जीवन शांतीसाठीच आहे, हे नेहमी लक्षात ठेवून वागायला हवे. जेथे शांती असते तेथे आनंदलहरी वेगळयाने शोधाव्या लागत नाहीत.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ७ मे २०२५ | गुरुदेव रविंद्रनाथ टागोर जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | कालभैरव यात्रा बुलढाणा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी (१०.१९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू. फाल्गुनी (१८.१६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघात (२१.०३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२३.२१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल.

# एसटी स्टँड परिसर वाहतूक कोंडीच्या विळख्यात

## पालिका व पोलिस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूर स्मार्ट सिटीच्या मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते मुख्य चारही दिशांना जाणाऱ्या रस्त्यांवर लहान मोठ्या वाहनांची मोठी वाहतूक कोंडी गेल्या काय दिवसांपासून वाढत आहे. रविवारी तसेच सोमवारी या रस्त्यांवर चार चाकी, एसटी बसेस, रिक्षा, दुचाकी तसेच इतर वाहनांची मोठी वर्दळ होत असल्याने वाहतूक कोंडीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे चित्र आहे.

रविवार (दि.४) मे रोजी शहरात नीट परीक्षा संपन्न झाली, तेव्हा देखील वाहनांची मोठ्या प्रमाणात रेलचेल या रस्त्यांवर होती. त्यामुळे वाहतूक कोंडीत दिवसभर आणि सायंकाळी नीट परीक्षा संपल्यानंतर परगावी जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात भर पडली.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक कडे जाणारा रस्ता, तसेच सम्राट चौक, बाळीवेस, नवीवेस, नवीपेठ या रस्त्यांवर देखील वाहनांची मोठी गर्दी होते. सोमवारी देखील हेच दृश्य पहावयास मिळाले. एसटी स्टँड मधून बाहेर पडणाऱ्या एसटी बसेस आणि रस्त्याच्या मधोमध उभ्या असणाऱ्या रिक्षा आणि भरधाव येणारे चारचाकी वाहने यांचा गराडा एसटी स्टँड परिसरात दिसून येत आहे. सध्या उन्हाळ्याचा हंगाम सुरू असल्याने सोलापूर एसटी स्टँडमधून एसटी बसेस मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. एसटी बसेसच्या जादा फेऱ्या वाढवल्याने, दुसरे बंद असलेले प्रवेशद्वार एसटी महामंडळाने उघडलेले आहे. दोन्ही बाजूंनी एसटी प्रवेशद्वार सुरू झाल्याने छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे येणारा रस्ता वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकत आहे. त्याचप्रमाणे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना रिक्षांचा घोळका कायम असतो. प्रवासी घेण्यासाठी रिक्षा चालक रस्त्याच्या मधोमध ब्रेक लावून रिक्षा उभी करतात. त्यामुळे देखील वाहतूक कोंडीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. मात्र याकडे आरटीओ तसेच वाहतूक शाखेच्या पोलिसांचे वारंवार दुर्लक्ष होताना दिसत आहे. केव्हातरी आणि कधीतरी एखादी कारवाई केली जाते. मात्र या कारवाईत सातत्य असणे गरजेचे आहे.

वाहनांची संख्या वाढली परंतु रस्त्यांची लांबी रुंदी वाढली नसल्याने अशातच रस्त्यांवर देखील अतिक्रमण वाढत असल्याने वाहतूक कोंडीला चालना मिळत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे.



### प्रशासनाने गांभीर्याने पहावे

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे प्रस्तावित उड्डाणपूल मंजूर आहे. परंतु त्याचे प्रत्यक्षात कामकाज कधी सुरू होईल हे मात्र कोणी सांगू शकत नाही. अशा स्थितीत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेले अतिक्रमण, बेशिस्त रिक्षा वाहतूक, यामुळे वाहतुकीच्या समस्या निर्माण होत आहेत. यासमस्यांकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

**-विनायक विटकर,** माजी नगरसेवक

### बिशिस्त वाहनधारकांवर कारवाई करावी

सोलापूर शहरात बेशिस्त वाहनधारकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यापूर्वी देखील बेशिस्त वाहतूक मोठ्या प्रमाणात होती. आता सर्रासपणे वाहन धारक विरुद्धदिशेने (राँगसाईडने) बिनधास्तपणे वाहने चालवतात. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सोलापूर बस स्टॅन्ड मध्ये जाण्यासाठी रिक्षा चालक तसेच इतर वाहनधारक हमखास विरुद्ध दिशेने जातात. येथे वाहतूक शाखेचे पोलीस उपलब्ध नसतात. त्यामुळे अशा घटनांना वाव तर अपघातासारख्या अप्रिय घटनांना चालना मिळते.

**- योगेश कुंदुर,**
सामाजिक कार्यकर्ते शहीद अशोक कामटे विचारमंच

## आम आदमी पार्टीच्या वतीने आज 'आप'ले सुराज्य मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

आम आदमी पार्टीच्या वतीने 'आप'ले सुराज्य मोहीम राज्यभर राबविण्यात येत आहे. या अंतर्गत बुधवार दि. ७ मे रोजी पक्षाचे राज्य पदाधिकारी सोलापुरात येत असून विविध शासकीय कार्यालयांना भेट देणार आहेत. कार्यकर्त्यांशीही संवाद साधणार असल्याची माहिती अॅड. खतीब वकील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मोहिमेअंतर्गत राज्य सचिव अभिजीत मोरे, राज्य संघटन सचिव अॅड. मनीष मोडक, संदीप देसाई आदी पदाधिकारी सोलापुरात येणार आहेत. दुपारी २.३० वाजता त्यांचे आगमन होईल. दुपारी ३.३० ते ४.३० वाजेपर्यंत सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयाची ते पाहणी करणार आहेत. यावेळी मुख्य आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. संध्याकाळी ५ वाजता सोलापुरातील दूषित पाणीपुरवठा व मोदीखाना परिसरात डेंगूमुळे झालेल्या मृत्यू संदर्भात महापालिका आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार आहे. दरम्यान, संध्याकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी ते संवाद साधणार आहेत. पत्रकार परिषदेस सागर पाटील, श्रीकांत वाघमारे, जाफर मदनी, जुबेर हिरापुरे, मल्लिकार्जुन मिलगिरी उपस्थित होते.

## 'शिवदारे' ची श्रद्धा अडगळे बारावी परीक्षेत महाविद्यालयात प्रथम

**सोलापूर, दि. ६ मे-**

व्ही.जी.शिवदारे ज्युनियर कॉलेज येथील एच.एस.सी. सायन्स विभागाचा निकाल १०० टक्के लागला. नियमित ५५ विद्यार्थ्यांपैकी ९ विद्यार्थी प्रथम श्रेणी मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत. यामध्ये श्रद्धा संघांना अडगळे ७३.५० टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

साक्षी रमेश मलकापनवर ७२.१७ टक्के गुण मिळवून व्दितीय तर जोहा इरफान शेख ७१.१७ टक्के गुण मिळवून तृतीय स्थान मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन राजशेखर शिवदारे, विश्वस्त बी.व्ही. शेटे, प्र. प्राचार्या एस.एस. गायकवाड, प्राचार्य डी एस सुत्रावे व मार्गदर्शक डॉ.ए.बी.वळसंगे यांनी अभिनंदन केले.

## सिद्धेश्वरसह विविध एक्सप्रेस गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले

**सोलापूर, दि.६ मे -**

सोलापूर रेल्वे विभागातील रेल्वे गाड्या सातत्याने उशिराने धावत आहेत. पुणे स्टेशनवर वाढीव फलाट तयार झाले आहे दुहेरीकरण आणि विद्युतीकरण पूर्ण होऊनही रेल्वे गाड्या उशिराने धावत आहेत. दरम्यान सोमवारी सकाळी सिद्धेश्वर एक्सप्रेस तिच्या निर्धारित वेळेच्या साडेतीन तास उशिराने आली याबरोबर अनेक रेल्वे गाड्या उशिराने धावल्या. त्यामुळे चाकरमान्यांचे व प्रवाशांचे वेळापत्रक कोलमडले. सिद्धेश्वर एक्सप्रेस सकाळी ६:३५ मिनिटांनी दाखल होते. मात्र सोमवारी सकाळी सिद्धेश्वर एक्सप्रेसला सोलापूर स्टेशनवर येण्यासाठी तब्बल १०: १५ इतका वेळ लागला. रविवारी रात्री उद्यान एक्सप्रेस देखील उशिराने धावली होती. याचबरोबर सकाळी ५:३० वा. येणारे कोईमतूर एक्सप्रेस देखील एक तास उशिराने म्हणजेच ६:२५ मिनिटांनी सोलापूर स्टेशनवर आली. त्याचप्रमाणे सकाळी १०:२० सुटणारी येणारे नागरकोईल एक्सप्रेस ११:३० वा धावली. उद्यान एक्सप्रेसला देखील ४० मिनिटे तर एकता एक्सप्रेसला एक तास उशीर झाला. कलबुर्गी एक्सप्रेस देखील दीड तास उशिराने धावली. रेल्वेचे वेळापत्रक बिघडल्यामुळे चाकरमान्यांचे व परगावी जाणाऱ्या प्रवाशांचे देखील मोठ्या प्रमाणात हाल झाले.

## सुसंस्कार करणाऱ्या माता देश घडवित असतात

### डॉ. श्रीकांत येळेगावकर; मातृत्व दिनानिमित्त गुणवंत मातांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

आई हे प्रेमाचे, वात्सल्याचे, त्यागाचे, कष्टाचे, प्रतीक असते. सुसंस्कार करणाऱ्या माता या देश निर्माण करण्याचा, देश घडविण्याचे काम करतात, असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व इंडियन रेड क्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मातृत्व दिनानिमित्त गुणवंत मातांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. मंजुषा शहा, रोटरी ई क्लबचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, सचिव आदर्श गोयदानी, सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डी.एम. कन्सल्टंट अर्चना बिसोई सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राचे प्रभारी जिल्हा कार्यक्रम अधिकारी तथा सुपरवायझर कृष्णा सकट, क्लस्टर प्रोग्राम ऑफिसर ब्रम्हदेव श्रीमंगले, सांख्यिकी अधिकारी दिनेश राठोड, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, समुपदेशक कपिल भालेराव आदी उपस्थित होते.




नंदाकुमार वाघमारे या महानगरपालिकेत झाडूवाली म्हणून बदली कामगार या पदावर काम करत आपल्या मुलाला न्यायाधीश बनवले व दोन मुलींना नर्सिंगचे शिक्षण दिले. सुजाता दुर्गादास वंगा यांनी बांगडीचा व्यवसाय आणि घरगुती मेस चालवून दोन मुलांना इंजिनीरिंगचे तर एका मुलीला 'डी' फार्मासिचे शिक्षण दिले आता ते सर्वजण चांगल्या ठिकाणी नोकरी करत आहेत. सुनीता अनिल नळे यांनी दोन मुलींवर कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन केले. त्या बांगडी भरण्याचा व्यवसाय करत एका मुलीला एम. टेक पर्यंतचे शिक्षण दिले तर दुसऱ्या मुलीला बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण दिले. त्या दोघी पुणे येथे नौकरी करत आहेत. प्रातिनिधिक स्वरूपात या तीन गुणवंत मातांचा सत्कार बुके, श्रीफळ, शाल, साडी व भेटवस्तू देऊन डॉ. मंजुषा शाहा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व गुणवंत मातांचा परिचय सुगतरत्न गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार सचिन तोष्णीवाल यांनी मानले.

## महिला महाउद्योजिका पुरस्काराने सोलापूरच्या गौरी जोशी सन्मानित

**सोलापूर, दि. ६ मे-**



नवी मुंबई, ऐरोली येथे गरुडझेप स्वयंसिध्दा सोशल वेल्फेअर फांउडेशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या महिला महाउद्योजक स्पर्धेमध्ये महाराष्ट्राची लाडकी उद्योजिका आणि समाजकार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सोलापूरच्या सहाय्य व्यसनमुक्ती केंद्रांच्या सचिव गौरी जोशी यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे गौरी जोशी या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे ही होत्या. महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यातून सोशल वर्कसाठी पुरस्कार देऊन निवड करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख विजय चौगुले उपस्थित होते. यावेळी समाजसेवक एस. सिसोदिया , जे.एन.सी. न्यूज चॅनलचे आब शिंदे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या डायरेक्टर आर्या जोशी यांनी ही संस्थेच्या कामकाजाविषयी माहिती दिली. पुरस्कार चैताली चटर्जी यांच्या हस्ते देण्यात आले. सूत्रसंचलन गरुडझेप स्वयंसिध्दा फाऊडेशनच्या डायरेक्टर अॅड. कल्पना कुलकर्णी यांनी केले.

## गुरुदेव टागोर : एक आत्मप्रकाश


**विश्वकवी रवींद्रनाथ ठाकूर यांना १३ नोव्हेंबर १९१३ रोजी जगविख्यात नोबेल पुरस्कार मिळाला आणि त्यांच्या साहित्याची कीर्तीपताका जगभर फडकू लागली. रवींद्रनाथ खऱ्या अर्थाने विश्व मानव होते.**

रवींद्रनाथांच्या गीतांजली या काव्यसंग्रहाला हा पुरस्कार मिळाला आहे. हा ग्रंथ मूळ बंगालीत आहे. त्याचे इंग्रजी भाषांतर त्यांनीच केले होते. सीमार माझे असीम तुमी बाजाओ उभापळ सूर.. आमार मध्ये तोमार प्रकाश लाई रातो मधूर ..कोतो वर्ण कोतो गंधे, कोतो गाने कोतो धंदे.. अरुण, तोमार रुपेरी लीलाय जागे झदयपूर...( या सीमेमध्ये तू असीम.. आपले सूर वाजव. माझ्यात हा जो तुझा प्रकाश आहे, त्यामुळेच इतका मधुर तो वाटतो. किती रंग, किती गंध, किती गाणी , किती छंद.. हे अरुण तुझ्याच रूपाच्या लीलेने माझे हृदयपूर जागे झाले आहे..)

गीतांजलीच्या या एका गीताच्या साध्या ओळी.. १९०५ ते १९११ हा काळ गीतांजलीच्या निर्मितीच्या काळ होय. त्या काळात त्यांच्यावर वैयक्तिक आपत्ती कोसळल्या. मनस्वास्थ, शरीर स्वास्थ असंतुलित झाले. त्याचा परिणाम गीतांजलीत आपल्याला दिसून येतो.

संगीत, नाटक, गद्य,काव्य, चित्रकला अशा सर्व ललित प्रांतात रवींद्रनाथ यांची प्रतिभा लीलया संचार करीत असे. त्यांची नाटकेही लोकप्रिय झाली. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी पन्नासावर नाटके लिहिली असून त्याचे साधारण तीन भाग पडतात. १८९१ ते १८९६ हा पहिला खंड असून त्यास आत्मा व बोध शोधाचा काळ म्हणता येईल. दुसरा खंड हा राष्ट्राच्या प्रकृती धर्माचा अथवा राष्ट्रीय अवबोधाच्या शोधाचा काळ असून तो १९०८ ते१९१६ असा आहे. आणि तिसरा कालखंड १९२२ ते१९३९ असा असून त्यात एकमेकांपासून किंचित विलग झालेल्या दोन प्रवृत्तीची गुंफण दिसते. टागोरांच्या सृजनशील प्रेरणेच्या मुळाशी नेहमीच संगीत होते. ही वस्तुस्थिती आहे. बंगाली रंगभूमीवर ज्यावेळी गद्याचा बोलबाला होता, अशा वेळेस टागोरांनी पद्याचा अंगिकार केला. तो अर्थातच प्रस्थापिताविरुद्ध बंड म्हणून नव्हे, तर भारतीय मनोवृत्तीचे दर्शन कवितेतूनच उत्तम प्रकारे होऊ शकते. असे त्यांना वाटत होते म्हणून.. वाल्मिकी प्रतिभा या त्यांच्या पहिल्या नाटकापासूनच खरं तर त्यांचा आत्मबोधाचा शोध सुरू झाला होता. ते नाटक संपूर्णपणे संगीतमय होते. तर ' मायारेखेला ' हे नाटक म्हणजे त्याच्या अगदी विरुद्ध केलेला प्रयोग होय. यामध्ये महत्त्व होते, ते गीतांना, नाटकाला नव्हे, इतर नाटकात नाट्यमय प्रसंगाची एक मालिकाच स्वर माधुर्याच्या सूत्रात ओवण्यात आली होती. भावनांचा खेळ हे त्यांचे वैशिष्ट्य होय. मुक्ती हा त्यांच्या नाटकाचा विचार होता. ते म्हणतात,

केवळ जे आवश्यक आणि उपयुक्त तेवढ्यातच बंदिस्त होऊन राहावे, हा मानवी जीवनाचा धर्म नव्हे .आपण काही अंशी आवश्यक बंधनात गुरफटलेले असतो. आणि काही प्रमाणात स्वतंत्र असतो. शिक्षणाच्या बाबतीत असंच आहे. केवळ उपयुक्तते कडे पाहून तेवढ्या शिक्षणातच मुलांना बांधून टाकलं तर त्यांच्या मनाचा भरपूर विकासच होणार नाही. आपण शक्य तितक्या लवकर विदेशी भाषा शिकून, परीक्षा पास होऊन नोकरीच्या मागे लागतो. आपल्या शिक्षणाच्या जोडीला आनंद नाही. रवींद्रनाथांना शाळेचा प्रथम पासूनच तिटकारा होता. ते घरीच शिकत. त्यांची मनोवृत्ती विलक्षण एकांतप्रिय होती. जीवन आणि शिक्षण यातील समवाय ही आमची मोठी समस्या आहे. तिची पूर्ती व्हावयाची असेल तर ती मातृभाषेच्या द्वाराच शक्य आहे. मातृभाषा आमच्या बुद्धीचा आणि भावनांचा संगम घडवून आणण्यास पात्र आहे. कामकाजाचा व्यवहार इंग्रजीतून शक्य असला तरी ती भाषा आमच्या उस्फूर्त अभिव्यक्तीचे माध्यम होणे अशक्य आहे. शाळा म्हणजे मुलांना प्रौढ करणारे यंत्र आहे .असे त्यांचे मत होते. त्यात अंत:करणापासून या शिशूना शिक्षणातून जी संपूर्णतता लाभायला हवी ती लाभणे शक्य नाही. या संपूर्णतेसाठी जिथे समग्र जीवनाची सजीव बैठक असेल, अशा आश्रमाची आवश्यकता आहे. तपोवनच्या केंद्रासाठी गुरु असतात. ती यंत्र नव्हेत. शिक्षणासाठी निष्क्रिय मनाची किंवा यांत्रिक पद्धतीने काम करणारी माणसं नव्हेत, तर सक्रिय भावानेत्यात रमलेली माणसं हवीत . शिष्याच्या चित्ताला गतिशील करणारी माणसं, ती स्वतः त्या साधनेचेच एक अंग होऊन राहिलेली असत. नित्य जागृत मानव चित्ताबरोबर संग हा आश्रमीय शिक्षणाचा मूळ गाभा, शिकवण्याचा विषय आहे . तंत्र किंवा उपकरण हा नव्हे. शिष्याला देण्यासाठी सतत आपण नवीन नवीन काहीतरी मिळवीत रहावे, हेच आपल्याला त्यांच्या शांतीनिकेतन मध्ये दिसून येते.. कोणी म्हटलं आहे की शांतीनिकेतन हे रवींद्रनाथांची ढरपसळलश्रश झेशा आहे. म्हणजे तिला आपण स्पर्श करू शकतो. अशी समर्थ कविता आहे. रवींद्रनाथांची प्रत्येक अभिव्यक्ती ही त्यांच्यावर सतत होत जाणाऱ्या अनेक संस्काराचे परिणती आहे. त्यामुळे त्यांच्या कुठल्याही निर्मितीला सणाच्या आणि शतकांच्या गणितात बसवता येत नाही . म्हणूनच बुद्धदेव बसू यासारख्या थोर लेखक आणि विचारवंताने शांतिनिकेतनला शब पेयेछिर देश म्हटलं आहे. शब पेयेछिर म्हणजे तिथे सगळं काही मिळतं असा देश.. रवींद्रनाथांचं साहित्य वाचताना त्यांची एक मूळ धारणा पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येते, ती म्हणजे विश्वाचा हा विराट पसारा देखील निर्मात्याने एखाद्या कवीसारखाच केवळ अभिव्यक्तीच्या आनंदासाठीच व्यक्त केला आहे. त्या निर्मितीला हेतू नाही. त्यांच्या मते सौंदर्य म्हणजे भ्रम नव्हे,चेटूक नव्हे किंवा नजरबंदी नव्हे. सौंदर्य म्हणजे सत्य.. तुमच्या भोवती असंख्य क्षुद्र आणि कुरूप वस्तू असतात. पण तुमच्या ध्यानामुळे सौंदर्य तुम्हाला पाहता आले पाहिजे. तुमचा कुंचला असा नसावा की जो एखाद्या भ्रामक सरस्वतीच्या पावलांना अळिता लावण्यातच गर्क राहील. रवींद्रनाथ यांचे विचार आजही आपल्याला मनन, चिंतन करायला लावतील. संगीत, साहित्य, नाट्य, चित्र अशा अनेक क्षेत्रात त्यांची सूर्यझेपी प्रतिभा आहे. शिक्षणाबाबतीत विचार त्यांनी शांतीनिकेतनच्या रूपाने प्रत्यक्षात आणून दाखवले. हे जगच मुळी एक राष्ट्र आहे आणि मानवतेचे विभाजन करता येत नाही .अशी विशाल भावना त्यांनी मांडली. अशा लोकोत्तर गुरुदेवांना माझे त्रिवार वंदन.



**- प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर,**
ज्येष्ठ साहित्यिक
अध्यक्ष, मसाप सोलापूर

# निरा धरणाचा कालवा फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि ६ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ब्रिटीशकालीन १९२० साली बांधकाम झालेल्या आठ मोरीजवळील दक्षिणेकडील भिंतीचे २००७-२००८ या वर्षी ठेकेदाराने एका भिंतीचे बांधकाम केले नव्हते. त्या भिंतीला भळ पडली होती सदरची भळ बुजविणयाचा अधिकाऱ्याकडून दोन दिवस प्रयत्न केले होते. सिमेंट, फिकसेट व इतर साहित्य वापरुन बुजविली होती.मात्र मंगळवारी पहाटे पाचच्या सुमारास सदरची भिंत पाण्याचा दाबामुळे कोसळली. यामुळे



लाखो लिटर पाणी ओढयात वाहून गेले. झिंजेवस्ती येथून मळोली, शेंडेचिंच पर्यत ओढयात लाखो लिटर पाणी वाहून गेले. सदरची माहिती समजताच अधिकाऱ्यांनी खुडुस येथील ७७ चौकी व त्या वरील सर्व फाटयांना पाणी सोडण्यात आले असून सहा तासात पाणी बंद होताच सदरच्या कामाची युद्ध पातळीवर सुरुवात करणयात येणार असल्याचे वेळापूरचे शाखा अभियंता दिनेश राऊत यांनी सांगितले. सदरच्या ठिकाणी फलटणचे कार्यकारी अभियंता शिवाजी जाधव यांनी ताबडतोब भेट देऊन अधिकाऱ्यांना योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याचे सांगितले. याबाबतची माहिती प्रांताधिकारी, तहसीलदार, संबंधित गावचे तलाठी यांना दिले असुन ओढ्या लगतच्या नागरिकांना सतर्क राहणयाचे आवाहन प्रशासनाने केले आहे. सदरचे काम दहा दिवसात करुन सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यातील पाण्यापासून वंचित असणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी देण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी वेळापूरचे शाखा अभियंता दिनेश राऊत यांनी सांगितले.

> सदरच्या कॅनॉल फुटीबाबत वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत मात्र याठिकाणी २००७-२००८ मध्ये मोरीचे काम करताना ठेकेदाराने दक्षीण बाजुच्या भिंतींचे काम न केल्यामुळेच ही कालवा फुटीची घटना घडली आहे.संबीधीत ठेकेदारावर कारवाई करणयाची मागणी होत आहे.

# माढा नगरपंचायतच्या गाळ्यांसाठी एक कोटी निधी

## नगराध्यक्षा अॅड. मिनल साठे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ मे-**

माढा नगरपंचायतकडून शहरातील व्यापारी संकुलनासाठी मागणी करण्यात आली होती त्या कामासाठी शासनाकडून वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून एक कोटी निधी मंजूर झाला आहे. माढा नगरपंचायती कडून आपल्या स्वतःच्या मालकी जागेत तीन मजली व्यापारी संकुलन उभारले जाणार असल्याचे नगरपंचायतच्या नगराध्यक्षा अॅड. मिनलताई साठे यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले.

> माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील व्यापारी संकुलनाची इमारत धोकादायक स्थितीत असल्याचा अहवाल प्राप्त झाल्या असल्याने त्या गाळ्यांचे पाडकाम करून नवीन तीन मजली व्यापारी संकुल माढ्यामध्ये उभारले जाणार असले तरी पूर्वीच्या मूळ गाळेधारकांना गाळे देण्याची आमची भूमिका स्पष्ट आहे तसेच सर्वांना विश्वासात घेऊन हे काम केले जाणार आहे.
>
> **- दादासाहेब साठे,**
> नेते राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट



माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सध्या सहकार महर्षी स्वर्गीय गणपतराव साठे व्यापारी संकुल असून यातील गाळे धोकादायक परिस्थितीत असल्याचे स्ट्रक्चरल ऑडिटरने आपल्या अहवालात सांगितले असुन तो माढा नगरपंचायतीस सादर केला आहे. हे गाळे धोकादायक परिस्थितीत असल्याने भविष्यात कुठलीही दुर्घटना घडू नये यासाठी त्या गाळ्यांचे पाडकाम करून साठ गाळे असलेली तीन मजली नवीन इमारत त्या जागी बांधली जाणार असल्याचे ही यावेळी नगराध्यक्षा साठे यांनी सांगितले. माढा नगरपंचायत प्रशासनाकडून या संदर्भात गाळेधारकांना नोटिसी देण्यात आलेले आहे. तसेच न्यायालयात यासंदर्भात कॅव्हेट देखील प्रशासनाकडून दाखल करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेत दादासाहेब साठे यांनी सांगितले की युती सरकारच्या काळात शहरातील अतिक्रमण हटविल्यानंतर शहरातील दुकानदार व टपरी धारकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता या गोष्टीचा विचार करून माजी आमदार अॅड. धनाजीराव साठे, माजी आमदार विनायकराव पाटील आणि तत्कालीन आमदार बबनराव शिंदे यांच्या सहकार्याने सहकार महर्षी स्वर्गीय गणपतराव साठे व्यापारी संकुल उभारण्यात आले होते. आता ती इमारत धोकादायक स्थितीत असल्याचे ऑडिटमध्ये निष्पन्न झाले असल्याने त्या जागेवर नव्याने बांधकाम केले जाणार आहे. संपूर्ण प्रक्रिया सगळ्यांना विश्वासात घेऊन सगळ्यांच्या सहकार्याने पार पाडली जाणार आहे आम दार अभिजीत पाटील यांच्याशी देखील आम्ही चर्चा केली असून त्यांनी देखील आमच्या या प्रक्रियेला सहमती दर्शवली असल्याचे सांगितले आहे. या पत्रकार परिषदेस साठे गटाचे नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते.



# उडगी-तोळणूर रस्त्याचे काम अर्धवट

## नागरिकांतून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.६ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील उडगी ते तोळणूर रस्त्याचे काम अर्धवट झाल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदरच्या रस्त्याचे काम त्वरीत पावसाळा सुरु होण्यापूर्वी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा उडगी येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश नारायणकर यांनी दिला आहे.

अक्कलकोट तालुक्यातील उडगी ते तोळणूर रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षापासून रखडले आहे. सदरच्या रस्त्याचे काम त्वरीत व्हावे यासाठी तोळणूर ,उडगीसह परिसरातील नागरिकांनी मागणी व्यक्त केली होती. या रस्त्याच्या ठेकेदाराने काम केले पण ते अर्धवट केल्याने वाहन चालकातून व नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. रस्त्याचे काम काही ठिकाणी करण्यात आले पण काही ठिकाणी नुसती खडी टाकण्यात आल्याने वाहन चालकांना या रस्त्यावरून वाहने चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. अर्धवट कामामुळे या रस्त्यावर छोटे-मोठे अपघात होत असल्याने हा रस्ता अपघाती रस्ता म्हणून नवी ओळख निर्माण होताना दिसत. आहे. उडगी ते तोळनूर हा रस्ता आंतरराज्य मार्ग ला जोडणारा म ार्ग म्हणून ओळखला जातो. या रस्त्याचे काम पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी वाहनधारकातून व नागरिकांतून केली जात आहे. उडगी ते तोळणूर रस्ता पूर्ण न केल्यास ठेकेदार व प्रशासनाच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा उडगी येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश नारायणकर यांनी दिला आहे.

# शिवाजी महाविद्यालयाचा निकाल ८६.५५ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मे-**

फेब्रुवारी २०२५ मध्ये राज्य मंडळाकडून घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत बार्शीतील शिवाजी महाविद्यालयाचा कला व विज्ञान शाखेचा एकत्रित निकाल ८६.५५ टक्के लागला.

विज्ञान शाखेतील ५७२ पैकी १५ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर होते. ५१४ उत्तीर्ण झाले. रिद्धीमा विशाल भोसले ८१.१७ टक्के गुणांसह महाविद्यालयात प्रथम, वैशाली दत्ता माळी ७४.८३ टक्के गुणांसह द्वितीय, क्षितिजा विनोद पवार ७४.३४ टक्के गुणांसह तृतीय आली. कला शाखेतील १९५ पैकी १३० उत्तीर्ण झाले. यात प्रज्ञा तानाजी लोंढे ८५.८३ टक्के गुणांसह महाविद्यालयात प्रथम, प्रिया विठ्ठल शिंदे ८०.८३ टक्के गुणांसह द्वितीय, श्रुती नितीन चांदणे ७६.६७ टक्के गुणांसह तृतीय आली.

# संतबावी येथे १८ मे पासून राज्यस्तरीय वारकरी संत संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ६ मे-**

संत बावी (आ) ता. बार्शी येथे संत संमेलनाचा रौप्यमहोत्सव सोहळा दि. १८ ते २५ मे या कालावधीत संपन्न होणार असून दररोज दुपारी २ ते ५ श्रीमद्भागवत कथा प्रवक्ते ज्ञानेश्वर माऊली महाराज पाटील यांच्या अमृतमय वाणीतून होणार आहे.

दररोज रात्री ८:३० ते १०:३० यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकार प्रकाश महाराज साठे, कृष्णा महाराज चौरे, ज्ञानेश्वर महाराज पाटील, अनिल महाराज पाटील, महंत अमृत महाराज जोशी, समाधान महाराज शर्मा, प्रकाश महाराज बोधले व काल्याचे किर्तन महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे संपन्न होणार आहे. संत संमेलन मुख्य कार्यक्रम दि. २४ मे रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत संपन्न होणार असून प्रमुख संत उपस्थिती कोल्हापूर करवीर पीठधिश्वर श्रीमद् आद्य जगद्गुरु शंकराचार्य, श्रीक्षेत्र देवगड संस्थांचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज, गुरुवर्य प्रकाश महाराज बोधले तसेच महाराष्ट्रातील अनेक संत मंडळी, कीर्तनकार, प्रवचनकार मंडळी व प्रमुख विशेष उपस्थिती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे समवेत अनेक नेते मंडळी उपस्थित राहणार आहेत.

या संत संमेलनाचे आयोजन समस्त ग्रामस्थ गावकरी मंडळी संत बावी तथा श्रीकृष्ण मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# बारावी परीक्षेत मोहोळमध्ये मुलींचीच बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ६ मे-**

मोहोळसह तालुक्यात बारावीच्या सहा केंद्रात लागलेल्या निकालामध्ये मुलींनी बाजी मारली असून विज्ञान शाखेत मोहोळच्या नेताजी प्रशालेची सानिका घोलप हिने (८७.६७ टक्के) तर कला शाखेत अनगरच्या कै. शंकरराव बाजीराव पाटील विद्यालयाची वैष्णवी दाढे हिने ८८ टक्के प्रथम, वाणिज्य शाखेत मोहोळच्या नागनाथ विद्यालयाच्या प्रथमेश चंदनशिवे याने ८९.१७ टक्के प्रथम क्रमांक पटकाविला आहे. प्रत्येक शाखा निहाय प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक पुढीलप्रमाणे : **विज्ञान शाखा:** नेताजी प्रशाला मोहोळ प्रथम- सानिका घोलप मोहोळ ८७.६७ टक्के, द्वितीय मेहेक रौफ तांबोळी नेताजी प्रशाला मोहोळ ८६.१७ टक्के, तृतीय तन्वी चव्हाण ८६ टक्के.

**शेटफळ, माध्यमिक विद्यालय- कला शाखा :** प्रथम वैष्णवी दाढे ८८ टक्के, शं.बा.पाटील विद्यालय अनगर द्वितीय साक्षी राऊत ८७.३३ टक्के नागनाथ विद्यालय मोहोळ, तृतीय पूजा कोंडगिरे ७७.३ भैरवनाथ विद्यालय, अंकोली. वाणिज्य शाखा : प्रथम प्रथमेश चंदनशिवे ८९.१७ टक्के नागनाथ विद्यालय, द्वितीय ऐश्वर्या रोकडे ८७.३३ टक्के नागनाथ विद्यालय, तृतीय सानिका अवताडे ७९.३३ टक्के.

**स. बा. प्रशाला कामतीबु॥**

**विद्यालय निहाय निकाल पुढील प्रमाणे**

**नागनाथ विद्यालय मोहोळ- कला शाखा :** साक्षी राऊत प्रथम ८७.३३, आरती मेथे द्वितीय ७५.१७, सम्राज्ञी तूपसमिंदर ७० टक्के. वाणिज्य शाखा : प्रथमेश चंदनशिवे ८९.१७ टक्के, ऐश्वर्या रोकडे ८७.३३, टक्के, प्रणाली रोकडे ८२.५० टक्के. विज्ञान शाखा - तरन्नुम शेख ७१.१७ टक्के, ओम मोटे ७१ टक्के, श्रीतेज मोटे ६३.८३ टक्के. माध्यमिक विद्यालय शेटफळ- विज्ञान शाखा : तन्वी चव्हाण ८६ टक्के, सोनाली माळी ८२.८३ टक्के, पृथ्वीराज डोंगरे ७७.८३ टक्के, कला शाखा - सोनाली बोडरे ७७.५० टक्के, वसुधा कसबे ७३.५० टक्के, सानिका लोखंडे ७३.३३ टक्के.

**नेताजी प्रशाला मोहोळ : विज्ञान शाखा** : सानिका घोलप ८७.६७ टक्के, महेक तांबोळी ८६.१७ टक्के, प्रणिती निळ ८५ टक्के

**इंदिरा कन्या प्रशाला- विज्ञान शाखा** : स्नेहल मोटे १९.१७ टक्के, स्वरांजली मळगे ७१.५० टक्के, श्रेयश उन्हाळे ७०.६७ टक्के, श्रुती कुंभार ७०.६७ टक्के, **कला शाखा-** स्वरांजली लेंगरे ६८.५० टक्के, पूनम हावळे ६७.३३ टक्के, शुभांगी कांबळे ६४.१७ टक्के. स. मा. ब.देशमुख प्रशाला कामतीबु॥ - कला शाखा - पायल गायकवाड ७६.३३ टक्के, साक्षी फडतरे ७२ टक्के, आरती इंगळे ६४ टक्के, **विज्ञान शाखा :** पौर्णिमा सोनवणे ७१.५० टक्के, सुरज जगताप ७०.३३ टक्के, मानस घंटेवाड ६७.६७ टक्के, ईशांत पिसे ६७.६७ टक्के. वाणिज्य शाखा: सानिका अवताडे ७९.३३ टक्के, निशा गायकवाड ७७.६७ टक्के, दीक्षा गायकवाड ७४ टक्के. देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय मोहोळ- विज्ञान शाखा : वरद आवताडे ७५ टक्के, आर्या गुंड ७२ टक्के, अभिनव थिटे ७०टक्के. व्यावसायिक अभ्यासक्रम प्रेमराज डोंगरे ८७.३३ टक्के, अथर्व इंगळे ७६.३३ टक्के, काजल चव्हाण ७१.१७ टक्के.

# शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून मार्गदर्शन करा

## तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव; सांगोल्यात खरीप हंगामपूर्व कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ मे-**

१५ मे पूर्वी गावांची निवड करून त्या ठिकाणी शेतीशाळा व खरीप हंगामातील पेरणी, पीक व्यवस्थापन यासंदर्भात शेतकरी केंद्रबिंदू मानून कृतिशील मार्गदर्शन करण्यात यावे. १५ मे नंतर शेतकरी खरीप हंगामाच्या कामांमध्ये व्यस्त असतात. यावर्षी प्रमुख पिकांच्या लागवडीसाठी कृषी अधिकारी कर्मचाऱ्यांनी लक्ष केंद्रित करावे. शेतकऱ्यांनी आधुनिक पिकाबरोबर पारंपारिक देशी पिके लागवड करून चांगले उत्पादन घ्यावे. जीवन जगताना जसे नियोजन महत्त्वाचे असते तसेच नियोजन शेती उत्पादनासाठीही महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन सांगोला तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव यांनी केले.

सांगोला तालुका कृषी कार्यालयाच्या वतीने आयोजित खरीप हंगामपूर्व कार्यशाळेत त्या बोलत होत्या. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पंढरपूर उपविभागीय कृषीतंत्र अधिकारी पूनम चव्हाण होत्या.




> खरीप हंगामपूर्व कार्यशाळेत दशपर्णी अर्क तयार करणे यावर विवेक पाटील, माती नमुनेवर श्रीकांत शिंदे, पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यावर एस.आर.बर्गे व एन.एस सरगर, बियाणांची उगवण क्षमतावर प्रतीक डुबल, पेरणीपूर्व व पेरणी पश्चात हुमणी किड नियंत्रणावर एस.एस चव्हाण, तांत्रिक पद्धतीने मका लागवड व उत्पादनावर एस. बी.शिंदे, बाजरी लागवडवर यु.ई.चंदनशिवे, कृषी सहाय्यक समाधान गवळी यांनी कमी खर्चात अधिक उत्पन्न कसे मिळवावे यावर, एच.बी.वास्ते यांनी उसाच्या सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञानावर, एस.आर.देठे यांनी जलतारा या विषयावर, आर .जे.टेंगले यांनी ऊस पाचट व्यवस्थापनवर तसेच आत्तार यांनी केळी लागवड व तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेदरम्यान हुमणी कीड नियंत्रण प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. कार्यशाळेसाठी सांगोला, जुनोनी, जवळा, महूद मंडल कृषीअधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार महूद मंडल कृषी अधिकारी अभंग यांनी मानले.

# सुळेवाडी येथे अवकाळी पावसामुळे घरावरील पत्रे उडाले; विजेचे खांब कोसळले

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ६ मे-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी व पिलीव परीसरातील पश्चिम भागात सोमवारी संध्याकाळी साडे आठच्या दरम्यान वादळी वाऱ्यासह व विजेच्या कडकडाटासह जोरदार गारांचा पाऊस कोसळला.

पहील्याच अवकाळी पावसामुळे सुळेवाडी येथे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये सुळेवाडी येथील पाच ते सहा घरावरील पत्रे उडुन गेले यामुळे त्या कुटुंबाचे संसार अक्षरशः उघडयावर पडले आहेत.तसेच वादळी वाऱ्याम ुळे विजेचे चार खांब कोसळल्याने विजपुरवठा खंडीत झाला आहे. तसेच याठिकाणी वादळी वाऱ्यामुळे आंब्याच्या फळांचे मोठे नुकसान झाले आहेत. तसेच अनेक झाडेही उनमळुन पडली आहेत.याठिकाणी जोरदार गारांचा पाऊस पडला जवळपास अर्धा तास पाऊस पडुन पाणी साचणयासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. पिलीवच्या पशिचम भागात म्हणजे महालक्ष्मी परिसरात सुद्धा जोरदार अवकाळी पाऊस झाला. यामुळे राजेंद्र करांडे याच्या घरावरील पत्रे उडुन गेले तसेच अनेक झाडेही उनमळुन पडली. पिलीव, बचेरी ,सुळेवाडी या ठिकाणी पहील्याच अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारंबळ उडाली. तसेच पहील्याच अवकाळी पावसामुळे सुळेवाडी व पिलीव परीसरात जोरदार वादळी वाऱ्यामुळे नुकसान झाले आहे. सुळेवाडी व पिलीव येथे झालेल्या नुकसानीचे संबंधित तलाठयांनी रितसर पंचनामे केले आहेत.

## महत्वाचे...



### भाजपा तालुका अध्यक्षपदी बालाजी गडदे यांची निवड

**बार्शी, दि. ६ मे-**

बार्शी येथील जामगाव (आ) चे माजी उपसरपंच बालाजी गडदे यांची बार्शी उत्तर ग्रामीणच्या भारतीय जनता पार्टीच्या बार्शी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांना भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहीचे निवडीचे पत्र जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या हस्ते देण्यात आले. बालाजी गडदे यांनी माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद, पंचायत समिती, लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पक्षाचे काम एकनिष्ठपणे केले असून बार्शी उत्तर ग्रामीणमध्ये पक्ष सदस्य नोंदणीचे जोमाने काम केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचा सत्कार भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन रणवीर राऊत, विलास आप्पा रेणके, भाजपाचे बार्शी निरीक्षक गणेश चिवटे उपस्थित होते.



### भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभागातर्फे बांधकाम कामगार नोंदणी अभियान

**बार्शी, दि. ६ मे-**

भारतीय जनता पार्टी पंचायतराज व ग्रामविकास विभाग सोलापूर जिल्हा पश्चिम विभाग यांच्यावतीने वैराग, (ता. बार्शी) येथे बांधकाम कामगार नोंदणी अभियान राबविण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष विशाल निलाखे, जिल्हा प्रवक्ते प्रफुल्ल भालशंकर, जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र निंबाळकर, तालुका उपाध्यक्ष पंकज पाटील, बावी गण संयोजक पांडुरंग गुंड, तालुका प्रवक्ते संतोष खडके, वैराग शहर उपाध्यक्ष अरुण वाघमारे, दादा बंड, डॉ.आदेश यादव, सामाजिक कार्यकर्ते शरीफभाई शेख, संतोष बिरगे, आरपीआय आठवले गटाचे प्रमुख नाना कांबळे इत्यादी उपस्थित होते. या अभियानाचा लाभ असंख्य लाभार्थी यांनी घेतला.



### हौशी कलाकार यांची ऋषी कपूर यांना आदरांजली

**बार्शी, दि. ६ मे-**

बॉलिवूडचा राजा स्व. ऋषि कपूर यांच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्ताने बार्शी हौशी कलाकार यांनी स्व. ऋषी कपूर यांच्या गीतामधून आदरांजली देण्यात आली ,बार्शी हौशी कलाकार ग्रुप प्रथेप्रमाणे हौशी कलाकार गोविंद तापडिया यांच्या हॉलवर घोडे गल्ली येथे कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात मेजर अविनाश हिंगमिरे, सीए बालकीसन जाजू, राहुल झोंबाडे, प्रशांत माळवदे, गोविंद तापडिया, रवींद्र मैंदर्गीकर, अजय खंडेल वाल ,श्रीमती लक्ष्मी तोरड, सुनीता जाजू, सुजाता हिंगमिरे आणि सुनिल फल्ले या हौशी कलाकारांनी गीते सादर केली. कार्यक्रमात पाहुण्या गायिका शोभा रणशूर, सुनीता चौघुले आणि पाहुणे गायक नितीन बाभळे यांनीही गीते सादर केली. कार्यक्रमात स्व.ऋषि कपूर यांच्या सरगम, कर्ज, हम किसींसे कम नहीं, बॉबी, प्रेम रोग, रफ्फु चक्कर, चांदणी, धन दौलत, कुली, बोल राधा बोल, सागर, दिवाना, कभी कभी आदी चित्रपटातील गीते सादर करण्यात आली. गोविंद तापडिया यांनी कार्यक्रमास हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल रवींद्र मैंदर्गीकर यांनी आभार मानले. कार्य कर्माचे संयोजन, नियोजन सुनिल फल्ले यांनी केले होते.



### लोकसेवा महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत यश

**मंद्रुप, दि. ६ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील शिक्षण प्रसारक मंडळ मंद्रूप, संचलित लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९६.१९ टक्के लागला असून यात प्रथम वृषाली गोरनाळे ८०.३८ टक्के , द्वितीय वैष्णवी दुधभाते ७९.८३ टक्के, तर तृतीय क्रमांक भावना घेरडी ७७.८३ टक्के. वाणिज्य शाखेचा निकाल ९१.५९ टक्के लागला असून यामध्ये प्रथम विजयालक्ष्मी बिराजदार ८०.८३ टक्के , द्वितीय अभिषेक बन्ने ७९ टक्के तर तृतीय सुमैय्या मुलाणी ७७.६७ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ५१ टक्के लागले असून प्रथम स्नेहा छावरीया ६० टक्के, द्वितीय किरण तांदळे ५३.३३ टक्के, ज्योती गायकवाड ५२.८३ टक्के गुण मिळवले आहेत. सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिवशरण पाटील, सचिव गुरुसिद्ध म्हेत्रे, सहसचिव पिरप्पा म्हेत्रे, प्राचार्य बसवराज कुमठेकर, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयानंद घाटे यांनी अभिनंदन केले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बार्शी तालुक्याचा बारावीचा निकाल ८८.६४ टक्के

● गेल्या वर्षीच्या तुलनेत निकालात ३ टक्के घसरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परिक्षेचा बार्शी तालुक्याचा निकाल ८८.६४ टक्के लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा तालुक्याच्या निकालात ३.०३ टक्के इतकी घसरण झाली आहे. गेल्या वर्षी ९१.६७ टक्के इतका निकाल लागला होता. चार वर्षांपासून दरवर्षी निकालात घसरण होत असल्याचे दिसत आहे.

बार्शी तालुक्यातील विविध विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालयातून कला, विज्ञान व वाणिज्य तसेच किमान कौशल्य अशा विविध विद्याशाखेतून परीक्षेसाठी ६०६४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. ६०२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

यातील ५३३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी ६९९ विद्यार्थी डिस्टींक्शनमध्ये, २११७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २०१६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, ५०७ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले.

| सन २०२२ पासून २०२५ पर्यंत निकाल | |
|---|---|
| सन २०२२ | ९२.४० |
| २०२३ | ९५.३१ |
| २०२४ | ९१.६७ |
| २०२५ | ८८.६४ |



## महत्वाचे...

### बार्शीतील सानवी देशपांडेची इस्रो भेट; साऊंडिंग सॅटेलाइट लॉन्चिंगचा घेतला अनुभव

**बार्शी, दि. ६ मे-**

बार्शीतील सुलाखे हायस्कूलची विद्यार्थिनी सानवी प्रशांत देशपांडे हिने एम.एस.ए.टी परीक्षेत मिळवलेल्या दैदिप्यमान यशाच्या आधारे तिला नुकताच इस्रो भेटीचा सन्मान मिळाला. विक्रम साराभाई स्पेस सेंटर येथे रोहिणी आर एच २०० या साऊंडिंग सॅटेलाइट लॉन्चिंगचा अनुभव घेतला. डॉ. होमीभाभा एज्युकेशन फाऊंडेशन मुंबईच्यावतीने प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी एमएसएटी (गणित आणि विज्ञान क्षमता चाचणी) आणि ग्रेट (सामान्य तर्क आणि इंग्रजी क्षमता चाचणी) घेण्यात येते. या परीक्षेमध्ये सानवी हिने राज्यात व्दितीय क्रमांक पटकावला होता. या यशाबद्दल तिला डॉ होमीभाभा फाऊंडेशनकडून तिला शिष्यवृत्तीसह इस्रो भेटीचा सन्मान मिळाला होता. तिला विज्ञान शिक्षक संतोष तोडकरी यांचे मार्गदर्शन लाभले होते. नुकताच ठाणे येथे डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृह येथे पद्मभूषण प्रा. ज्येष्ठराज जोशी यांच्या हस्ते सानवीला अस्पायरिंग यंग सायंटिस्ट अवॉर्ड देण्यात आला.





### वऱ्हाड निघालय लंडनला या नाट्यप्रयोगाला प्रेक्षकांचा प्रतिसाद

**बार्शी, दि. ६ मे-**

येथील मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने नुकतेच वऱ्हाड निघालय लंडनला या गाजलेल्या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते संदीप पाठक यांनी सादर केलेल्या या नाट्यप्रयोगाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण, शहरी, भारतीय, परदेशी, मुले, प्रौढ माणसे, स्त्री पुरुष अशा विविध प्रकारच्या सुमारे ५२ व्यक्तिरेखा त्यांनी अतिशय ताकदीने साकारल्या. दमदार मिस्कील संहिता आणि आणि तिला सर्वार्थाने न्याय देणारे सशक्त सादरीकरण यामुळे प्रेक्षागृह हशा टाळ्यांनी दुमदुमत राहिले. प्रारंभी पहेलगाव येथे झालेल्या अतिरेकी हल्लयात बळी पडलेल्या देशबांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर श्री ज्ञानोबा माऊली आणि मायबोलीचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार माढेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. उपाध्यक्ष जवाहर माढेकर यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केल्यानंतर प्रकाश पाटील, सौ. मंगल पाटील आणि दिवाकर नारकर या देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांचा परिचय सहसचिव निलेश माढेकर यांनी करुन दिला. आभार राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी मानले. कार्यक्रमाचे निवेदन अमिता कुलकर्णी आणि पल्लवी माढेकर यांनी केले. आमदार दिलीपरावजी सोपल या कार्यक्रमाला आवर्जून पूर्ण वेळ उपस्थित होते. त्यांचा मध्यंतरात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोषाध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णी, संचालक जितेंद्र माढेकर, सुनील आबा पाटील यांनी परिश्रम घेतले.



### १२ वी परीक्षेत हिंदी विषयात ऋतुजा चव्हाण बोर्डात प्रथम

**सांगोला, दि. ६ मे-**

बारावीच्या बोर्ड परीक्षेत नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजची कला शाखेची विद्यार्थिनी ऋतुजा संतोष चव्हाण हिने हिंदी विषयात १०० पैकी ९८ गुण मिळवत बोर्डात प्रथम क्रमांक पटकवण्याचा बहुमान मिळवला. कला शाखेचा ९१.३० तर वाणिज्य शाखेचा ९५.२४ टक्के निकाल लागला आहे. कला शाखेमध्ये ऋतुजा चव्हाण ८२.८३ प्रथम, प्रांजली मिसाळ ८२ द्वितीय, हेमा बनसोडे ६८.६७ तृतीय तसेच वाणिज्य शाखेमधून प्रियंका जावीर ७९.६७ प्रथम, आरती व्हनमाने ७९.३३ द्वितीय तर तृप्ती बदडे ७८ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. सदर विद्यार्थ्यांना प्रा. महेश विभुते, प्रा.नारायण पाटील, प्रा. युवराज लोहार, प्रा.मोहन भोसले, प्रा.रत्नप्रभा जुंधळे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य बिभीषण माने, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे यांनी अभिनंदन केले.

### अकलूज परिसरात अवकाळी पाऊस

**सांगोला, दि. ६ मे-**

अकलूज परिसरात वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाच्या सरी बरसल्या. आज उकाड्याने हजर हैराण झालेल्या नागरिकांना हलक्या पावसाने दिलासा मिळाला आज सकाळपासूनच हवेमध्ये प्रचंड उष्णता होती त्यामुळे दुपारी बाजारपेठेत शुकशुकाट होता सुमारे पाच वाजण्याचे सुमारास वादळी पावसाने हजेरी लावली पाऊस मोठा नव्हता परंतु वादळी वाऱ्याने आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले मात्र उन्हाळी भुईमूग कडवळ या पिकांना दिलासा मिळाला आणि उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला.

## यशवंत पंचायतराज अभियानात सोलापूर जिल्हा परिषद राज्यात तृतीय

✔ १७ लाखाचे बक्षिस पटकावले
✔ पंढरपूर पंचायत समिती विभागात द्वितीय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मे -**

यशवंत पंचायराज अभियानात सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात तृतीय क्रमांक मिळवित १७ लाख रूपयांचे पारितोषिक पटकाविले आहे. तर पंढरपूर पंचायत समितीने पुणे विभागात द्वितीय पुरस्कार पटकावित आठ लाख रूपयांचे पारितोषिक पटकाविले आहे.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने मंगळवारी शासन निर्णय काढून यशवंत पंचायत राज अभियानाच्या पुरस्काराची घोषणा केली . सन २०२२-२३ या कालावधीत झालेल्या पंचायतराज प्रशासनातील कामाचे मुल्यमापन करून या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. या बद्दल ग्रामविकास मंत्री तथा पालक मंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. या कालावधीत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी विशेष लक्ष दिले होते. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रभारी म्हणून इशाधिन शेळकंदे व उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी काम पाहिले आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या प्रमुख योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. पंचायत राज संस्थांना त्यांनी केलेल्या कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता अधिक वाढविणे व त्यांच्यामध्ये उत्कृष्ट कामांची स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यात पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन व विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून विभागस्तर व राज्यस्तरावर यशवंत पंचायत राज अभियान ही पुरस्कार योजना सुरु करण्यात आलेली आहे. सन २०२३-२४ या वर्षापासून पुरस्कार योजनेचे नाव यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान असे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मूल्यमापन विचारात घेऊन महसूली विभागस्तर व राज्यस्तर अशा दोन स्तरावर यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान ही अभिनव पुरस्कार योजना राबविण्यात आली. सदर अभियानांतर्गत राज्यातील अतिउत्कृष्ट तीन जिल्हा परिषदा व तीन पंचायत समित्या पुरस्कारासाठी राज्यस्तरावर निवड करण्यात येते.

राज्य स्तरावर वर्धा जिल्हा परिषदेने प्रथम (पारितोषिक ३० लाख रूपये) तर अमरावती जिल्हा परिषदेने द्वितीय (पारितोषिक २० लाख रूपये बक्षीस) तर सोलापूर जिल्हा परिषदेने तृतीय पुरस्कार १७ लाख रूपये पटकाविले आहे. तसेच विभागस्तरावर तीन पंचायत समित्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. सदर पंचायत राज संस्थांची निवड करण्यासाठी तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर, विभागस्तरावर आणि राज्यस्तरावर पारितोषिक निवड समितीची स्थापना करण्यात आलेली होती. पुणे विभाग स्तरावर शिराळा जिल्हा सांगली पंचायत समितीने प्रथम तर पंढरपूर पंचायत समितीने द्वितीय क्रमांक पटाविला आहे.

**सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन**
सोलापूर जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी खुप मेहनत घेऊन काम केले. राज्यात सोलापूर जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला. पंढरपूर पंचायत समिती विभागात द्वितीय क्रमांक पटाकविला आहे. सर्वांनी योगदान दिल्यामुळे हे यश प्राप्त झाले आहे.
**- दिलीप स्वामी,**
तत्कालीन सीईओ सोलापूर जिल्हा परिषद
विद्यमान जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर

## कंटेनर व मोटारसायकल अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार

● पुणे-पंढरपूर पालखी मार्गावर येळीव येथे झाला अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ६ मे-**

पूणे पंढरपूर या पालखी महामार्गावर कंटेनर व मोटार सायकल यांची धडक होऊन झालेल्या अपघातात मोटार सायकल चालक ठार झाल्याची घटना येळीव (माळशिरस) येथील काळा मारुती मंदिरानजीक सोमवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. या अपघातात मोटार सायकल चालक नारायण विठ्ठल तनपुरे (वय ४७ वर्षे) राहणार शिंदेवाडी तालुका माळशिरस हा जागीच ठार झाला तर कंटेनर चालक सागर शिवप्रसाद राजभोर (राहणार मुंबई) हा जखमी झाला असून त्याच्यावर माळशिरस येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मुंबई येथील कंटेनर नंबर एम एच ४६ सी एल ६४ ८२ हा पुणे पंढरपूर पालखी महामार्गावरून पुणे कडून पंढरपूर कडे निघाला होता तर मोटार सायकल नंबर एम एच ४५ ए जी २०८३ ही नारायण तनपुरे हे माळशिरस कडून नातेपुते कडे निघाले होते. मोटार सायकल चालक नारायण तनपुरे हे चुकीच्या दिशेने मोटार सायकल घेऊन जात असता समोरून येणाऱ्या कंटेनरला मोटर सायकल जोरात धडकली. त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला तर कंटेनरमध्ये असलेल्या जड वजनाच्या प्लेट या कंटेनरच्या केबिनला जोरात धडकल्याने कंटेनरचे केबिन उडून एका बाजूला जाऊन पडले व त्यात कंटेनर चालक सागर राजभोर हा जखमी झाला. याबाबत माळशिरस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून या घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल मडावी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल सचिन भोसले करीत आहेत.

## पहेलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शेलगाव वांगी येथे कॅन्डल मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ६ मे-**

पहेलगाम काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शेलगाव वांगी येथे भाजपाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल व दिग्विजय बागल यांच्या नेतृत्वाखाली कॅन्डल मार्च काढण्यात आला.




यावेळी बोलताना बागल म्हणाल्या, काश्मीरमध्ये झालेला हल्ला हा देशाच्या अस्मितेवर झालेला हल्ला असून या हल्ल्यामुळे संपूर्ण समाजमन विकसित झाले आहे. भारतीय नागरिक हे शांतताप्रिय असले तरी याचा अर्थ ते कमजोर नाहीत यामुळे अशा प्रकारच्या भ्याड हल्ल्याचा केवळ निषेध करून भागणार नाही अशा वेळेस सर्व देशातील लोकांनी आपसातील मतभेद विसरून एकत्र येत ठामपणे देशाची एकजूट दाखवण्याची गरज आहे. सुरवातीला वांगी नंबर दोन फाटा ते शेलगाव चौकापर्यंत कॅंडल मार्च काढण्यात आला. चौकात आल्यानंतर मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

नंतर भारत माता की जय वंदे मातरम्च्या घोषणा देण्यात येऊन या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. यावेळी शिवसेना नेते दिग्विजय बागल भाजपा करमाळा ग्रामीण मंडळचे अध्यक्ष सचिन पिसाळ, संतोष वाळूंजकर, शुभम बंडगर, मकाईचे संचालक युवराज रोकडे गणेश तळेकर, गणेश झोळ, अजित झांजुर्णे, अशिष गायकवाड, राजेंद्र मोहळकर, रामभाऊ हाके, कुलदिप पाटील, सुरेश पोळ, डॉ. विजय रोकडे, रंगनाथ शिंदे, नितीन तकिक, सौदागर दौंड, गणेश पोळ अतुल पोळ उपस्थित होते.

## उजनीनगर येथे जि.प. शाळेच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध करावी

खा. मोहते-पाटील : उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाटील यांची घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे**

टेंभुर्णी येथील उजनीनगर जिल्हा परीषद शाळेच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार मोहीते पाटील यांनी केली आहे.



खा. मोहिते-पाटील यांनी मंगळवारी जिल्हा परिषदेत भेट देवून उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांची भेट घेतली. उजनीनगर जिल्हा परीषद शाळा १९७० पासून टेंभुर्णी येथील पाटबंधारे विभागाच्या चार जुन्या खोल्यांमध्ये असून सध्या पहिली ते सातवीपर्यंतचे ३७५ विद्यार्थी व १५ शिक्षकांसह वर्ग भरविले जात आहे. जुनी जीर्ण इमारत असल्याने शैक्षणिक प्रगतीवर परीणाम होत आहे. म्हणून येथील अतिक्रमण हटवून जिल्हा परिषद प्रशासनाने उजनीनगर शाळेला इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

**न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत : खा.मोहिते-पाटील**
खासदार धैर्यशील मोहीते पाटील यांनी जिल्हा परीषदेला भेट दिल्यानंतर पत्रकारांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयासंदर्भात विचारले असता न्यायालयाचे निर्णय स्वागतार्ह आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बोरीउमरगेत बसवजयंती मिरवणूकीत सर्वपक्षीय युवा नेत्यांनी धरला ठेका

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.६ मे-**

बोरीउमरगे ता. अक्कलकोट येथील महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उतस् मिरवणूकीत सर्वपक्षिय युवा नेत्यांनी एकत्रित येत बँजोचे तालावर ठेका धरला होता. बसवेश्वर महाराज की जयचा जयघोष करीत भाजपाचे युवा नेते मिलन कल्याणशेट्टी, काँग्रेसचे युवा नेते कशिराया काका पाटील, युवा नेते सुमित सिद्रामप्पा पाटील यांचा यामध्ये समावेश होता.



येथे महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती उत्सव मिरवणुक जल्लोषात झाली. येथील श्री दक्षिणमुखी जागृत हनुमान देवस्थानमध्ये श्री महात्मा बसवेश्वर महाराजांच्या मूर्तीची युवा नेत्यांच्या हस्ते महापूजा झाली. त्यानंतर गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी अडत व्यापारी राहुल तेलुणगी, पत्रकार बसवराज बिराजदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी कृष्णात बिराजदार, इटगीचे पोलिस पाटील संजय बिराजदार, निंगेशा नंदनगी, विठ्ठल घोडके, संगप्पा हतगुंदे, नरसिंग उमरजे, पाटील, लक्ष्मीपुत्र तोरणे, रविंद्र कोळी हे प्रमुख उपस्थितीत होते. रविराज तेल्लुणगी, प्रकाश तेल्लुणगी, नागेश बिराजदार, सागर पाटील, रविराज हतगुंदे, शिवराज हतगुंदे, शिवशरण बिराजदार, सिद्धिलिंग पाटील, गोरखनाथ पाटील, गुरुनाथ बिराजदार, राजू स्वामी, यल्लप्पा बेळमगे, नागनाथ वागदरी, चनप्पा बिराजदार, शिवराज बिराजदार, आकाश हतगुंदे, सागर बिराजदार, प्रसाद सलगरे, लक्ष्मण सलगरे, सैपन जमादार, अमृत बिराजदार, मल्लिकार्जुन बिराजदारसह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ मंद्रूपमध्ये कडकडीत बंद

✔ व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; लाखो रूपयांची उलाढाल ठप्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे -**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम दहशतवादी हल्लयात २७ निरापराध देशवासीयांची हत्या झाली त्याचा निषेध करण्यासाठी मंद्रूपमधील महात्मा बसवेश्वर चौकापासून हुतात्मा चौकापर्यंत तसेच प्रत्येक नगर व गल्लीतील सर्व समाज बांधव, व्यापारी व ग्रामस्थांनी कडकडीत बंद पाळून बंदमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी हल्ला करून २७ निरापराध भारतीयांची हत्या केली होती. संपूर्ण देशात या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. त्यामुळे मंद्रूपमधील सर्व व्यापारी एकत्र येऊन मंगळवार सात मे रोजी सर्व दुकाने बंद करून निषेध नोंदवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगळवारी संपूर्ण दिवसभर हॉटेल, किराणा, सलून, इलेक्ट्रीकल्स, इलेक्ट्रॉनिक्स, पान टपरी, मोबाईल दुकाने, जनरल स्टोअर्स, फोटो दुकान, सायकल व दुचाकी रिपेअर दुकान, बेकरी, कृषी केंद्र, विद्युत पंप विक्री दुकाने, सराफ दुकाने, कापड, भुसार, पशुखाद्य, शिलाई दुकाने यासह इतर दुकानदारांनी दुकान बंद ठेवून निषेध नोंदविला. अत्यावश्यक सेवेतील दवाखाने, मेडिकल, भाजीपाला विक्री सुरू ठेवण्यात आले होते. व्यापारावर परिणाम झाल्याचे दिसून आले. दररोज लाखो रुपयांची होणारी उलाढालही ठप्प झाली. रात्री महात्मा बसवेश्वर चौक येथे सर्वपक्षीय व सर्वधर्मीय कार्यकर्त्यांसह व्यापाऱ्यांनी निषेध नोंदविला. मंद्रुपमधील बंद शांततेत पार पडला. कुठल्याही प्रकारचे गालबोट लागले नाही. सर्व ग्रामस्थांनी कडकडीत बंद पाळून निषेध नोंदविला. कुठलाही अनुचित प्रकार घडला नसल्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी सांगितले. बंदकाळात सामाजिक कार्यकर्ते सुनिल व्हनमाने व आर. डी. गोसावी यांनी प्रवाशांची गैरसौय टाळण्यासाठी मंद्रुप बसस्थानकावर स्वखर्चाने थंड पाण्याची सोय केली होती.

**बंदला व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**
पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ मंद्रुपमध्ये पुकारलेल्या बंदमध्ये सर्व व्यापार्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दररोज लाखो रूपयांची उलाढाल असणाऱ्या व्यापाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने बंदला पाठिंबा दिला. सर्व व्यापारी व समाज बांधवांचे विशेष सहकार्य लाभले. - लक्ष्मण सुतार, मालक, विश्वकर्मा ट्रेडर्स, मंद्रुप.